


# संत ज्ञानेश्वर महाराज प्रणित नाथ परंपरा

लेखक - **प. पू. श्रीगुरु मोहननाथ महाराज पैठणकर**



**श्री आदिनाथ** (देऊळगाव राजा येथील मठात असलेली श्री उमेसह श्री आदिनाथांची मूर्ती)



**श्री ज्ञाननाथ** (श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी, श्रीक्षेत्र आळंदी देवाची)

# नाथ संप्रदायाची दिव्य परंपरा

- भगवान आदिनाथ
- मच्छिंद्रनाथ
- गोरक्षनाथ
- गहिनीनाथ
- निवृत्तीनाथ
  - सोपाननाथ
  - ज्ञाननाथ (माऊली)
  - आदीशक्ती मुक्ताबाई
- ज्ञाननाथ (माऊली)
- सत्यामलनाथ
- गैबीनाथ
- गुप्तनाथ
- उद्बोधनाथ महाराज
- केसरीनाथ महाराज
- शिवदिननाथ महाराज
- नरहरिनाथ महाराज
  - महिपतीनाथ महाराज
  - लक्ष्मीनाथ महाराज
  - नारायणनाथ महाराज
- लक्ष्मीनाथ महाराज
- विठ्ठलनाथ महाराज
- गणेशनाथ महाराज
- गौतमनाथ महाराज
- भानुनाथ महाराज

**विद्यमान पीठाधीश : प. पू. मोहननाथ महाराज**

# संत ज्ञानेश्वर महाराज प्रणित नाथ परंपरा

लेखक - **प. पू. श्रीगुरु मोहननाथ महाराज पैठणकर**

# संत ज्ञानेश्वर महाराज प्रणीत नाथ परंपरा

प्रकाशक - **श्री. संत नरहरीनाथ महाराज संस्थान, देऊळगांव राजा, जि. बुलढाणा**

संपादक - **श्री उद्बोध मोहननाथ महाराज पैठणकर**

---

शीर्षक सुलेखन - **अमित आपटे**

मुखपृष्ठ व मांडणी - **आदित्य आपटे**

छायाचित्र - **रमण उपाध्ये**

मुद्रक - **वेद ऑफसेट, पुणे**

---

प्रथम अवृत्ती - **जानेवारी २०१७, १,००० प्रती**

प्रकाशन स्थळ - **संत नामदेव सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे**

---

© सर्व हक्क प्रकाशकांकडे राखीव

---

❖ ग्रंथ मिळण्याची ठिकाणे ❖

**श्री. संत नरहरीनाथ महाराज संस्थान, देऊळगांव राजा, जि. बुलढाणा,**

**समर्थ ग्रंथ भवन, आळंदी देवाची**

**वीर महाराज ग्रंथ भांडार, पंढरपूर**

❖ प्रचार सेवा मूल्य- **रु. १२०/-** ❖

# अनुक्रमणिका


**लेखकाचे मनोगत**

**प्रस्तावना**

**अभिप्राय**

**संपादकीय**

**नाथसंप्रदायाचा उगम, ध्येय व विस्तार**

नाथसंप्रदायाचा उगम व ध्येय ........ १

सद्‌गुरु श्री ज्ञानेश्वर महाराज शिष्यपरंपरा ........ ९

संप्रदाय वेश - बाणा नाथांचा ........ १२

श्री संत एकनाथ महाराज- दत्त परंपरा आणि नाथ संप्रदाय ........ १४

**संत नाथ चरित्रमाला**

श्री संत गुप्तनाथ महाराज ........ १७

श्री संत उद्‌बोधनाथ महाराज ........ १८

श्री संत केसरीनाथ महाराज ........ १९

श्री संत शिवदिननाथ महाराज ........ २२

शिवदिन नंदन - संत श्री नरहरिनाथ महाराज ........ २७

श्री संत लक्ष्मीनाथ महाराज ........ ३१

संत नारायणनाथ महाराज ........ ३६

श्री संत विठ्ठलनाथ महाराज ........ ३७

श्री संत गणेशनाथ महाराज ........ ४०

श्री संत गौतमनाथ महाराज ........ ४२

श्री संत भानुदासनाथ महाराज ........ ४५

**संत नरहरिनाथ महाराज संस्थान-इतिहास** ........ ४९

**संत नरहरिनाथ महाराज संस्थान-वार्षिक उत्सव**

महाशिवरात्र ........ ५३

नाथषष्ठी, पैठण ........ ५६

संत नारायणनाथ महाराज पुण्यतिथी उत्सव (खान्मळणी) ........ ५८

ग्रामदैवत श्री बालाजी महाराज यात्रा ........ ५९

ललित ........ ५९

पाडवा ........ ५९

न्हावी येथील भिक्षा ........ ६०

**गुरु परंपरेतील संतांचे अभंग व पद्य रचना**

श्री नरहरीनाथ महाराज यांचा कटिबंध ........ ६३
आरती श्री आदिनाथांची ........ ६४
आरती श्री नरहरिनाथाची ........ ६४
आरती सद्‌गुरु नाथांची ........ ६५
विठ्ठल भक्ती ........ ६६
सद्‌गुरु महिमा ........ ६७
धावा ........ ६९
धावा ........ ७०
धावा ........ ७३
मानस पूजा ........ ७५
श्री शिवदिननाथ महाराजांचे अष्टक ........ ७६
श्री लक्ष्मीनाथ महाराजांचे अष्टक ........ ७८
गुरु परंपरेचे श्लोक ........ ७९
निवडक अभंग ........ ८१

**ग्रंथलेखक प. पू. मोहननाथ महाराज यांचा अल्प परिचय**

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ........ ८५

■■■

# ◆।। लेखकाचे मनोगत... ।।◆

नाथ संप्रदायावर आजवर अनेक ग्रंथ, पुस्तके लिहिल्या गेलेली आहेत. मात्र सर्व सार अवलोकन करता, अभ्यास करता एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात येते की, आजवर जी नाथसंप्रदायावर पुस्तके लिहिली गेली त्यात नाथ संप्रदाय उगम व विस्तार, वाङ्मय, नवनाथादि नाथांचे चरित्र, त्यांच्या ग्रंथांवर भाष्य, त्यांची साधना पद्धती, इतर राज्यातील त्या त्या ठिकाणचा नाथ संप्रदाय विशेष स्थान महिमा, या व इतर विषयांचे अभ्यासपूर्ण लेखन पहावयास मिळते. परंतु महाराष्ट्रातील नाथ संप्रदाय ज्याला ज्ञानेश्वरोत्तर नाथ संप्रदाय म्हणता येईल त्यावर मात्र जास्त प्रकाश पडलेला दिसत नाही आणि पडला असला तरी चंडांशा इतका नसल्यामुळे महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी अजुन तो पोहोचलेला नाही.

अलिकडच्या काळात काही जणांनी त्यावर पीएच.डी. केली, काहींनी मुद्दे वेगळेच मांडले व काहींचे प्रबंध म्हणावे तसे लोकाभिमुख नाही झाले. म.रा. जोशी व रा.चिं. ढेरे यांनी या विषयावर लेखन केलेले सापडते, डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या 'नाथ संप्रदायाचा इतिहास' या संशोधन ग्रंथात त्यांनी महाराष्ट्रातील नाथ संप्रदायावर एक स्वतंत्र प्रकरण लिहिलेले आहे. परंतु त्यातही त्यांना संपूर्ण परंपरेची माहिती मिळू शकली नाही. 'नजिकच्या काळात शिवदिननाथ-केसरीनाथ या नाथ संप्रदायी परंपरेच्या अभ्यासाच्या दिशेने प्रयत्न करण्याचा माझा नम्र संकल्प असेल' असे ते लिहितात. परंतु काही दिवसांपूर्वी त्यांचे दहावसन झाले. सद्‌गुरू श्री. ज्ञानेश्वर महाराजोत्तर नाथ संप्रदायी परंपरेवर लिखाण करावे, ती परंपरा लोकाभिमुख व्हावी ही बऱ्याच वर्षांची मनसा (इच्छा) काही अंशात या ग्रंथाच्या / पुस्तकाच्या निमित्ताने सफल होत आहे, याचा मनस्वी आनंद आहे. ही केवळ सद्‌गुरू कृपाच आहे.

भविष्यात परंपरेतील संतांच्या ग्रंथावर या परंपरेवर संशोधनपूर्ण अभ्यासपूर्ण लिखाण व्हावे ही सद्‌गुरूं चरणी प्रार्थना.

■■■

# प्रस्तावना

-प्रा. डॉ. सदानंद मोरे, अध्यक्ष-अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घुमान (पंजाब)

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या धार्मीक जीवनातील मुख्य प्रवाह राहीला आहे. या संप्रदायाचा पाया ज्ञानेश्वर महाराजांनी घातला असे तुकाराम शिष्य बहिणाबाई यांनी स्पष्ट केले आहे. ज्ञानेश्वर महाराजांच्या घरात जशी विठ्ठलोपासनेची वारकरी परंपरा होती तसाच नाथ संप्रदायही होता. असे स्वतः ज्ञानोबारायांच्या अभंगांवरून म्हणता येते. तेराव्या शतकातील महाराष्ट्रात नाथ-वारकरी आणी महानुभाव हे तीन संप्रदाय नांदत होते, पैकी वारकरी आणी नाथ या संप्रदायातील संबंधाविषयी कोणाचेही दुमत नाही. प्रसिद्ध संशोधक कै. डॉ. रा. चिं. ढेरे यांनी नाथ संप्रदाय आणि महानुभाव संप्रदाय यांच्यातील अनुबंध शोधण्याचा प्रयत्न करणारे ‘चक्रपाणी‘ हे पुस्तक लिहीले. त्यावेळी अभ्यासकांची या विषयावर बरीच चर्चाही झाली हाती. या चर्चेचा निर्णय काहीही लागो नाथ संप्रदायाचे महत्व त्यामुळे परत एकदा अधोरेखित झाले हे मात्र नक्की.

ज्ञानेश्वर महाराजांची नाथपंथीय गुरुपरंपरा **आदिनाथ- मच्छिंद्रनाथ- गोरक्षनाथ- गहिनीनाथ-निवृत्तीनाथ-ज्ञानेश्वर** अशी असल्याचे सर्वश्रुत आहे. ज्या बहिणाबाईंनी ज्ञानेश्वर माऊलींना वारकरी संप्रदायाचा पाया घातल्याचा मान दिला त्यांनी आपली स्वतःची गुरुपरंपरा **ज्ञानेश्वर- सच्चिदानंद- विश्वंभर- राघवचैतन्य- केशवचैतन्य- बाबाजीचैतन्य- तुकाराम- बहिणाबाई** अशी सांगितली. तिला दुजोरा देणारी निळोबांची प्रमाणे शंकर स्वामी शऊरकरांचे व निळोबांच्या वंशजांनी लिहीलेल्या चरीत्र ग्रंथांमधून उपलब्ध होतात. याचाच अर्थ असा की ज्ञानेश्वरोत्तर वारकरी संप्रदायाची परंपराही या अर्थाने नाथ सांप्रदायिकच आहे. ज्ञानेश्वर महाराजांना वारकरी संप्रदायाचा पाया रचल्याचे श्रेय आपण देत असलो तरी त्याचा अर्थ माऊलींनी वारकरी संप्रदायाची स्थापना केली असा होत नाही. माऊलींच्या अगोदर कितीतरी वर्षे पंढरपूर येथे श्री विठ्ठल दैवत नांदत होते व या दैवताची विशिष्ट पद्धतीने उपासना म्हणजे वारी करणारे असंख्य भक्तही अस्तित्वात होते. ‘मग पाया घाला हा शब्दप्रयोग कोणत्या अर्थाने घ्यायचा?’ कोणताही धर्मसंप्रदाय, धर्म या नात्याने प्रतिष्ठीत व्हायचा असेल तर त्यासाठी तीन घटकांची अवश्यकता असते. उपास्य दैवत, उपासना पद्धती आणि प्रमाण व पवित्र धर्मग्रंथ. वारकरी संप्रदायाकडे दैवत होते उपासना पद्धती होती परंतु ग्रंथ नव्हता. ही उणीव ज्ञानोबारायांच्या ‘ज्ञानेश्वरीने’ भरून काढली, या अर्थाने त्यांनी पाया रचला. वारकरी संप्रदायाचा ज्ञानेश्वरपूर्व कालीन इतिहास Pre History होय. History सुरू होते ती ज्ञानेश्वरीच्या लेखनानंतर.

नाथ संप्रदायाशी नाते असणाऱ्या ज्ञानोबारायांनी लिहीलेली ज्ञानेश्वरी हे कृष्णाने अर्जुनास सांगितलेल्या गीतेवरील मराठीत केलेले भाष्य आहे. वारकरी संप्रादायाचे उपास्य दैवत

श्री विठ्ठल म्हणजे द्वारकेवरून आलेला कृष्णच, अशी श्रद्धा तेव्हा सर्वत्र दृढमूल झालेली होती.सहाजिकच जे काही कृष्णाचे ते सर्व विठ्ठलाचे असे तर्कतः निष्पन्न होते. त्यामुळे कृष्णाची गीता आपोआपच विठ्ठलावी ठरते, ती वारकऱ्यांना मान्य होण्यात काहीच अडचण नाही आणि दुर्बोध संस्कृतामधील सुबोध मराठीतील तिचा अर्थ म्हणजे ज्ञानेश्वरी मिळणे त्यांच्यसाठी पर्वणीच.

अर्थात ज्ञानेश्वर महाराजांचे कामही सोपे नव्हते. एकीकडे आदिनाथ शंकरापासुन सुरू झालेली त्यांची नाथपंथीय परंपरा ही शैव तर दुसरीकडे विष्णुचा अवतार असलेल्या गीतोपदेशक कृष्णाच्या भक्तीची परंपरा वैष्णव. त्यावरील उपाय त्यांना माहीत असणारच.... स्वतः महाभारतातच. कृष्णाने शैवदिक्षा घेतल्याचा उल्लेख आहे. पण ही गोष्ट वैष्णवांच्या पचनी पडणे शक्य झाले नसतेच, त्यासाठी शिव आणि विष्णु यांच्या दैवतशाखीय प्रतिष्ठेत साम्य असणे आवश्यक होते.

ही किमया माऊलींनी ज्ञानेश्वरीत साधली. ज्ञानेश्वरीच्या प्रारंभीच त्यांनी गीतार्थाची थोरी **स्वये शंभू विवरी । तेथ भवानी प्रश्न करी । चमत्कारोनी ॥** असे म्हणून प्रत्यक्ष शंकराने पार्वतीला गीतार्थ सांगितल्याचे स्पष्ट केले. नाथ गुरू परंपरेचा शंकराने पार्वतीला केलेला उपदेश विष्णुने मत्स्यगर्भात कवी नारायण रूपी मच्छिंद्रनाथाच्या रूपाने ऐकला. पहिल्या अध्यायातील ओवीबरोबर या मुद्याची सांगड घातली तर तो उपदेश म्हणजे दुसरे तिसरे काही नसून गीतार्थच होता असे निष्पन्न होते. याचा अर्थ असा होतो की, नाथ पंथीय शैव परंपरेत चालत आलेले ज्ञान गीतेचेच होते! परत हा पवित्रा सुद्धा एकतर्फीच झाला असता. ज्ञानोबारायांनी असे ही सांगितले की, गीतेत कृष्णाने अर्जुनाला केलेल्या उपदेशात योगमार्गाचा समावेश आहे. आणि हा योग मार्ग भगवान शंकराने प्रवर्तित केला आहे.

**पिंडे पिंडाचा ग्रासु । हा तव नाथ संकेतीचा दंशु ।**
**परी दावुनी गेला उद्देशु । महाविष्णुसाठी ॥**

म्हणजे गीतेत विष्णुचा (कृष्णाचा ) उपदेश शंकराच्या मुखातुन वदविला आहे. तर शंकराचा उपदेश कृष्णाच्या मुखातुन वदविला आहे. अशा प्रकारे या दोन विचारधारांचा समान पातळीवरून समन्वय घडविण्यात ज्ञानेश्व महाराज यशस्वी झाले आहेत.

ज्ञानेश्वर महाराजांना परंपरेने लाभलेले ‘समाधिधन’ जणु त्यांच्या गुरूंनी ग्रंथात बांधून दिले असल्याचे महाराज सांगतात. या प्रक्रियेची सुरूवात खरेतर श्रीगुरू निवृत्तीनाथांच्याही अगोदर म्हणजे श्री गहिनीनाथांपासून झालेली दिसते. आदिनाथ- मच्छिंद्रनाथ- गोरक्षनाथ- गहिनीनाथ येथपर्यंतचा प्रवास सर्वज्ञातच आहे. दरम्यानच्या काळात देशावर परचक्र आले, देशाची सत्ता परधर्मीयांच्या हाती गेली. अशावेळी नाथ संप्रदायातील गुरूशिष्य पद्धतीचा उपदेश पुरेसा ठरला नसता. म्हणून तो जास्तीत जास्त लोकांपर्यंत पाहेचवीण्याची आज्ञा गहिनीनाथांनीच निवृत्तीनाथांना दिली. त्यानुसार

निवृत्तीनाथांनी सर्व समाजावर उपदेशामृताचा जणु वर्षावच केला.

पण हे झाले मौखिक. त्याला ग्रंथरूप मिळाले नाही तर ते त्यांच्या बरोबरच संपून जाईल हे निवृत्तीनाथांच्या लक्षात आले व त्यांनी ज्ञानोबारायांना हे काम करायला सांगितले. त्यातुनच 'ज्ञानेश्वरी' नावाचा ग्रंथ सिद्ध झाला. याच श्रीगुरू निवृत्तीनाथांच्या अभंगामधुन विठ्ठल व कृष्ण या देवतांच्या उपासनेचे उद्येश आढळतात. नाथ पंथ म्हटला की योग-मुद्रा आठवते पण त्याच बरोबर त्यात प्रेम-मुद्राही आहे. हीच प्रेम-मुद्रा मच्छिंद्रनाथांनी गोरक्षनाथांना दिली असे ज्ञानोबाराय सांगतात.

**तेची प्रेममुद्रा गोरक्षा दिधली ।**
**पुर्ण कृपा केली गहिणीनाथा ।।**

गहिनीनाथ- निवृत्तीनाथ येथपर्यंतची नाथपंथातील प्रेम-मुद्रा म्हणजेच भक्ती पुरेशा व्यक्त न वृती. ती निवृत्तीनाथांच्या कृपेने व आज्ञेने ज्ञानोबारायांनी पूर्ण प्रकट केली, हा इत्यर्थ कठोर साधनेचा पुरस्कार करणारी योगमुद्रा व सहजसुलभ भक्तीमार्गाचा पुरस्कार करणारी प्रेम-मुद्रा यांची तुलना करून प्रेम-मुद्रेचा अर्थात भक्तीचा पुरस्कार ज्ञानेश्वर महाराजांनी गीतेच्या बाराव्या अध्यायातील प्रारंभीच्या श्लोकावरील भाष्यातून केलेला दिसतो. सहाजिकच ज्ञानोबारांच्या पश्चात योग-मुद्रा मागे पडून प्रेम-मुद्रा म्हणजेच वारकरी संप्रदाय पुढे आल्याचे दिसून येते. ती काळाची गरजही होती. शिवाय वारकरी संप्रदायाला नामदेवरायांसारखे कुशल घटक व प्रभावी प्रचारक लाभल्यामुळे लवकरच तो महाराष्ट्राच्या धर्मजिवनातील मुख्य प्रवाह बनु शकला पण याचा अर्थ ज्ञानोबारायांचा नाथ संप्रदाय नामशेष झाला असे मात्र नाही. गुरूशिष्य परंपरेने चालणारा नाथसंप्रदाय आजही अस्तित्वात आहे. फक्त लोकांना त्याची पुरेशी माहीती नाही. ज्ञानेशोरोत्तर नाथ परंपरंची माहिती देणारे प्रस्तुत पुस्ताकाचे स्वागत करायचे ते याच कारणाने.

याद्वारे मोहननाथ महाराजांनी लिहीलेले हे पुस्तक माहितीची उणीव दूर करणारे व महत्त्वपूर्ण योगदान करणार आहे असे वर्णन परीपूर्ण वाटते. ज्या कारणामुळे नाथ संप्रदायाच्या धुरिणांना ज्ञानोबारायांच्या आधीपासून वारकरी संप्रदायाशी नाते प्रस्थािपित करावेसे वाटले त्याचा परीणाम ज्ञानेश्वरोत्तर नाथ संप्रदायावर झाला नसता तरच नवल! व्यक्तीगत पातळीवरील स्वयंभू साधनेच्या पुढे जाऊन भजन-कीर्तनाचा आनंद घेणे, विठ्ठलाची उपासना करणे अशा गोष्टी नाथ संप्रादायात तेव्हापासूनच प्रविष्ट झाल्या व त्या प्रस्तुत पुस्तकात वर्णिलेल्या ज्ञानेश्वरोत्तर नाथ परंपरनेने टिकवून ठेवल्या आहेत. पुस्तकात दिल्या गेलेल्या माहितीचे काही अंश मराठी साहित्यात विखुरलेल्या स्वरूपात सापडतात. परंतु इतकी माहिती आणि तीही एकसूत्र तथा सुसंगतपणे गुंफलेली कोठेही मिळत नाही. संप्रदायाच्या पारंपारीक वेश, आचार ,नित्य-नैमित्तिक विधी, निवडक साहित्य आणि अर्थातच वेगवेगळया मठ परंपरेतील पीठीधीश व त्यांचे योगदान अशा माहितीचा जणु खजिनाच

वाचकांयाठी खुला केला. आणी विशेषतः सत्यामलनाथांच्या परंपरा व उपपरंपरा या संदर्भात फार महत्वाच्या आहेत. देऊळगांवराजा, पैठण, ग्वाल्हेर, न्हावी (खान्देश) येथील परंपरेचा यथायोग्य परिचय देऊन नाथ संप्रदायाबाबतचा आदरभाव द्विगुणीत होतो. नरहरीनाथ, शिवदीननाथ, उद्‌बोधनाथ, महिपतीनाथ व इतरांच्या रचनांनमधून विठ्ठलोपासक नाथपंथियांचे चरित्र गाणाऱ्या नाथपंथियांचे मनोज्ञ दर्शन घडते. ज्ञानेश्वर महाराजांचे नाथसंप्रादायिक 'ज्ञाननाथ' हे पाहयला मिळतात ते असे.

**प्रतापे गुणि आगळा सुर्य जैसा । स्वयं ज्योती शुद्ध प्रकाशित जैसा ।**
**जयाची असे या जगी पूर्ण सत्ता । नमस्कार माझा तया ज्ञाननाथा ।।**

महाराष्ट्राचा धार्मिक व सांस्कृतिक इतिहास किती समृद्ध आहे याची जाणीव करून देणारे श्री. मोहननाथ महाराजांनी लिहीलेले हे पुस्तक वारकारी सांप्रदायाकांनी आवर्जुन अभ्यासावे असे आहे. या विषयावर आणखी तपशिलाने लिखाण व्हावे अशी अपेक्षा कोणत्याही वाचकांच्या मनात निर्माण होईल त्यात माझा अपवाद असायचे कारण नाही.

■■■

**- सदानंद मोरे**

# अभिप्राय

**डॉ. अभय टिळक** (संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी देवाची)
(संत साहित्याचे अभ्यासक तथा अर्थतज्ज्ञ)

नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, समर्थ, गणेश, देवी यांसारख्या विविध संप्रदायांनी मराठी मनावर अध्यात्मोपासनेचे संस्कार घडविलेले आहेत.

परंतु या सगळ्यांत नाथ संप्रदायाने प्रर्वर्तित केलेल्या तत्त्वबोधाचा प्रभाव सघन, सखोल आणि पायाभूत आहे. नाथ संप्रदाय प्रणित आगमतत्त्व विचाराचा परिचय मराठी तत्त्वविश्वाला घडवला ज्ञानोबारायांनी. पदोपदी आपल्या अनुभवाला येणारे विश्व हा विवत नसुन विलास आहे, असे प्रतिपादान करीत, जग आणि जगाशी प्रत्येक व्यक्तीच्या असणाऱ्या नात्याबाबतचा विलक्षण निकोप, सकारात्मक दृष्टीकोन प्रस्थापित करण्यात शैवागमाचे योगदान अतिशय मोठे आहे. याच अद्वैयानंदाचा जागर ज्ञानोबारायांनी या भुमीत घडविला. मात्र, ज्ञानोबारायांनंतर नाथसंप्रदायाच्या त्या विचारविश्वाचा प्रवास मराठी भावविश्वात कोठे, कसा, केव्हा आणि कोणाच्या माध्यमातून घडत राहीला, हा सगळाच प्रांत आजवर अज्ञानाच्या कुशीत पहुडलेलाच राहीला. अध्ययन आणि संशोधनाच्या आजवरच्या आकलनाच्या कक्षेपलिकडे राहिलेल्या त्या प्रांताकडे घेऊन जाणाऱ्या महामार्गाचे महाद्वार श्री. पूज्यनीय मोहननाथ महाराजांनी लिहीलेल्या या ग्रंथाद्वारे किलकिले झालेले आहे. या खटाटोपाची सर्वात मोठी उपलब्धी हीच.

या द्वारातून पाऊल आत घालीत आगमोगम अद्वयानंदाच्या वैभवाचे ज्ञानदेवोत्तर कवडसे न्याहाळण्याची उर्मी साधक आणि अभ्यासक अशा दाघांच्याही मनोमानसी दाटून येईल, असा विश्वास वाटतो. या निमीत्ताने का होईना पण ज्ञानदेवोत्तर नाथ परंपरेबाबत संशोधनाला गती मिळेल.

■■■

# अभिप्राय

**ह. भ. प. शांतीब्रह्म मारुती महाराज कुऱ्हेकर**
**अध्यापक :** वा. शि. संस्था, आळंदी

'ज्ञानेश्वर महाराज प्रणित नाथ परंपरा' हा ग्रंथ सिध्द करुन आदरणीय मोहननाथ महाराज पैठणकर यांनी साहित्यात खऱ्या अर्थाने भर घालून अभ्यासकांना नाथ संप्रदायाचे खरे स्वरुप उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या पुस्तकाच्या रुपाने ज्ञानेश्वर महाराजांच्या नंतर असणाऱ्या नाथ परंपरेचा इतिहास अभ्यासकांना उपलब्ध झाला आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत. 'गुरु मामासाहेब दांडेकरांनी ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेत या परंपरेचा उल्लेख शिवदिननाथ केसरी पर्यंत केला आहे.'

या ग्रंथाव्दारे यापुढील परंपरेवर लिखाण करुन त्यांनी या परंपरेची ओळख करुन दिली आहे. परंपरेतील संतांच्या चरित्रातून या परंपरेची महननीयता निदर्शनास येते.

या ग्रंथाव्दारे त्यांनी या दिव्य परंपरेची नव्याने ओळख करुन दिली आहे. वाचकांच्यासाठी ही पर्वणी आहे. माऊलींच्या आशिर्वादाने उत्तरोत्तर त्यांच्याकडून असेच कार्य घडावे !

शुभंम भवतू !

■■■

# अभिप्राय

**ह. भ. प. पूज्य श्री. चैतन्य महाराज देगलूरकर,**
पंढरपूर

॥ श्री पांडुरंग ॥

**आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा । मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य ॥**
**मच्छिंद्राने बोध गोरक्षासी केला । गोरक्ष वोळला गहिनीप्रती ॥**
**गहिनी प्रसादे निवृत्तीदातार । ज्ञानदेवा सार चोजविले ॥**

आदरणीय श्री. मोहननाथ महाराजांनी शब्द बद्ध केलेले त्यांच्याच परंपरेचे व परंपरेतील भगवदानुभवमण्डित पूर्वसुरींचे चरित्र पाहिले. खूप समाधान वाटले.

भारतीय संस्कृतीतील वैचारिक भूमिकांच्या वर्धन व रक्षणामध्ये नाथसंप्रदायाचे योगदान फार मोठे आहे. अद्वैत विचारधारेतील या संप्रदायाने वैराग्याचे फार व्यापक दर्शन जगाला घडविले आहे. विरक्त अंतःकरणाने या राष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये व तळागाळापर्यंत केलेले समाज प्रबोधन हे नाथसंप्रदायांचे वैशिष्ट्यच मानावे लागले. श्री आदिनाथांपासून चालत आलेल्या परंपरेचा संबंध अनेक संप्रदायांशी आलेला दिसून येतो. महाराष्ट्रामध्ये श्री निवृत्तीनाथ महाराजांपासून वारकरी संप्रदाय व नाथपरंपरेचे अद्वैत झाले व श्री ज्ञानेश्वर महाराजांपासून ही विचारगंगोत्री शतमुखाने प्रवाहित झाली आणि अनेक अज्ञानी जीवांना आनंद साम्राज्याच्या सिंहासनावर अधिष्ठित केले. या विचार प्रपाताचा एक प्रवाह श्री शिवदिननाथ - श्री केसरीनाथांच्या रुपाने दुथडी भरुन वहात राहिला, परंतु महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाच्या संदर्भात दुर्लक्षित राहिला हे महाराष्ट्राचे दुर्दैव !

आदरणीय श्री मोहननाथ महाराज हे याच परंपरेतील अधिकारी, सत्शील व भाविक अंतः करणाचे पुण्यपुरूष! त्यांनीच आपली परंपरा उपलब्ध पुराव्यांच्या व परंपरेतील सत्पुरुषांकडून चालत आलेल्या माहितीच्या आधाराने मांडणे यांस विशेष मूल्य आहे.

या ग्रंथाची त्यांच्या परंपरेच्या दृष्टीने खूप आवश्यकता होती. यामुळे अनेक व्यर्थ कल्पना, गैरसमज आणि निराधार तर्कांना तिलांजली मिळेल!

नाथसंप्रदायाचा आचार-विचार, तत्त्वज्ञान आणि चरित्रे यांची छान मांडणी केली आहे. तत्त्वज्ञानाचा व चरित्राचा अधिक विस्तार झाला असता तरीही आनंद वाढता राहिला असता. त्यांच्या शिष्यांनी लिहिलेले त्यांचे चरित्रही संयुक्तिक व ग्रंथशोभा वृद्धिंगत करणारेच आहे. या निमित्ताने श्री मोहननाथ-उद्बोधनाथांच्या रुपाने ही परंपरा अखंडित, अक्षुण्ण व अनवरत चालत राहिल हे ही सर्वांना कळेल!

आदरणीय श्री मोहननाथ महाराजांना धन्यवाद दिले पाहिजेत. अशा प्रामाणिक ग्रंथाची इतिहासाला खूप आवश्यकता असते. इतिहासात दुर्लक्षित राहिलेली सोनेरी पाने या ग्रंथाने उजळुन निघतील असा विश्वास वाटतो. कृपाशीर्वादासाठी संत व भगवच्चरणी प्रार्थना करतो!

भवदीय
श्री. चैतन्य भानुदास महाराज देगलूरकर

■■■

# अभिप्राय

**डॉ. श्री. रवींद्र अंबादास मुळे**
**उपाध्यक्ष :** महर्षि सांदीपनि राष्ट्रीय वेदविद्या प्रतिष्ठान, उज्जैन

|| श्रीराम ||

**देवाच्या सख्यत्वासाठी। पडाव्या जिवलगासी तुटी ।।**
**सर्व अर्पावि सेवटी । प्राण तोही वेचावा ।।- समर्थ**

देवकार्यासाठी समर्पित जीवन जगणाऱ्या महात्म्यांची चरित्रे मानवाला जीवन जगण्याची प्रेरणा देत असतात, अशा संतांची जीवनचरित्रे सांगणारा हा ग्रंथ !

नाथसंप्रदायावर अनेक विद्वानांनी विपुल लिखाण केले आहे. परंतु ज्ञानेश्वरांनंतर होऊन गेलेल्या नाथसंप्रदायातील महापुरुषांवर तितकेसे लिखाण झालेले नाही, म्हणूनच ज्ञानदेवांनंतर झालेल्या नाथसंप्रदायातील गुप्तनाथ, उद्‌बोधनाथ, केसरिनाथ इत्यादी बारा नाथांचा परिचय देण्याचा प्रामाणिक आणि यशस्वी प्रयत्न या ग्रंथाच्या रूपाने आदरणीय मोहननाथमहाराजांनी केला आहे. ज्ञानेश्वरोत्तर काळातील संप्रदायातील संतांचा आणि प्रामुख्याने देऊळगावराजा संस्थानचे आद्य प्रवर्तक नरहरिनाथ आणि त्यांच्या परंपरेतील महापुरुष यांचा परिचय देणे हा या ग्रंथाचा उद्देश आहे.

नरहरिनाथांचे पुत्र आणि सच्छिष्य विठ्ठलनाथ यांचे शिष्य श्री गणेशनाथ यांच्यापासून वंशपरंपरेने देऊळगावराजाच्या पीठावर गौतमनाथ, भानुनाथ याही महात्म्यांनी काम केले. या महात्म्यांच्या समाध्या या ठिकाणी आहेत. ज्ञानदेव परंपरेतील केसरिनाथ, लक्ष्मीनाथ यांच्या समाध्या आळंदी येथे ज्ञानदेवांच्या मंदिरात एकनाथ महाराजांच्या पाराजवळ आहेत. याच परंपरेतील देऊळगावराजा हे पीठ असल्याने एका ज्येष्ठ परंपरेचा मान या पीठास आहे . प्रस्तुत ग्रंथात परंपरेतील अनेक संतांचे चरित्र साकारल्यामुळे अनुयायांना साधनेचा मार्ग खुला करून दिला आहे . संतांचे चमत्कार हे चमत्कार न राहता तो त्यांचा सहजभाव असल्याचे लक्षात येते. नियति, निसर्ग यांवर नियंत्रण ठेवण्याचे सामर्थ्य संतांमध्ये असले तरी साधनेद्वारा प्राप्त होणाऱ्या सिद्धींच्या अतीत होण्याचा संदेश ग्रंथातून प्राप्त होतो.

ग्रंथातील काही वाक्ये जीवनाला प्रेरणा देणारी, साधनेकडे प्रवृत्त करणारी आहेत. ''खरेतर माणसाजवळ विश्वास, श्रद्धा, प्रेम, चिकाटी, अनन्य भक्ती असेल तर गुरुकृपा व्हायला वेळ लागत नाही,'' हा या ग्रंथातील संदेश सांसारिकांच्या मनावरील ताण कमी करणारा आहे. जीवनात पैसा महत्त्वाचा की साधना याचा विचार करताना महाराज म्हणतात - ''आम्ही अशा कुटुंबात जन्मलो आहोत की जेथे पैशापेक्षा, शिक्षण व धन साठवण्यापेक्षा दान करणे हे जास्त महत्त्वाचे आहे.''

प्रस्तुत ग्रंथात संतांच्या सहवासात आलेले भक्तांचे अनुभव मांडले आहेत. त्यामुळे हे अनुभव

आणि संतांची अनुभूती हे अत्यंत जवळचे वाटतात. ग्रंथातील काही वर्णने प्रामुख्याने देऊळगावराजा येथील मठ, अमना नदीचा तीर ही अत्यंत हृदयंगम झालेली आहेत. परंपरेत म्हटल्या जाणाऱ्या काही पद्यांचे संकलन हाही एक या ग्रंथाचा विशेष म्हणावा लागेल. नरहरिनाथांविषयीच्या कटिबंधात म्हटले आहे -

**''नरहरि नाथ सद्‌गुरु माझा बाप कैवारी ।**
**आसनी, शयनी जपता मजला तारिल संसारी ॥''**

याठिकाणी साधलेला कैवारी, संसारी हा अनुप्रास किंवा अन्य एका पद्यातील उतारी, अवतारी, तारी, जरतारी हे अनुप्रास पद्यांना लय देतात. चित्ताला आकर्षित करतात. अनेक पद्यांमध्ये रूपात्मक वर्णने आली आहेत. **''आत्मा त्वं गिरिजा मतिः, सहजराः प्राणाः, शरीरं गृहम् ।** शिवमानसपूजेतील या पंक्तीची आठवण होते. ''जाई जुई चंपक अहंकार जाणा'' हा अहंकार भगवंताला समर्पण करायचा आहे. तसेच- **'भाव तुलसी'** भाव हा तुलसीदासाप्रमाणे पवित्र आहे. तो पवित्र भाव परमेश्वराच्या ठिकाणी ठेवायचा आहे. याप्रकारची वर्णने पद्यांमध्ये बर्याच ठिकाणी आली आहेत. ही सारी नादमधुर व भावमधुर पद्ये प्रस्तुत ग्रंथाला अधिक उपयुक्त बनवत आहेत. या परंपरेतील सर्व महात्म्ये भक्तिनिष्ठ आहेत. ज्ञानासक्त आहेत आणि कर्मनिष्ठ आहेत. हे वैशिष्ठ्य ग्रंथ वाचताना लक्षात येते.

आदरणीय मोहननाथ महाराज आणि त्यांचे चिरंजीव उद्‌बोधनाथ यांनी आपली परंपरा ''तेजस्विनावधीतमस्तु'' या तत्त्वाने नेहमी तेजस्वी रहावी यासाठी ग्रंथनिर्मिती करून केलेले प्रयत्न निश्चितच यशस्वी झाले आहेत असे वाटते. ही परंपरा अखंड दीर्घकाळ चालो ही प्रभु रामचंद्रांच्या चरणी प्रार्थना

■■■

# ॥ संपादकीय ॥

संतश्रेष्ठ सद्‌गुरु श्री ज्ञानेश्वर महाराज प्रणित नाथ परंपरा लोकाभिमुख व्हावी, सर्व स्तरावर या परंपरेचा प्रचार प्रसार व्हावा, ही प. पू. बाबांची अनेक वर्षांची इच्छा होती. याच उद्देशाने प. पू. बाबांनी या ग्रंथाचे लिखाण केले.

ज्या ग्रंथात इतक्या महत्त्वाच्या, संशोधनाच्या विषयाचे लिखाण आहे, असा ग्रंथ संपादन करण्याची माझी मुळीच योग्यता नाही आणि ज्या श्रेष्ठ व्यक्तिंचे, जेष्ठ अभ्यासकांचे, विद्वज्जनांचे या ग्रंथाला प्रस्तावना-अभिप्राय लाभले आहेत तो हा ग्रंथ मी संपादित केला असे म्हणणे हस्यास्पद होईल. पण हे केवळ श्री महिपतीनाथ महाराजांच्या उक्तिप्रमाणे झाले आहे.

**समर्थांचे घरचे श्वान । त्यासी सर्वही देती मान ॥**

केवळ नाथांच्या द्वारीचा सेवक असल्यामुळे मला हे सद्‌भाग्य प्राप्त झाले. हा ग्रंथ माझ्यासारख्या मतिहीन बालकाकडून संपादित होणे, हे सद्‌गुरुनाथ महाराजांच्या कृपाकटाक्षाशिवाय असंभवच आहे. ही केवळ सद्‌गुरु कृपाच आहे.

या ग्रंथाची प्रस्तावना लिहून आदरणीय प्रा. डॉ. सदानंद मोरे सरांनी या ग्रंथास साहित्य क्षेत्रात एक बैठक प्राप्त करुन दिली, तसेच ह. भ. प. शांतीब्रह्म गु. मारोती महाराज कुरेकर (बाबा), ह. भ. प. श्री चैतन्य महाराज देगलुरकर, डॉ. अभयजी टिळक, प्रा. डॉ.रविंद्र मुळे सर यांच्या अभिप्रायाने या ग्रंथाला अधिक शोभा आली. यामुळे अनेक क्षेत्रातील वाचक वर्गाचे याकडे लक्ष जाईल.

ग्रंथ संपादनाचे वेळी गुरू भक्त सदाशिव महाराज पुरंदरे, स्वामी स्वरुपानंद सरस्वती (मठाचे जेष्ठ सेवक/चोपदार) यांचे मार्गदर्शन मला मिळाले.

आदरणीय प्रा. डॉ. रविंद्रकाका मुळे यांनी, अभिप्रायासह त्यांचा बहुमूल्य वेळ देऊन या ग्रंथाची तपासणी (प्रुफ) करून खूप मोठे योगदान दिले. या सर्व जेष्ठ-श्रेष्ठ अभ्यासक, विद्वज्जनांना मी प्रणाम करुन सदैव त्यांच्या ऋणात राहणे पसंत करतो. (धन्यवाद वा मनःपूर्वक आभार मानावे इतका मी मोठा नाही)

तसेच माझे स्नेही ह. भ. प. उमेश महाराज बागडे, संतसाहित्याचे अभ्यासक व नाथ परंपरेचे उपासक श्री. स्वप्नीलजी कापसीकर, संतसाहित्याचे अभ्यासक ह. भ. प. सचिन महाराज पवार यांचे या सर्व कार्यात सहकार्य मिळाले मी त्यांना धन्यवाद देतो व सदैव अशाच स्नेहाची अपेक्षा करतो.

श्रीपाद सुपनेकर (पुणे) यांचे संपादन सेवेत सहकार्य मिळाले, त्यांचेही आभार. दिपक दिवटे (पुणे) यांनी संपूर्ण टायपिंग केले, त्यांचेही मला येथे आभार मानावे वाटते आणि मुखपृष्ठ, मांडणी व मुद्रणाचे काम आदित्य आपटे (पुणे) यांनी अत्यंत आपलेपणाने केले व अमित आपटे (सोलापूर) यांनी शीर्षकाचे उत्कृष्ट अक्षरसुलेखन केले त्यांचेही खूपखूप आभार.

केवळ पंरपेरेचा प्रचार हा हेतू असल्यामुळे या ग्रंथाचे प्रचार मूल्य अत्यंत माफक ठेवलेआहे. जास्तीत जास्त भाविक याचा लाभ घेतील ही अपेक्षा.

यात जे चांगले (बरोबर) असेल ते प. पू. बाबांचे आणि जे बरोबर नसेल ते माझे.

**तरी न्यून तें पुरतें। अधिक ते सरतें।**
**करूनि घेयावें हे तुमतें। विनवितु असें ॥ ज्ञा. अ. १-८०**

■■■

आपला विश्वासू,
**उद्‌बोध मोहननाथ महाराज पैठणकर**

# नाथसंप्रदायाचा
# उगम, ध्येय व विस्तार

# •।। नाथसंप्रदायाचा उगम व ध्येय ।।•

नाथ संप्रदाय हा अनादी संप्रदाय आहे. त्यामुळे हा संप्रदाय नेमका केव्हा, कुठे आणि कसा सुरू झाला हे सांगणे कठीण आहे. कालातीत असलेल्या या नाथ संप्रदायाचे भगवान श्री आदिनाथ (शंकर) हे मूळ व उपास्य दैवत आहे. परंतु हा संप्रदाय हा आपल्या भारतीय वैदिक संस्कृतीचेच एक उपांग आहे. ही संस्कृती देखील अनंत कालापासून चालत आलेली आहे. सत्यावर विश्वास ठेवणारा आपला धर्म सनातन आहे. याला सनातन वैदिक हिंदू धर्म म्हणतात. या हिंदू धर्माचे पालन व प्रचार-प्रसार करण्याचे प्रमुख कार्य ऋषीमुनींनी केले. आपल्या भारत वर्षात अनेक ऋषी, साधू - सत्पुरुष होऊन गेले. त्याचप्रमाणे त्या कालखंडात विविध आक्रमणेही झाली. परंतु जेव्हा जेव्हा धर्मावर व संस्कृतीवर विपरित शक्तींचा वार होतो, वेदबाह्य मतमतांतरांचा ऱ्हास होतो आणि झाला, तेव्हा तेव्हा या साधुपुरुषांनी, ऋषीमुनींनी त्यांचे खंडन केले व वैदिक धर्माची प्रतिष्ठा पूर्ववत केली. अशाच महान कार्यासाठी नाथपंथामध्ये जन्म झाला तो मच्छिंद्रनाथ शिष्य गोरक्षनाथांचा. भारताच्या वैदिक गुरु-शिष्य परंपरेमध्ये मच्छिंद्रनाथ गोरक्षनाथ या गुरु शिष्यांचे नाव कलशस्थानी शोभण्यासारखे / शोभणारे आहे. गोरक्षनाथ व त्यांचे गुरु मच्छिंद्रनाथ यांच्या जीवन चरित्राविषयी अनेक कथा आहेत. यातल्या अनेक कथा लोकप्रियही ठरलेल्या आहेत. पण गुरु-शिष्याचे हे नाते आध्यात्मिक स्वरूपात आणि शास्त्रशुद्ध शब्दात वर्णन केले ते श्री ज्ञानेश्वर महाराजांनी. भगवती ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायात ज्ञानेश्वरनाथांनी आपली गुरु परंपरा वर्णन केलेली आहे. त्यामध्ये मच्छिंद्रनाथांच्या चरित्राचे जे वर्णन माऊलींनी केले आहे ते सर्वमान्य मानले गेले आहे.

**क्षीर सिंधू परिसरी । शक्तिच्या कर्ण कुहरी ।**
**नेणों कै श्री त्रिपुरारीं। सांगितलें जे ॥१७५१॥**
**तें क्षीरकल्लोळाआंतु । मकरोदरीं गुप्तु ।**
**कोता तयाचा कातु । पैठे जाले ॥१७५२॥**
**- ज्ञानेश्वरी अ. १८**

याचा सामान्य भाषेतील अर्थ असा की, क्षीर समुद्राच्या परिसरामध्ये एका द्वीपावर भगवान शंकरांनी म्हणजे आदिनाथांनी पार्वतीच्या कानात (उमेच्या कानात) एकदा बोध केला.का बोध करत असताना त्या तीराजवळील पाण्यातील एका माशाने तो ऐकला. त्या माशाला ते दिव्यज्ञान प्राप्त झाले तेच मच्छिंद्रनाथ होय. हठयोग प्रदिपिकेवरील ब्रह्मानंद कृत टीकेत अशाच आशयाचे वर्णन आलेले आहे. या कथेची विविध रूपांतरे नवनाथ भक्तिसार व इतर ग्रंथात आढळतात. जी सर्वसामान्य वाचकांनाही ठाऊक आहेत.

याचाच अर्थ मच्छिंद्रनाथांना प्रत्यक्ष भगवान श्री आदिनाथांपासून ज्ञान प्राप्त झाले. त्यांना

कोणी मानवी गुरु नव्हते. मच्छिंद्रनाथांचे चरित्र तसे अनेक अंगांनी विभागलेले आहे, विस्तारलेले आहे. परंतु सदर पुस्तकाचे प्रयोजन वेगळे असल्याकारणास्तव त्याचा इथे उल्लेख न करणे उचित ठरेल. पुढे मच्छिंद्रनाथांनी समाधी अनंताचा सुखोपभोग घेण्याच्या इच्छेने ते गुह्यज्ञान आपले शिष्य श्रीगोरक्षनाथांना दिले. याचेही वर्णन ज्ञानेश्वर महाराजांनी त्यांच्या रसाळ शब्दांमध्ये केले आहे.

**मग समाधी अव्यत्यया । भोगावीवासना या ।**
**ते मुद्रा श्री गोरक्षराया । दिधली मिनीं ॥१७५४॥**
**तेणे योगाब्जिनी सरोवर । विषयाविध्वंसैकवीर ।**
**तियें पदी का सर्वेश्वर । अभिषेकिले ॥१७५५॥**
**- ज्ञानेश्वरी अ. १८**

संपूर्ण ज्ञानेश्वरीमध्ये माऊलींची रसाळ वाणी अनुभवास येते. त्यातील अलंकार व रूपके ही मराठी भाषेचे अमृतस्वरूप चाखावयास देतात. इथेही श्री ज्ञानेश्वर महाराजांनी गुरु गोरक्षनाथांना 'योगाब्जिनी सरोवर' (योगरूपी कमळाचे सरोवर) आणि 'विषयविध्वंसैक वीर'' (विषयांचा नाश करण्यात शूर असलेले) अशा महान उच्च विशेषणांनी गौरविले आहे. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी श्रीगुरु गोरक्षनाथांचे केलेले हे वर्णन म्हणजे श्रीगुरूंचा महिमाच गायला आहे. निष्कलंक चारित्र्य, कुशाग्र बुद्धिमत्ता व परमोत्कट गुरुभक्ती यामुळे गोरक्षनाथांचे व्यक्तिमत्व हे अनेक महापुरुषांचे प्रेरणास्थान ठरले. शिष्य कसा असावा याचे आदर्श उदाहरण म्हणजे गुरु गोरक्षनाथ. ज्यांच्यापासूनच गुरुभक्ती खऱ्या अर्थाने नावारूपास आली. याचा उल्लेख नाथस्तोत्रातही केलेला आढळतो.

**गुरुभक्तिजेथोनी रूपास आली । महासिद्धता ज्या पासोनी व्यक्त झाली ।**
**कसा धावण्या धावतो दिन काजा । नमस्कार गोरक्ष नाथासी माझा ॥ - नाथस्तोत्र**

गोरक्षनाथांच्या जीवनातील अनेक घटना सुरस व चमत्कारिक आहेत. त्यामुळे लोकमानसात त्या चांगल्या रुजलेल्या देखील आहेत. परंतु या कथांमधून उलगडणारे श्रीगुरु गोरक्षनाथांचे शिष्यत्व हा देखील अनेकांसाठी अभ्यासाचा व प्रेरणेचा विषय आहे. या सर्वच कथा गुरुभक्तीचा अत्युच्च आदर्श निर्माण करणाऱ्या आहेत. उदाहरणच द्यायचे झाले तर आपल्या गुरूंनी मागितलेल्या वड्यासाठी आपला डोळा काढून देण्याची घटना पाहा. देहासंबंधी कोणतीही आसक्ती न बाळगता गुरूंच्या प्रति समर्पित वृत्ती कशी असावी याचे हे सर्वोत्कृष्ट उदाहरण ठरावे. जे गोरक्षनाथांच्या ठिकाणी असलेल्या गुरुभक्तीची जाणीव करून देते. गोरक्षनाथांचा मार्ग हा जरी नाथपंथीय असला तरी तो उपनिषदांनी सांगितलेला राजयोगच आहे याची साधक, जिज्ञासू व मुमुक्षूंना कल्पना येऊ शकते. या मार्गाने जाण्याचा सर्वांनाच अधिकार आहे. यासाठी साधकास नीतियुक्त आचार आणि प्रखर वैराग्य यांचीच गरज असते. अध्यात्म साधनेत अनेक मार्ग आपल्याकडे दिसतात. व्रत-वैकल्यांपासून खडतर

तपश्चर्यांपर्यंत अनेक साधनाही केल्या जातात. परंतु इतर कोणत्याही मार्गाने जे साध्य होणे अत्यंत कठीण असते ते खऱ्या गुरूच्या केवळ शब्दाने साधकाला विनासायास प्राप्त होत असते हे अभ्यासूंनी विशेष करून लक्षात घ्यायला हवे. **गुरुरत्नसन्मार्गदर्शनशिलः ।** असा स्वतः गोरक्षनाथांचा सिद्धांत आहे. यामुळे नाथ संप्रदायात गुरुभक्तीला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. योगाभ्यास करणाऱ्या साधकांना सिद्धींचे व चमत्काराचे प्रचंड आकर्षण असलेले दिसते. ही शक्ती आपल्यास प्राप्त व्हावी या हेतूने अनेकजण या मार्गाकडे वळलेलेही दिसतात. परंतु चमत्कार करण्याची शक्ति-सिद्धी प्राप्त कोणे हे योग्याचे ध्येय नव्हे हे आपण लक्षात घ्यायला हवे. खरेतर या शक्ती किंवा सिद्धी हे योग मार्गातील वरदान नसून फार मोठे विलोभनीय असे विघ्न आहे. ज्ञान प्राप्तीसाठी शाळेत निघालेला विद्यार्थी जसा रस्त्यातील गारूड्याच्या किंवा जादूगाराच्या खेळात रमून जातो व शाळेत जात नाही. त्याचप्रमाणे या सिद्धींच्या मागे लागणाऱ्या साधकांची अवस्था होते. सत्यज्ञानाची आस असलेल्या साधकाने याच्या पलिकडे जाणे अत्यंत गरजेचे आहे. काही जणांना प्रयत्नांनी यातील काही सिद्धी व शक्ती प्राप्त देखील होतात आणि ते मग स्वतःला योगी मानू लागतात. परंतु ते वास्तविक पाहता सत्य नाही. सिद्धीप्राप्त असा मनुष्य समाजासोबतच स्वतःला फसवत असतो. भगवान श्रीकृष्णाने योगी कसा असावा याविषयी श्रीमद्भगवतगीतेतील **संतुष्टः सततं योगी ॥** या श्लोकात योग्य मार्गदर्शन केले आहे. याच 'योगी' पदावर भाष्य करताना श्री ज्ञानेश्वर महाराज योग्याची यथार्थ व्याख्या सांगतात.

**जीवू परमात्मा दोन्ही ।बैसविले ऐक्यासनी ।**
**जयाच्या हृदय भूवनी । विराजती॥**

जीव आणि परमात्मा हे दोन्ही एकाच आसनावर बसले आहेत आणि हे आसन कुठे आहे तर योग्याच्या हृदयामध्ये. असे थोर योगी गोरक्षनाथ व ज्ञानेश्वर महाराज हेच असू शकतात. नामदेवराय तर श्री ज्ञानेश्वर महाराजांना योग्यांचीही माऊली म्हणतात.

**ज्ञानराज माझी योग्यांची माऊली । जेणे निगमवल्ली प्रगट केली ॥ ना. म.**

आपले अध्यात्मशास्त्र अनेक अंगांनी परिपूर्ण आहे. यामध्ये पारमार्थिक व ऐहिक अशा दोन्ही गोष्टींचा विचार केलेला आढळतो. या शास्त्राचा वापर करून इहलोकात व परलोकातही हवे ते प्राप्त करता येते, साध्य करता येते. या शास्त्रातीलच तंत्र, हठ, अथवा रसशास्त्र ही शरीर अमर करण्याची शास्त्रे आहेत. ज्यांचा अभ्यास करून, त्याविषयी ज्ञान मिळवून हे नश्वर शरीर अनेक काळापर्यंत टिकवता येते. पण गोरक्षनाथांचा जो पंथ आहे तो देहापुरता मर्यादित कधीच नव्हता. या पंथाचा गुरु परंपरेने श्री ज्ञानेश्वर महाराजांनी स्वीकार केला तो हा पंथ आत्म्याचे अमरत्व अनुभवण्या करिता, ब्रह्मात्म्यैक्याचा आनंद भोगण्याकरिता आणि शिव-शक्तिच्या सामरस्याचा आनंद भोगण्याकरता आहे. अनादी कालापासून चालत आलेल्या जीवब्रह्मैक्यज्ञानाचे म्हणजे अद्वैतमताचेच नाथ संप्रदायाने

प्रतिपादन केलेले आहे. ज्याचा प्रचार-प्रसार पुढे जगद्‌गुरु शंकराचार्यांद्वारे झालेला दिसतो. (ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या व जीवो ब्रह्मैवनापरः) मत्स्येंद्र संहिता नामक संस्कृत ग्रंथात एक श्लोक आलेला आहे.

**सृष्टेः पुरा सदेवासीदेकमेवाद्वितीयकम् ।**
**सत्यं ज्ञानमनन्तं यत् वेदेत्थं ब्रह्मलक्षणम् ॥**

हे ब्रह्माचे लक्षण अनेक अभंगातून संतानी वर्णिले आहे.

**सत्य ज्ञानानन्त गगनाचे प्रावर्ण्य । नाही रूप वर्ण गुण जेथे ॥ ज्ञा. म.**

याच अद्वैतमताचे श्री ज्ञानेश्वर महाराजादी संतांनी प्रतिपादन केलेले आहे. केवळ एक ब्रह्मच सत्य आहे व ब्रह्माच्या ठिकाणी असलेल्या अतर्क्य, अतिगुढ अशा चित् शक्तीमुळे सृष्टी निर्माण झाली (या शक्तीलाच माया, प्रकृती असे म्हणतात) श्रीगोरक्षनाथकृत सिद्धसिद्धांतपद्धती या ग्रंथात या शिवशक्ती ऐक्याचे वर्णन आलेले आहे.

**आदिनाथं नमस्कृत्य शक्तियुक्त जगद्‌गुरुम् ।**
**वक्ष्ये गोरक्ष नाथोहं सिद्धसिद्धान्तपद्धतिम् ॥**

शक्तियुक्त शिव हेच अंतिम सत्य आहे. ते स्वयंप्रकाश, स्वसंवेद्य, अविनाशी आहे.

**शिवस्याभ्यन्तरे शक्तिः शक्तेरभ्यन्तरे शिवः।**
**अन्तरं नैव जानीयात् चंद्रचंद्रिकयोरिव ॥**

शिव आणि शक्ती यांचा अभेद आहे. चंद्र-चंद्रिकेप्रमाणे त्यांचा अन्योन्य संबंध आहे.

**माया तेचि ब्रह्म, ब्रह्म तेचि माया । अंग आणि छाया जया परि॥**
**सत्पद ते ब्रह्म, चित्पद ते माया । आनंदपदीं जया म्हणती हरि॥**

श्री ज्ञानेश्वर महाराजांनी अमृतानुभवाच्या प्रथम प्रकरणात हे शिवशक्ति समावेशन प्रकृती-पुरुष या संज्ञेने वर्णिले आहे.

**जेणे देवे संपूर्ण देवी । जियेंविण काहीना तो गोसावी ।**
**किंबहुना एकोपजीवी । एक एकाची ॥१०॥**

**जिही एक एकाविण । न कि जे तृणाचेही निर्माण।**
**जिये दोघे जीवप्राण । जिया दोघा ॥१२॥**

**अमृतानुभव प्रकरण १**

या साऱ्या श्लोकांचे तात्पर्य नाथ संप्रदायाचे ध्येय विशद करते. ते म्हणजे शिव-शक्ती ऐक्याचा आनंद उपभोगणे, शरीर हे आत्म्याचे मंदिर आहे. या शरीराचे शोषण न करता आत्म्याचे अमरत्व अनुभवणे हेच या पंथाचे मूळ ध्येय आहे.

याच ध्येयाने श्रीगुरु गोरक्षनाथांनी आपल्या शिष्यांना प्रबोधित केले. पुढे याच शिष्यांकरवी या नाथ संप्रदायाचा वृक्ष संपूर्ण भारतभर पसरला. गोरक्षनाथांनी श्रीगहिनीनाथांना उपदेश केला, त्यातही हाच अद्वैतबोध आढळतो. ज्याचे वर्णन श्री ज्ञानेश्वर महाराज भगवती ज्ञानेश्वरीच्या आठराव्या अध्यायात करतात.

**मग तिहीं ते शांभव । अद्वयानंद वैभव । संपादिले सप्रभव । श्री गहिनीनाथा ॥ १७५७॥**
**- ज्ञानेश्वरी अ. १८**

गुरुगोरक्षनाथांनी भगवान श्री शंकरापासून प्राप्त झालेले अद्वयानंदाचे वैभव, ऐश्वर्य मुळासहित श्री गहिनीनाथांना दिले. महाराष्ट्राच्या दृष्टीकोनातून श्री गहिनीनाथांचे स्थान विशेष उल्लेखनीय ठरते. कारण श्रीगहिनीनाथांमुळेच महाराष्ट्रात नाथ संप्रदायाचा विस्तार झाला. नाथ संप्रदायातील प्रत्येक संतांनी गुरु भक्तीवर विशेष भर दिला. सर्व साधनांचे सार काय असेल तर ती केवळ गुरु भक्ती! श्री गहिनाथकृत गहिनीप्रताप नामक ग्रंथात गुरूंची अनिवार्य अवश्यकता वर्णन केली आहे.

**गोरखसुत गहिनी कहे नाथ पंथ की बानी।**
**ग्यानी जानत गुरुपुत होत सोही चढे गिरबानी ॥**

श्री गहिनीनाथांचे अल्पचरित्र नवनाथ भक्तिसाराच्या दहाव्या अध्यायात आलेले आहे. श्री गहिनीनाथांनी श्रीगुरु निवृत्तिनाथांना अनुग्रह देऊन महाराष्ट्राला अमोल देणगी दिली. गुरु गहिनीनाथांनी श्रीगुरु निवृत्तिनाथ यांना जी आज्ञा केली ती श्री गुरु ज्ञानेश्वर महाराज भगवती ज्ञानेश्वरीत सांगतात.

**तेणे कळिकळितु भूतां । आला देखोनि निरुता ।**
**ते आज्ञासी निवृत्तिनाथा । दिधली ऐसी ॥१७५०॥**

**ना आदिगुरु शंकरा । लागोनी शिष्य परंपरा ।**
**बोधाचा का संसारा । जालो जो आमुते ॥१७५८॥**

**तों कां तु घेऊनी आघवा । कळीं गिळितया जीवा ।**
**सर्व प्रकारी धावा । करीं पा वेगी ॥१७५९॥**

**- ज्ञानेश्वरी अ. १८**

''भगवान श्री शंकरापासून हा जो बोधाचा विस्तार परंपरेने आमच्या पर्यंत आला तो कलीच्या तापाने त्रस्त झालेल्या सर्व जीवांना देऊन सकल दुःखापासून मुक्त कर'' गहिनीनाथांनी श्रीगुरु निवृत्तिनाथांना केलेला हा दोन ओव्यांचा उपदेश संपूर्ण भारताच्या नव्हे संपूर्ण विश्वाच्या हिताचे कारण ठरला. निवृत्तिनाथांचे आजी व आजोबा श्री गोविंदपंत व निराबाई यांनाही श्री गहिनीनाथांचा अनुग्रह होता असे काही प्रमाणावरून कळते

आणि हेच ज्ञान श्रीगुरु निवृत्तिनाथांनी श्री ज्ञानेश्वर महाराजांना दिले आणि पुन्हा एकदा मच्छिंद्र-गोरक्ष या गुरुशिष्यांसारखी किंबहुना त्याहुनही थोर गुरुशिष्यांची जोडी सनातन वैदिक परंपरेला लाभली.

यामुळेच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात नाथ संप्रदायाचे स्थान अनन्य साधारण बनले. श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या ठायी असलेल्या प्रतिभाशक्तीचा, असामान्य बुद्धिमत्तेचा, अकारण करूणेचा, अलौकिक वात्सल्याचा, आणि प्रतिभाशक्तिचा भावमय आविष्कार ज्या ग्रंथात झाला तो ग्रंथ (भगवती ज्ञानेश्वरी) म्हणजे नाथसंप्रदायाने, श्रीगुरुनिवृत्तिनाथांनी त्यांना दिलेला अद्वयानंद वैभवाचा वारसा आहे असे श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

**एवं गुरुक्रमे लाधले । समाधी धन जे आपुले ।**
**ते ग्रंथ बोधौनि दिधले। गोसावी मज ॥१७६३॥ - ज्ञानेश्वरी अ. १८**

श्री ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या समग्र ग्रंथ वाङ्मयात कंठरवाने प्रकर्षाने उद्घोषित केलेली व जीवनभर आचरलेली/अंगीकृत केलेली गुरुभक्ती किती उत्कट होती हे सर्वांना ज्ञात आहे. ज्ञानापेक्षाही गुरुभक्तीचे रसाळ महत्त्व त्यांनी सर्वांना जाणवून दिले.

'मला जे काही ज्ञान झाले ते केवळ गुरु कृपेनेच' असे अनेक अभंगातुन, ओव्यांमधून ज्ञानेश्वर महाराज सांगतात.

**ज्ञानदेव म्हणे तरलो तरलो । आता उद्धरलो गुरुकृपे ॥ ज्ञा.म.गाथा**

**ज्ञानदेव म्हणे निवृत्ती निर्गुण । दिधले संपूर्ण माझे काती ॥ ज्ञा.म.गाथा**

**मज हृदयी सद्गुरु । जेणे तारिलो का संसार पुरू ।**
**म्हणवूनि विशेषे अत्यादरु। विवेकावरी ॥ - ज्ञानेश्वरी अ. १**

एवढंच नव्हे तर श्री ज्ञानेश्वर महाराजांनी भगवती ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात 'अमानित्वम् अदंभित्वम् ।' या श्लोकातील 'आचार्योपासनम्' या पदावर चिंतन करताना जे गुरु सेवेचे वर्णन केलेले आहे ते असामान्य आहे. जणू ज्ञानेश्वर महाराजांची गुरुभक्तीच त्या ओव्यांच्या रूपाने

शब्दात बद्ध झाली/प्रगट झाली. त्यांच्या या प्रगाढ गुरुभक्तीचा अनेक संतांनीही गौरव केला. ज्ञानेश्वर महाराज हे विश्वाचे मातृ-पितृतीर्थ आहे.

**ज्ञानदेव माता ज्ञानदेव पिता ॥ सेना महाराज.**

''श्री ज्ञानेश्वर महाराजांसारखा महामानव निर्माण करून नाथ संप्रदायाने भारतीय साधनेच्या इतिहासात आपले नाव चिरस्थायी बनविले'' असे नाथसंप्रदायाचे अभ्यासक स्व. डॉ. रा. चिं. ढेरे म्हणतात. **'आता विश्वात्मके देवे'** अशा विश्वंभराजवळ 'पसायदान' मागणाऱ्या श्री ज्ञानेश्वर महाराजांमुळेच महाराष्ट्रातील नाथ संप्रदायाचे महत्त्व स्थानिक पातळीवर मर्यादित न राहता वैश्विक स्वरूपाचे झाले. श्री ज्ञानेश्वर महाराजांनी जगदोद्धाराकरिता, ब्रह्मज्ञानाचा सुकाळ करण्याकरिता भगवती ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, हरिपाठ, चांगदेव पासष्टी, अभंग गाथा हे ग्रंथ वाङ्मय निर्माण केले. त्यात भगवती ज्ञानेश्वरी व अमृतानुभव हे ग्रंथ तर काव्य, साहित्य, तत्त्वज्ञान या तीनही क्षेत्रात जगाच्या वाङ्मयातही अजरामर ठरतील असे आहेत. श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या रूपाने साक्षात भगवान श्रीकृष्णानेच मराठीत गीतार्थ सांगितला.

**अर्जुना संकट पडता जडभरि। गीता संगे हरि कुरूक्षेत्री ॥२॥**
**तोचि अवतार धरी अलंकापुरी । ज्ञानाबाई सुंदरी तारावया ॥३॥**

ज्ञानेश्वर महाराजांनी विश्वात्मक देवाकडे म्हणजेच आपल्या सद्गुरू श्री निवृत्तिनाथांकडे विश्वकल्याणाची प्रार्थना केली. पसायदानावरून श्री ज्ञानेश्वर महाराजांचे अलौकिक औदार्य, विश्वातील सर्व प्राणीमात्राविषयी असलेली अकारण करूणा दिसून येते. ज्ञानेश्वर महाराजांच्या ग्रंथाची थोरी, श्रेष्ठत्व, प्रताप वर्णन करायचा झाल्यास त्यावर स्वतंत्र एक पुस्तक लिहुनही ते अपुरेच राहिल.

**शाब्दिकाचे काम नाही येथे ॥**

असे हे महाराजांचे अवर्णनीय कार्य आहे. श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या आध्यात्मिक वैभवामुळे, सामान्य जीवनशैलीमुळे आणि प्रगल्भ विचारांमुळे महाराष्ट्रात नाथ परंपरा अविकृत राहिली, बाह्यावडंबरापासून अलिप्त राहिली. नाथपंथीयांचा हाच थोर वारसा या परंपरेतील पुढील संतांनी काळासोबत पुढे नेला. बाह्याचारावर विशेष भर न देता पुढील परंपरेतील या सत्पुरूषांनी श्रीगुरु निवृत्तिनाथ व श्रीगुरू ज्ञानेश्वर महाराजांनी दिलेल्या अद्वयानंद वैभवाची लूट करण्यातच आपली धन्यता मानली. त्यामुळेच महाराष्ट्रातील नाथ संप्रदाय सदैव सामान्य जनमानसावर इष्ट परिणाम घडवित आहे / राहिला.

ज्ञानेश्वर महाराजांनी हे गुह्य ज्ञान खऱ्या अर्थाने जनसामान्यांसाठी खुले केले असे म्हणणेच उचित ठरेल. वर उधृत केल्याप्रमाणे भगवान श्री आदिनाथांपासून शिष्य परंपरेने प्राप्त केलेले ज्ञान

अद्वयानंद वैभव हे सर्वसामान्यांना अगदी अशिक्षितांनाही मिळावे या हेतूनेच महाराजांनी वारकरी संप्रदाय प्रस्थापित केला आणि जगद्‌गुरु संत तुकाराम महाराज त्यांचे कळस ठरले. परंतु या संप्रदायासोबतच ज्ञानदेवांनी आपली नाथ परंपराही अखंड सुरू ठेवली. माऊलींच्या व्यक्तिमत्वाच्या असामान्य प्रभावामुळे आणि समन्वयाच्या शिकवणीमुळे नाथ संप्रदाय व वारकरी संप्रदाय यांच्यात जवळ जवळ ऐकात्म्य निर्माण झाले. तेही इतके अद्वैत स्वरूपाचे झाले की त्यातील फरक सांगावयासही सूक्ष्म दृष्टी असायला हवी. याचे उदाहरण म्हणजे तद्नंतरच्या परंपरेतील श्री शिवदिनकेसरीनाथ महाराज, श्री लक्ष्मीनाथ महाराज, श्रीमहिपतीनाथ महाराज (ढोलीबुआ) यांच्यासारख्या सत्पुरुषांचा अभ्यास करायला हवा. नाथपंथाची परंपरा पुढे नेणाऱ्या या संतांच्या असंख्य अभंगांतुन, पदांतुन श्रीविठ्ठल भक्तीचे वर्णन, पंढरी महात्म्य, नाम स्मरण महिमा वर्णन केलेला आहे. त्याचप्रमाणे वारकरी संप्रदायातील अनेक संतांच्या अभंगातून नाथ संप्रदायाची थोरवी वर्णन केली गेली आहे.

**विठ्ठला तुझे समान पद चांगले । काया काशी सत्रावे भिवरे तिरी ।**
**नयनात लक्ष लागले ॥१॥**

**विठ्ठल गाईलाची गाउ विठ्ठल पाहिलाची पाहू ।**
**सत्रावे भिवरे तिरी पंढरपुरा जाऊ ।**
**चंद्रभागे स्नान करूनी मुक्ति पताका लावू ॥१॥**

**त्रासलो मी आता विठोबा आण तुझ्या चरणाची ॥**

**सखाया विठ्ठला तुझ्या भेटीसाठी माझा जीव तुटला ॥१॥**

**नरहरी म्हणे को जन्मा यावे । एकदा पंढरपुरास जावे ॥**
**दर्शन विठोबाचे घ्यावे । महिपती पद पावाल ॥६॥**

श्री ज्ञानेश्वर महाराज, श्री सोपाननाथ महाराज व श्री मुक्ताबाई यांच्यापासून नाथ, वारकरी, चैतन्य अशा अनेक परंपरा निर्माण झाल्या. नाथ, वारकरी, चैतन्य आनंद, दत्त, समर्थ व इतर संप्रदायात समन्वय व सहकार नांदून आजही सहप्रवाह उत्साहात सुरू आहेत, याला कारण श्री ज्ञानेश्वर महाराज यांची **विश्वस्वधर्म सूर्ये पाहो । आणि भूता परस्परे पडो मैत्र जीवांचे ॥** ही शिकवण आहे. महाराष्ट्रातील नाथ संप्रदायाची अध्ययन परंपरा वा साधना पद्धती ही श्रीज्ञानेश्वर महाराज यांच्या शिकवणीवर/विचार मार्गावर चालणारी आहे.

महाराष्ट्रातील वारकरी, दत्त, आनंद, चैतन्य, समर्थ या संप्रदायांपूर्वी नाथसंपदायाचा उदय आणि विस्तार झाला हे सर्वमान्य आहे. त्यामुळे या सर्व संप्रदायांवर कमी अधिक प्रमाणात त्याचा ठसा उमटलेला आहे.

■ ■ ■

# ॥ सद्गुरु श्री ज्ञानेश्वर महाराज शिष्यपरंपरा ॥

संत ज्ञानेश्वर महाराजांचे शिष्य, किती व कोण यावर अनेक मतमतांतरे आहेत. यासंदर्भात श्री संत एकनाथ महाराजांनी एका अभंगात ज्ञानेश्वर महाराजांच्या शिष्यांचा उल्लेख केलेला आहे.

**ज्ञानदेव उपदेश करूनिया पाही । सोपान मुक्ताई बोधियेली ॥१॥**
**मुक्ताईने बोध खेचरासी केला । तणे नामयाला बोधियेले ॥२॥**
**नाम्याचे कुटुंब चांगावटेश्वर । एका जनार्दनी विस्तार मुक्ताईचा ॥३॥**
**- ए. म. गाथा अ. १८८९**

यात संत सोपानदेव व संत मुक्ताबाई यांचे गुरुत्व श्री ज्ञानेश्वर महाराजांकडे जाते व विसोबा खेचरांचे गुरुत्व मुक्ताबाईंकडे येते. (विसोबा खेचरांनी नामदेवरायांना बोध केला हे सर्वांना ज्ञात आहे) चांगदेवांच्या गुरु देखील मुक्ताबाईच होत्या हेही सर्वश्रुत आहे. पण हा सोपानदेव व मुक्ताबाई यांच्या परंपरेचा उल्लेख आहे. श्री संत एकनाथ महाराजांच्याच एका अभंगात श्री ज्ञानेश्वर महाराजांचे तीन शिष्य नोंदविले आहेत.

**ज्ञानराजे बोध केला सत्यबाळा । रेडा बोलविला प्रतिष्ठाणी ॥१॥**
**भोजलिंग ज्याची समाधी आळंदी । ज्ञानराज बोधी तिघाजणां ॥२॥**
**सत्याबळे बोध गैबिराया केला । स्वये ब्रह्म झाला सिद्धरूप ॥ ३॥**
**एका जनार्दनी ऐसि परंपरा । दाविले निर्धारा करुनिया ॥४॥**
**- ए. म. गाथा अ. १८८०**

१) सत्यामलनाथ २) रेडा ३) भोजिलिंग काका. यातील सत्यामलनाथ हे श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पुढील नाथ संप्रदायाचे मूळ पुरुष किंवा मुख्य सत्पुरुष कोय. मुक्ताबाई-विसोबा खेचर-नामदेवराय अथवा मुक्ताबाई-चांगदेव-चक्रपाणी या परंपरा सर्वांना माहित आहे. परंतु पूर्वापार चालत आलेला जो नाथ संप्रदाय आहे तो ज्ञानेश्वर महाराजांनंतर संपला असा जो गैरसमज सर्वदूर आहे. तो इथे दूर होतो. ज्ञानेश्वर महाराजांनी संजीवन समाधी घेतल्यानंतरही हा नाथ संप्रदाय खंडित न होता सत्यमलनाथांद्वारे अविरत सुरू आहे हे बऱ्याच लोकांना माहित नाही. गुरु परंपरेने चालत आलेला नाथ संप्रदायाचा बोध श्री ज्ञानेश्वर महाराजांनी श्री सत्यामलनाथांना केला. (श्री वक्ते महाराज कृत मुक्ताबाई चरित्रात त्यांनी नकाशाद्वारे ही परंपरा दर्शविली आहे) सत्यामलनाथांचा ‘नवरत्नमाला’ नावाचा ग्रंथ आहे त्यात त्यांनी ज्ञानेश्वर महाराजांचे त्यांच्यासह आठ शिष्य सांगितले आहेत.

१) सोपानदेव, २) मुक्ताबाई, ३) विसोबाखेचर, ४) विमलानंद ५) सत्यामलनाथ, ६)

स्वरूपनाथ, ७) चर्पटनाथ, ८) सच्चिदानंद

यात मात्र सोपानदेव, मुक्ताबाई यांच्यासह विसोबा खेचर हे ज्ञानेश्वर महाराजांचे शिष्य दाखविलेले आहे. सत्यामलनाथांचा काळ नेमका कोणता यावर अनेक अभ्यासकांनी / लेखकांनी वेगवेगळी मते पुढे केली आहेत. सत्यामलनाथांच्याच नावे 'सिद्धांत रहस्य' नावाचा ग्रंथ आहे. पण त्यात वंदन करताना नानक, कबीर, मीराबाई, एकनाथ महाराज, रामदास स्वामी, तुकाराम महाराज आदींच्या नावाचा उल्लेख आहे. यावरून या ग्रंथाचे कर्ते सत्यामलनाथ हे दुसरे असावे असे वाटते कारण एकनाथ महाराज स्वतः सत्यामलनाथांचा उल्लेख करतात. सत्यामलनाथांनी हा बोध पुढे त्यांचे शिष्य गैबिनाथ यांना केला. **सत्याबळे बोध गैबिराया केला ।** का ही उल्लेख नाथ महाराज करतात याचा अर्थ श्री सत्यामलनाथ व श्री गैबिनाथ हे गुरुशिष्य संत एकनाथ महाराजांच्या पूर्वी झाले हे निश्चित.

नाथ संप्रदायाचे अभ्यासक / लेखक रा. चिं. ढेरे यांनी गैबिनाथांचा काळ शके १५२० ते शके १५८० असा दाखविला आहे. पण एकनाथ महाराजांचा जन्म शके १४५५ चा. ते आपल्या अभंगात श्री गैबिनाथांचा 'गैबिराया' असे आदर वाचक विशेषण लावून उल्लेख करतात. त्यामुळे वरील श्री गैबिनाथांच्या काळाची संगत लागत नाही. गैबिनाथांनी आपल्या शिष्या गुप्तनाथांना नाथ संप्रदायाची दीक्षा दिली. गुप्तनाथ या स्त्री होत्या. (नाथ संप्रदायात आदिनाथ-उमे पासूनच स्त्रीला पूज्यत्वाचे स्थान आहे. एका स्त्रीला आपल्या परंपरेचे दायित्व देणे आणि तेही त्याकाळात, हे केवढे विशाल उदारत्व आहे.) श्री गुप्तनाथांचे ज्ञानेश्वरी वरील प्रवचन ऐकून उद्‌बोधनाथांनी त्यांचे शिष्यत्व पत्करून नाथ संप्रदायाची दीक्षा घेतली. उद्‌बोधनाथांचा ज्ञानेश्वर विजय ग्रंथ (श्री वक्ते महाराज कृत संत मुक्ताबाई चरित्रात त्यांनी श्री उद्‌बोधनाथांचा उल्लेख श्री ज्ञानेश्वर महाराजांचे चरित्रकार असा केलेला आहे हे चरित्र म्हणजे श्रीज्ञानेश्वर विजय ग्रंथ का? याचे संशोधन सुरू आहे व भविष्यात त्यावर आणखीन काम केले जाईल) श्री उद्‌बोधनाथ हेही ज्ञानेश्वरी, अमृतानुभवावर प्रवचन करीत. श्री उद्‌बोधनाथ यांचे शिष्य केसरीनाथ महाराज. त्यांची प्रवचने ऐकूनच केसरीनाथ महाराजांनी त्यांना शिष्यत्व देण्याची विनंती केली व सर्वस्वाचा त्याग करून त्यांनी उद्‌बोधनाथ महाराजांकडून गुरुमंत्र दीक्षा घेतली. केसरीनाथ महाराजांचा 'सिद्धांतसार' नावाचा हस्त लिखित ग्रंथ देऊळगाव राजा येथील मठात आहे. केसरीनाथ महाराजांची श्री ज्ञानेश्वर महाराजांवर व ज्ञानेश्वरीवर प्रचंड निष्ठा होती त्याचेच फळ म्हणून श्री केसरीनाथांना विश्वमाऊली ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदिरात समाधी घेण्याचे परमभाग्य लाभले. याच केसरीनाथ महाराजांचे सच्छिष्य सद्‌गुरु नरहरिनाथ महाराज यांचे गुरु म्हणजे महान संत कवी श्री शिवदिननाथ महाराज हे होय. श्री शिवदिननाथ महाराजांनी आपल्या स्वतंत्र नावाचा कधीच उल्लेख केला नाही. ते सदैव आपल्या नावापुढे गुरूंचे नाव लावत असत. म्हणून त्यांचे 'शिवदीन केसरी' हे नाव बहुपरिचित आहे. त्यांची पद्यरचना अभंग रचना ही विलक्षण आहे.या साहित्यातून

श्रीविठ्ठल भक्तिचा, सद्गुरु भक्तीचा अखंड झरा आजही प्रवाहित आहे. श्री शिवदिननाथ महाराजांचा 'ज्ञानप्रदीप' व 'विवेक दर्पण' नावाचा ग्रंथ आहे. ज्ञानप्रदीपातील ओव्यांवर भगवती ज्ञानेश्वरीचा खूप प्रभाव आहे. श्रीशिवदिननाथ महाराजांचे सुमारे ५०० पदे / अभंग आहेत. यातील बरेच परंपरेमध्ये नित्याने म्हणण्यात येतात. श्रीशिवदिननाथ महाराज यांची समाधी श्रीक्षेत्र पैठणमध्ये गोदावरी तीरी आहे. शिवदिनकेसरी मठ म्हणून पैठणमध्ये सर्व परिचित आहे.

श्री शिवदिननाथ महाराजांचे शिष्य **सद्गुरु श्रीनरहरिनाथ महाराज**. श्री सद्गुरु श्रीनरहरिनाथ महाराज यांचे तीन प्रमुख शिष्य

**१) श्रीलक्ष्मीनाथ महाराज २) श्री महिपतीनाथ महाराज (ढोलिबुवा)**
**३) श्री नारायणनाथ महाराज.**

लक्ष्मीनाथ महाराज यांचा 'प्रीतिभूषण' नावाचा ग्रंथ आहे व अनेक पदें आहेत. महिपतीनाथांच्या व लक्ष्मीनाथांच्या पदांतून परंपराप्राप्त गुरुभक्तिचा वारसा स्पष्ट दिसून येतो. महिपतीनाथ महाराजांची पदे म्हणजेच श्रीनरहरिनाथ महाराजांचा महिमा आहे. लक्ष्मीनाथांनी श्री विठ्ठलनाथांना अद्वयानंद वैभवाचा वसा सोपवून विश्वमाऊली श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदिरात समाधी घेतली. विठ्ठलनाथांनी आपला बराच काळ पैठण येथे घालविला. व अंती श्रीगणेशनाथ महाराजांना नाथसंप्रदायाची दीक्षा देऊन पैठण येथेच शिवदिननाथ महाराजांच्या जवळ समाधी घेतली. श्री गणेशनाथांनी अठराशेच्या शतकात देऊळगांव राजा येथील सद्गुरु श्री नरहरिनाथ महाराजांच्या समाधी मंदिराचा जीर्णोद्धार केला. पैठण येथील मठाप्रमाणेच सुशोभित मठ बांधला व श्री गौतमनाथांना अनुग्रह देऊन संन्यासाश्रमाचा स्वीकार करून श्रीक्षेत्र देऊळगांव राजा येथेच सद्गुरु सानिध्यात समाधी घेतली. गौतमनाथ महाराजांनी आपल्या काळात मठाचा मोठा विकास केला. खांदेश, विदर्भ, मराठवाडा सर्वत्र संप्रदायाचा प्रचार प्रसाराचे महान कार्य केले. अंती आपले शिष्य चिरंजीव श्री भानुदास महाराज यांच्यावर परंपरेचे कार्य सोपवून संन्यासाश्रम स्विकारला व देऊळगाव राजा येथे समाधी घेतली. भानुदास महाराजांनी हे सेवा कार्य आपल्या शांत दयाभाव करूणेच्या स्वभावाने केले व देऊळगांव राजा येथे समाधी घेतली.

■ ■ ■

# ◆ ।। संप्रदाय वेश - बाणा नाथांचा ।। ◆

नाथ संप्रदायाचा एक विशिष्ट वेश ज्ञानेश्वर महाराजांपूर्वी होता. जो नवनाथांच्या अनेक चित्रात आपण पाहतो. मेखला, कौपीन, व्याघ्रांबर, खडावा, कमंडलु, चिमटा असा तो वेश आहे. श्री ज्ञानेश्वर महाराजांनंतरही सांप्रदाय विशिष्ट वेशभूषणे धारण करण्याची परंपरा सुरु राहिली ज्यात शैली, शिंगी, कंथा, तोडा, मेखळा, जानवे इ. पारंपरिक आभूषणांचा समावेश आहे. राजाराम प्रसादि कृत ‘भक्तीमंजरी माला’ या ग्रंथात श्रीसत्यामलनाथ शिष्य श्री गैबिनाथ यांचे वर्णन करताना असे वर्णन केले आहे.

**शैली शिंगी गळा गोदडी । शोभे हस्तकी सुंदर फावडी ।**
**अदृश्य निशाण झळके गुडी । मुखी आवडी गुरुस्मरण ।।**

चैतन्य परंपरेतील भैरवज्ञानसागर अवधूत यांनी लक्ष्मीनाथ महाराज (सद्‌गुरु नरहरिनाथ महाराज यांचे शिष्य) यांच्या वर्णनात म्हटले आहे-

**शैली शिंगी कंथा घालुनिया टोपी । कीर्तन रंगी बोधी गुरुकिल्ली सोपी ।।**
**जय देव जय देव जय श्री लक्ष्मीनाथेंद्रा । उत्तम पुरुषा स्वामी अनादी योगींद्रा ।।**

श्री नरहरिनाथ महाराजांचे दुसरे शिष्य श्री नारायणनाथ महाराज यांच्या आरतीत याच वेशाचे वर्णन आलेले आहे.

**शैली शिंगी पुंगी तुंबी नाथ बाणा विराजे । पायी तोडा काती छडी अंगी विभूती साजे ।।**
**आरती गुरुनाथा नारायणा समर्था ।।**

या सर्व प्रमाणांवरून, वेशवर्णनावरून एक गोष्ट सिद्ध होते ती म्हणजे श्रीज्ञानेश्वर महाराज शिष्य श्रीसत्यामलनाथ महाराजांपासून ते सद्‌गुरु नरहरिनाथ महाराज शिष्य लक्ष्मीनाथ व शिष्य नारायणनाथ महाराजांपर्यंत सर्व सत्पुरुषांचा हाच वेश होता. याला नाथ संप्रदायाचा **बाणा** असे म्हणतात.

● **शैली** - ही रेशिम व सुवर्णयुक्त दोऱ्याने विणलेली जाळी सारखी असते शैलीला मच्छिंद्रनाथांचा प्रसाद म्हणून परिधान केले जाते ही जानव्यासारखी एका बाजुने घलतात.

● **शिंगी** - ही हरणाच्या शिंगाची बनवलेली असते ही जानव्याला बांधून ठेवतात म्हणून याला शिंगीनाद जानवे असेही म्हणतात.

● **जानवे**- हे काळ्या मेंढीच्या लोकरीचे बनवलेले असते यालाच शिंगी बांधतात हे जानव्या सारखेच घातले जाते. याला शिंगीनाद जानवे असे म्हणतात.

● **तोडा** - हा डाव्या पायात घातला जातो. बाणा म्हणजे आदिनाथ उमेचे अर्धनारीनटेश्वराचे रूप असते / समजले जाते, डावे अंग उमेचे म्हणून डाव्या पायात तोडा हा तांब्याचा विणलेला असतो.

● **त्रिशूळ** - हा भगवान आदिनाथांचे प्रतिक म्हणून उजव्या हातात घेतात. हा ही तांब्याचाच असतो.

हा बाणा परिधान करताना मच्छिंद्रनाथांपासून श्री ज्ञानेश्वर महाराजांपर्यंत अनुक्रमे सर्व गुरूंचे श्लोक म्हणून वंदन केले जाते. (या श्लोकमालेचा श्री वक्ते महाराज कृत श्री मुक्ताबाई चरित्रात 'नाथस्तोत्र' असा उल्लेख आलेला आहे.) आजही प्रत्येक भिक्षेला व ठराविक उत्सवांना हा बाणा परिधान करण्याची परंपरा आहे.

काही ठिकाणी भगवे वस्त्र माळा धारण करून नाथ संप्रदायी भिक्षा मागितली जाते. अमावस्या पौर्णिमेला हा वेश ते धारण करतात, याला जोग असेही म्हणतात. ज्ञानेश्वर महाराजोत्तर नाथ संप्रदायी परंपरेत चिमटा, भगवी कफनी, सर्वांगाला भस्म लेपन ही वेशभूषा नाही. म्हणून संत नरहरिनाथ महाराज संस्थान दऊळगांव राजा येथील मठात व अन्य शिष्य परंपरेतील मठात चिमटा, धुनी या वस्तु वापरल्या जात नाहीत.

■ ■ ■

# बाणा



पगडी व प्रसाद



तोडा व चिपळ्या



शैली व शिंगी

# ◆॥श्री संत एकनाथ महाराज- दत्त परंपरा आणि नाथ संप्रदाय॥◆

श्री एकनाथ महाराज हे नाथ संप्रदायी आहेत/होते असा बऱ्याच सामान्य लोकांचा समज आहे. श्री एकनाथ महाराजांच्या नावातील 'नाथ' हा शब्द नाथसंप्रदाय परंपरा प्राप्त विशेषण नसून 'श्री एकनाथ' हे नाव आहे. श्री एकनाथ महाराजांचे मूळ पुरुष श्री भानुदास महाराज यांच्या पासूनच श्री एकनाथ महाराजांच्या कुळात/घराण्यात वारकरी संप्रदायाची परंपरा आहे. भानुदास महाराज श्री विठ्ठलाचे निष्ठावान भक्त होते. चरित्रभाग सर्वश्रुत आहे. त्यांची एकविध भक्ती त्यांच्या अभंगातून स्पष्ट कळून येते.

**जरी हे आकाश वर पडो पाहे । ब्रह्मगोळ भंगा जाये ।**
**वडवानळ त्रिभुवन खाये । तरी तुझीच वाट पाहे गा विठोबा ॥**
**भलतैसे वरपडो भारी । नाम न संडो न टळो निर्धारी ।**
**जैसी पतिव्रता प्राणेश्वरी । विनवी भानुदास म्हणे अवधारी गा विठोबा ॥**

श्री ज्ञानेश्वर महाराजांनी वारकरी संप्रदायाचा पाया रचला. **ज्ञानदेवे रचिला पाया उभारिले देवालया ।** त्याला मजबूत करण्याचे कार्य श्री एकनाथ महाराजांनी केले. वारकरी संप्रदायाच्या प्रमुख संत पंचकात एकनाथ महाराजांचे स्थान आहे. श्री एकनाथ महाराजांचे वारकरी संप्रदायातील कार्य व चरित्र अनेक ग्रंथातुन प्रकाशात आलेले आहे म्हणून येथे देणे अनुचित ठरेल.

श्री एकनाथ महाराजांनी आपल्या अनेक अभंगातून नाथ संप्रदायाचे, नाथ परंपरेचे वर्णन केलेले आहे.

**ध्यानी बैसोनी शंकर । सदाजपे राम नाम सार ॥१॥**
**पार्वती पुसे आवडी । काय जपता तातडी ॥२॥**
**मंत्र तो मज सांगा । ऐशी बोलतसे दुर्गा ॥३॥**
**एकांती नेऊन । उपदेशी राम अभिधान ॥४॥**
**तेंचि मच्छिंद्रा लाधले । पुढें परंपरा चालिले ॥५॥**
**तोची बोध जनार्दनी । एका लागतसे चरणी ॥६॥ ए. म. गाथा अ. १८७४**

नाथ संप्रदायाचा वैचारिक वारसा एकनाथ महाराजांना जनार्दन स्वामींकडून मिळाला असे या अभंगावरून लक्षात येते. आणखी एका अभंगात एकनाथ महाराज म्हणतात

**ज्ञानदेवे उपदेश करूनियां पाही । सोपान मुक्ताई बोधियेली ॥१॥**
**मुक्ताईने बोध खेचरासी केला । तेणे नामयाला बोधीयेलें ॥२॥**
**नाम्याचे कुटुंब चांगा वटेश्वर । एका जनार्दनी विस्तार मुक्ताईचा ॥३॥**
**- ए.म. गाथा अ. १८८९**

श्री एकनाथ महाराज, श्री ज्ञानेश्वर महाराजांना तर अनेक अभंगातून सद्‌गुरु म्हणून संबोधितात

**ओम नमो ज्ञानेश्वरा । करूणा करा दयाळा ।**
**तुमचा अनुग्रह लाधलो । पावन झालो चराचरी ॥ - ए. म. गाथा**

**एका जनार्दनी पूर्वपुण्य फळले । सद्‌गुरु भेटले ज्ञानेश्वर ॥ - ए. म. गाथा**

एकनाथ महाराजांनी ज्ञानेश्वर महाराजांना सद्‌गुरूंच्या ठिकाणीच मानले होते. नाथ महाराजांना स्वप्नात येऊन ज्ञानेश्वर महाराजांनी दृष्टांत दिला होता हे सर्व ज्ञात आहेच. म्हणून नाथ महाराजांवर नाथ संप्रदायाचा वैचारिक प्रभाव होता. पण आपली गुरु परंपरा एकनाथ महाराज या अभंगात सांगतात

**जो का निर्गुण निराभास । तेथुनि उद्‌भव शबलब्रह्मास ।**
**आदिनारायण म्हणती त्यास । तो सर्वांचा जगद्‌गुरु ॥१॥**
**तयाचा ब्रह्मा अनुग्रहित । ब्रह्मा अत्रीस उपदेशीत ।**
**अत्रीपाद प्रसादित । श्री अवधूत दत्तात्रेय ॥२॥**
**दत्तात्रेय परंपरा । सहस्रार्जुन यदु दुसरा ।**
**जनार्दन शिष्य तिसरा । केला खरा कलियुगीं ॥३॥**
**जनार्दन कृपेस्तव जाण । समूळ निरसले भवबंधन ।**
**एका जनार्दनी शरण । झाली संपूर्ण परंपरा ॥४॥ - ए. म. गाथा**

ही श्री संत एकनाथ महाराजांची गुरु परंपरा आहे. पुढे नाथ महाराजांचे प्रमुख शिष्य गावबा (नित्यानंद) यांच्या पासून अनेक शिष्य शाखा झाल्या त्यात एका परंपरेत गोपाळनाथ हे सत्पुरुष होऊन गेले (त्यांनी श्री एकनाथ महाराजांची आरती केली) यांचे शिष्य गोविंदनाथ, शिष्य देवनाथ (अंजनगाव सुर्जी येथील) हे श्री एकनाथ महाराजांच्या शिष्य परंपरेतील आहेत. काही लोकांच्या मते ते नाथसंप्रदायी परंपरेतील होते/आहेत. पण नाथ संप्रदायाचे अभ्यासक रा. चिं. ढेरे यांनीही आपल्या संशोधन ग्रंथात ते दत्तात्रेय परंपरेतील म्हणजे श्री एकनाथ महाराजांच्या शिष्य परंपरेतील होते. असाच उल्लेख केला आहे. यात श्री. गावबांचे शिष्य कृष्णानाथ यांच्यापासून नावासमोर 'नाथ' लावण्याची प्रथा सुरू झाली असावी. श्री एकनाथ महाराजांच्या अन्य कोणत्याही परंपरेत 'नाथ' हे विशेषण लावले जाता नाही. श्री ज्ञानेश्वर महाराजानंतर सत्यामलनाथ - गैबिनाथ इ. हीच नाथ संप्रदायाची परंपरा पुढे सुरू राहिली हे प्रमाणसिद्ध आहे.

■ ■ ■

# संत नाथ
# चरित्रमाला

# •।। श्री संत गुप्तनाथ महाराज ।।•

श्री गुप्तनाथांचे पूर्वीचे नाव 'गुप्तगंगा' असे होते. त्यांचे पित्याचे नाव कृष्णाशास्त्री व मातोश्रींचे नाव सीताबाई असे होते. हे यजुःशाखी गौतम गोत्री ब्राह्मण रा. राशिन, ता. कर्जत, जि. अहमदनगर येथे राहत कोते. त्यांचा जन्म शके १५२१ विक्रम नाम संवत्सरात या वर्षी झाला. (सत्यामलनाथ, गैबीनाथ, गुप्तनाथ यांच्या कालनिर्णयावर अनेक मतमतांतरे आहेत) यांची बालअवस्थेतील माहिती मिळत नाही.

त्याच गावातील उदोजीपंत नावाचे एक ब्राह्मण कुटुंबीय गंगायात्रेकरिता प्रवरा संगमास चालले होते. त्यांचे बरोबर 'गुप्तगंगा' होत्या. त्यावेळी बाह्यारण्यात गुप्तगंगास शौच प्रवृत्ती लागली. त्यामुळे त्यांनी उदोजीपंतास सांगितले आपण पुढे चालावे आम्ही शौचविधी आटोपून मागावून येतो. उदोजीपंत व त्यांचे कुटुंब पुढे गेले.

गुप्तगंगा यांचा शौचविधी आटोपल्यावर त्या दोनपावले पुढे टाकतात तोच समोरच्या वटवृक्षाजवळ असंख्य सहस्ररश्मी प्रमाणे तेज दिसून दक्षिणमूर्ती गुरु गैबीनाथ यांचे दर्शन पूर्वसिद्धीमुळे झाले. त्यांनी गुप्तगंगेस हस्तसंकेताने जवळ बोलाविले. जवळ येताच गैबीनाथांचे चरणावर साष्टांग नमस्कार घातला. गैबीनाथांनी त्यांसी पोटाशी धरून आपला पद्मकर त्यांचे मस्तकावर ठेवताच गुप्तगंगेची समाधी लागली. त्या अतिशय आनंदात निमग्न झाल्या. पुढे काही काळात गैबीनाथांनी त्यांची समाधी उतरवून आज्ञा केली की, नाथपंथाचा लोप होत आहे. त्याचा परंपरेने उदय करावा. असे म्हणून गुरुमूर्ती अदृष्य झाली. गुरुआज्ञेप्रमाणे 'गुप्तगंगा' यांनी नाथ संप्रदायाचा अवलंब केला. त्यामुळे त्यांना 'गुप्तनाथ' ही यथार्थ संज्ञा प्राप्त झाली. गुरुमूर्ती सगुण रूपाने दिसत नाही हे पाहून, तो विरह सहन न होऊन गुरुचरण स्मरण करीत ते उद्विग्न बसले होते. इतक्यात आकशवाणी झाली ''तू सर्वव्यापी, अभेद आहेस, दुःख मानण्याचे कारण काय?'' हे ऐकताच आनंद पावून जगतात मीच नटले आहे अशा व्यापकत्वाच्या आनंदात त्यांना पुढे मार्गक्रमण करावे याचे भान राहिले नाही.

इकडे उदोजीपंत प्रवरासंगमी पोहोचल्यावर त्यांनी अस्तमानापर्यंत गुप्तनाथांची वाट पाहिली. कुटुंबास तेथे ठेवून घोड्यावर बसून त्यांचे शोधार्थ निघाले. मार्गात पाहतात तर काय? गुप्तगंगा भानावर नसून निरतिशय आनंदात निमग्न आहेत. त्यांना त्याच अवस्थेत घोड्यावर घेऊन प्रवरासंगमी आले. मंडळीची गलबलाट ऐकताच ते भानावर आले. सर्व मंडळी परत राशिन येथे येऊन पोहोचली. तेव्हा पासून उदोजी पंतांची निष्ठा 'गुप्तनाथांच्या' चरणी दृढ झाली व त्यांनी त्यांची सेवा काया वाचा मने करण्यास आरंभ केला.

गुप्तनाथांचा दिनक्रम - दररोज सकाळी सर्व विधी आटोपून नित्य गीता पठण, ज्ञानेश्वरी पठण होत असे. त्याचवेळी त्यांचा अर्थ, विवरणासह श्रोत्यांच्या मनावर बिंबण्यासारखा सांगत असत.

उदोजीपंत दररोज नित्यनेमाने ज्ञानेश्वरी श्रवणास येत असत. लक्ष देऊन ऐकत असत. एके दिवशी उदोजीपंतांचे देहाचे सार्थक होण्याची वेळ आली.

एके दिवशी गुप्तनाथ महाराज उदोजीपंतांस मोठ्या प्रमाणे म्हणाले ''आज तुम्हास अनुग्रह द्यावयाचा आहे.'' हे अमृततुल्य शब्द कानी पडताच उदोजीपंतास आनंदास पारावार राहिला नाही. क्षणभर ते देहभान विसरले. त्याच दिवशी म्हणजे माघ शुद्ध ५ शके १५५९ रोजी उदोजीपंतास तारकमंत्राचा उपदेश देऊन हटपट बांधून नाथपंथ चालविण्याविषयी आज्ञा दिली. त्यांचे नाव 'उद्‌बोधनाथ' असे ठेवले. काही काळ तेथे वास्तव्य करून गुप्तनाथ महाराज तीर्थकार्य करीत पृथ्वी पर्यटनास निघाले.

पुढे त्यांनी शके १६५७ विश्वासुनाम संवत्सरी समाधी घेतली. श्री. गुप्तनाथांची समाधी चित्रकूट येथे आहे, असे ऐकिवात आहे.

■■■

# •।। श्री संत उद्‌बोधनाथ महाराज ।।•

श्री. उद्‌बोधनाथ महाराजांचा जन्म शके १५३९ पिंगलानाम संवत्सरात राशिन, ता. कर्जत, जि. अहमदनगर येथे झाला. त्यांचे पित्याचे नाव कृष्णाजीपंत व मातोश्रींचे नाव जांबुवंतीबाई असे होते. उद्‌बोधनाथ महाराजांचा विवाह शके १५५१ क्रोधीनाम संवत्सरात झाला.

त्यांनी गुरुउपदेशाप्रमाणे तंतोतंत वर्तन ठेवून शिष्य शाखा वाढविली. सामान्य लोकांना उपदेश करून सन्मार्गाला लावले त्यावेळची भक्त मंडळी त्यांना 'हठयोगी महासिद्ध' पुरुष असे म्हणत.

त्यांनी अभंग, भक्तिपर पदे, वेदांतपर पदे इ. पुष्कळ लिखाण केले. काही ग्रंथही लोकोपकारार्थ केले. त्यांना 'पांडुरंगाचा' साक्षात्कार झाला होता असे म्हणतात.

याप्रमाणे लोकोपकार करून त्यांनी राशिन येथेच वैशाख व ९ मी शके १६२२ ला चतुर्थाश्रम घेऊन समाधी घेतली. यांचा उत्सव पूर्वीपासून वैशाख व. ९ ते १२ पर्यंत असतो.

■■■

# •।। श्री संत केसरीनाथ महाराज ।।•

केसरीनाथ महाराज यांचे नाव केशवपंत हे ऋग्वेदी अश्वलायन ब्राह्मण वशिष्ठ गोत्री. ते नासिकचे राहणार असून त्यांचे उपनाव बराटे असे होते. त्यांचा जन्म नासिक येथे शके १५६५ ला झाला त्यांस दोन बंधू होते. वडिलांचे नांव गोविंदपंत, मातोश्रीचे नाव लक्ष्मीबाई असे होते.

ते जोहारचे राजाचे पदरी नोकर होते. त्यास प्रांत पढेगाव पैकी परगणे क्षेत्र राशिन येथे उमाईचे ठाणेदार म्हणून नेमले. ते काम त्यांनी दक्षतेने केले. ते जसे नोकरीचे कामात दक्ष तसेच धार्मिक, पापभिरू, परम निष्ठावान होते. त्यांनी देवीची सेवा अंतःकरण पूर्वक भक्तीने केली. देवी संस्थानचे व्यवस्थापन उत्तम केले.

तेथीलच एक विश्वनाथपंत देशपांडे यांच्या अनुसंधानाने श्री उदबोधनाथांचे सन्निध 'ज्ञानेश्वरी' ऐकण्याचा घाट घातला. एके दिवशी विश्वनाथ पंतास येण्यास अमळ उशीर झाला. तेव्हा पोथी संपल्यानंतर एका श्रोत्याने विचारले, आज उशीर का झाला? त्यांनी उत्तर दिले की, केशवपंत ठाणेदाराचे प्रस्थ आजकाल जास्तच माजले आहे. त्यांचे सेवेत आम्हास तत्पर रहावे लागते. यावेळी हे ग्रामप्रभूच होऊन बसले आहेत. हे उत्तर केशवपंताच्या कानी पडताच त्यांनी विश्वनाथपंतांना साष्टांग नमस्कार घालून सांगितले की, आम्हावर कृपा असावी एवढेच मागणे आहे. जर आपणास मनातून त्रास होत असेल तर मी आत्ताच राजिनामा देऊन नोकरीला आंचविण्यास सिद्ध आहे. हे बोल बोलून ते करद्वय जोडून गुरुमहाराज उद्‌बोधनाथांसमोर उभे राहिले. तो त्यांची अंतःकरण शुद्धी पाहून श्रीगुरु त्यांचेवर तात्काळ प्रसन्न झाले व तत्क्षणीच त्यांनी त्यांस अनुग्रहरूपी प्रसाद दिला.

केशवपंतांनी नित्य व अव्याहत श्रीगुरुसेवा आरंभिली. त्यांचे बंधूनेही त्यांचे अनुकरण केले. उभयता ज्ञानरूप वर्णाश्रम धारण करून प्रजापालन तत्परतेने व न्यायाने करीत असत. परंतु थोड्याच दिवसात काही चहाडखोड लोकांना त्यांची कीर्तीसिद्ध वर्तन, गुरुनिष्ठा, सिद्धधर्माचरण इ. गुणांचा प्रकाश सहन न होऊन त्यांनी जोहारचे राजास दुष्ट बुद्धीने कळविले की, केशवपंतांनी आपल्या नेमलेल्या कामात (कारभारात) एक लक्ष रूपयांची अफरातफर केली आहे. या चहाडीमुळे राजाकडून केशवपंतास हुकूम आला की, आपण आपल्या दप्तरासह यावे. हुकुम पाहाताच केशवपंतास वाईट वाटले. ते सद्‌गुरु उद्‌बोधनाथ महाराजांचे दर्शनास गेले. नमस्कार करून चरणापाशी बसले. त्या राजआज्ञेचे साग्र निवेदन केले. गुरु महाराजांनी सांगितले की, बरे आहे तू सत्वर जा. गुरु आज्ञेवर निष्ठापूर्वक विश्वास ठेवून ते दप्तरासह निघाले. व राजदरबारी येवून पोकाले.

राजाने विचारपूस न करता केशवपंतांना एक वर्षपर्यंत नजरकैदेत ठेवण्याची आज्ञा केली. सत्तेपुढे शहापणपण, खरेपणाचा प्रकाश पडत नाही. केशवपंतांची स्थिती अवघड झाली. त्यांना अन्न-पाण्याची इच्छा होईना. त्यांनी दोन दोन दिवस उपोषण केले, त्यातच गुरुचरण वियोगाचे दुःख!

एका गृहस्थाने त्यांना विचारले की, आपण अन्न-पाणी का सेवन करीत नाहीत? तेव्हा त्यांनी उत्तर दिले ''माझ्या सद्‌गुरुस आणून मला भेटवाल तर मला कशाचीही आवश्यकता नाही.'' केवढी ही गुरुभक्ती!

काही दिवस गेल्यावर एक दिवस केशवपंतास स्वप्नात श्रीगुरूंचे दर्शन झाले. ते खडबडून जागे झाले व तेथे असलेल्या सेवकास म्हणाले, ''मला लेखणी, दौत व कागद आणून द्या'' त्यांनी ते दिले. मग केशवपंतांनी श्रीगुरुमूर्तीचे ध्यान करून धावा लिहिण्यास सुरूवात केली. पावनरूप धावा कागदावर लिहून तो पाठ केला व रोज म्हणू लागले

**जाणसी तू करी आता । माझी तुजला चिंता । तुज वरी भार माझा । सत्य जाण अनंता ॥**

आणि काय आश्चर्य! रोजेसाहेबांनी केशवपंतास दरबारात बोलावले आणि म्हणाले की, ''आम्ही लोकांच्या सांगण्यावरून आपणावर जो आरोप केला त्याचा दोष तपासांती तुम्कावर येत नाही हे सिद्ध झाले आहे. राशिन येथे जाऊन पूर्ववत कारभार सुरू ठेवावा.''

त्यावर केशवपंत म्हणाले ''आता माझी नोकरी करण्याची इच्छा नाही. आम्हास आता यात्रेला जायचे आहे. आमचे धाकटेबंधू आहेत त्यांची इच्छा असल्यास त्यांना आज्ञा व्हावी व मला इष्ट हेतू साध्य करण्यास निरोप मिळावा.'' राजे साहेबांनी आज्ञा दिली. तेथून निघून ते नासिकला आले. सर्वांच्या भेटी घेऊन राशिनला पोहोचले. श्रीगुरुमूर्ती उद्‌बोधनाथ महाराजांचे चरणदर्शनाचा लाभ झाला. तो आनंद अवर्णनीय.

त्यांनी नजर कैदेत असताना केलेला पतित पावन धावा श्रीगुरुसन्मुख म्हटला. श्रीगुरूंनी मस्तकावर हात ठेवला व म्हणाले ''आम्ही प्रसन्न झालो आहोत. आजपासून आपले नाव 'केसरीनाथ' झाले, आपण नाथपंथ प्रसाराचा कार्यभाग करावा.'' आजही हा केसरीनाथ महाराज कृत धावा - परंपरेने देऊळगांव राजा, ग्वालीयर, न्हावी (ता. यावल जि. जळगांव) या तीनही मठात दररोज म्हटला जातो.

सद्‌गुरुवर पूर्णभार घालून त्यांनी जो धावा केला त्यातील शेवटचे चरण ...

**जाणसी तू करी आता । माझी तुजला चिंता । तुजवरी भार माझा । सत्य जाण अनंता ।**
**अलंकार तुझे तुज । शरण आहे तत्त्वता । केसरी दीन राखी । गुरु उद्‌बोधनाथा ।**
**पतित पावना रे ॥**

सद्‌गुरूंना अनन्यभावाने शरण गेल्यार कैदेतूनच काय जन्म-मरणाच्या बंधनातूनही सुटका होते. धावा झाल्यावर केसरीनाथ महाराजांनी अनेक पदे, अभंग व सिद्धांतसार नावाचा ग्रंथ लिहिला. शके १६२८ ला श्रीशिवदिननाथ महाराजांना अनुग्रह देऊन ते आळंदीस आले.

केसरीनाथ महाराजांची ज्ञानेश्वर महाराजांवर अनन्य भक्ती कोती. त्याचेच फळ म्हणून

श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या साथिध्यात समाधी घेण्याचे महद्‌भाग्य त्यांना लाभले. शके १६४६ क्रोधिनाम संवत्सरात मार्गशीर्ष शुद्ध द्वितीया या दिवशी त्यांनी आळंदी येथे समाधी घेतली.

■ ■ ■



***श्री संत केसरीनाथ महाराज समाधी*** (संत ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिर परिसर, श्रीक्षेत्र आळंदी देवाची)

# ◆।। श्री संत शिवदिननाथ महाराज ।।◆

श्री शिवदिननाथ यांचे पूर्वीचे नाव सदाशिव. पित्याचे नाव केरकृष्ण जोशी, मातोश्रींचे नाव सरस्वतीबाई.

- **जन्म** - श्रीक्षेत्र पैठण येथे शके १६२० वैशाख व. ७.
- **व्रतबंध** - श्रीक्षेत्र पैठण येथे शके १६२७
- **विवाह** - श्रीक्षेत्र पैठण येथे शके १६२९, पत्नीचे नाव 'उमाबाई' असे होते.

सदाशिवाचे वयाचे ६ व्या वर्षी चमत्कार झाला तो असा... एके दिवशी मित्र मंडळींसोबत सदाशिव वाळवंटात खेळ खेळण्यासाठी गेला. शेवटी डाव सदाशिववर आल्याचा आरोप मुलांनी केला व मुले म्हणाली ''आता तू आमचे सोबत गावात येण्यास योग्य नाहीस. आम्ही तुला येथेच वाळूत पुरून ठेवतो.'' हे ऐकल्यावर सदाशिवास थोडेही भय वाटले नाही. केवढे असाधारण धैर्य. सदाशिव म्हणाला ''तुम्हास काय वाटेल ते करा.'' मुलांनी खड्डा खोदून त्यात सदाशिवास बसविले. वरून वाळू लोटून दिली. वर एक ढीग करून आपापले घरी निघून गेली. इकडे संध्याकाळ झाली. मुलगा घरी आला नाही म्हणून सदाशिवाचे वडील गावात चौकशी करू लागले. मित्रांचे घरी विचारले असता मुले भ्याली. त्यांनी सांगितले ''आम्ही वाळवंटात खेळत कोतो पण परत येतांना तो आमच्या सोबत नव्हता.'' पुरून ठेवल्याचे सांगितलेतर शिक्षा होईल या भीतीने मुले गप्प बसली. माता-पित्यास पुत्र वियोगाने दुःख झाले. त्यात उपोषण घडत होते. शोधाशोध सुरूच होती. दोन दिवस उलटून गेले. घरची सर्व मंडळी चिंताक्रांत होती.

मातापिता वाळवंटात शोधाशोध करीत होते. तिसरा दिवस उजाडला. सकाळच्या वेळी उभयतां श्री ढोलेश्वराचे शिवालयाजवळ गेले व प्रार्थना करू लागले. इतक्यात केसरीनाथ महाराज बाजूच्या गुंफेतून कर्मानुष्ठानास गंगेवर चालले असता त्यांनी ह्या दोघांस पाहिले. त्यांची चिंताक्रांत मुद्रा पाहून ते म्हणाले, ''आपण शोक का करीत आहात?'' उभयतांनी त्यांचे दर्शन घेतले व सर्व वृत्तांत कथन केला व शोध कुठे व कसा घ्यावा म्हणून विचारले. कृपाळु केसरीनाथांनी त्यांचे सांत्वन केले व म्हणाले ''परवा मध्यांन्ही जात असता ५-२५ मुले वाळूचा ढीग करीत होती. कदाचित त्यात त्यांनी सदाशिवास पुरले असावे. तर तो ढीग आपण काढून बघा.'' हे शब्द ऐकताच आनंदाने त्या वाळूच्या ढीगाकडे गेले व तो ढीग बाजूला करू लागले. त्यात मुलगा असेल हे साधुचे वचन ऐकून त्यांची शक्ती पुनर्जिवीत झाली. तो ढीग उपसताच पाहतात तर काय आश्चर्य मुलगा जसाच्या तसा ध्यान मग्न अवस्थेत बसलेला. त्याचे अंगास वाळूचा एक कणही स्पर्श करू शकला नाही. मातोश्रीने 'सदाशिव' अशी जोरात हाक मारली. ती प्रेमळ हाक कानी पडताच सदाशिवाने डोळे उघडले. तो वर आला. माता पिता व केसरीनाथांचे दर्शन घेतले व आईस घट्ट मिठी मारली. माता-पिता यांना खूप आनंद वाटला. त्यांनी सदाशिवास

केसरीनाथ महाराजांच्या चरणावर घातले व ह्यास अनुग्रहीत करण्याची विनंती केली. स्वामी केसरीनाथ म्हणाले, ''हा प्रत्यक्ष शंकराचा अवतार आहे. ह्यास अनुग्रकाची काय आवश्यकता. हा मोठा विख्यात संत होईल व सर्व दीन-दुबळ्यांना राजापासून रंकापर्यंत सर्वांना अनुग्रह देईल, भक्तिपंथास लावेल. याचा व्रतबंध संस्कार करा नंतर आम्ही यास अनुग्रह करू.''

पुढे शके १६२७ ला सदाशिवाचा व्रतबंध सोहळा पार पडला व नंतर केसरीनाथ म हाराजांनी सदाशिवास तारक मंत्राचा अनुग्रह दिला. अनुग्रह झाल्यावर सदाशिव आपले गुरु, स्वामी केसरीनाथांच्या सेवेत राहू लागले. सद्‌गुरु कडून एक-एक विद्या शिकू लागले.

एके दिवशी सदाशिवाने गुरु महाराजांस विचारले, ''आपणास केसरीनाथ का म्हणतात हे जाणण्याची माझी इच्छा आहे.'' महाराज म्हणाले, ''चल, तुला दाखवितो. तोपर्यंत तू ह्या छाट्या बाहेर वाळत घालून ये.'' सदाशिव छाट्या वाळत घालून गुफेत आला. पाहतो तर श्रीगुरूंच्या जागी एक सिंह पुच्छ आपटीत गुरगुर करीत बसला आहे. ते रूप पाहून सदाशिवाने विचार केला गुरु कोठे गेले. त्यांने मोठ्याने श्रीगुरुस हाक मारली व तो रुदन करू लागला. इतक्यात ते सिंह रूप अदृश्य होऊन केसरीनाथ महाराज त्यांचे जवळ आले व सदाशिवाचे मुखावरून प्रेमाने हात फिरवून म्हणाले ''तुला केसरी पाहण्याचा हेतू होता ना? ते रूप दाखविले पण बाळा, तुला भीतीतर वाटली नाही ना? तसे होण्याचे कारणही नाही कारण तू सामान्य नाहीस.'' सदाशिवाने उत्तर दिले, ''मला सिंहाची भीती वाटली नाही. पण आपण जवळ नसल्याने अंमळ कठीण वाटले.'' गुरु म्हणाले ''तुला भय वाटले असेल तर शिशुधर्माप्रमाणे ते गौण आहे. पुढील चार दिवसांनी तुला केसरीचे खरे स्वरूप दाखवू.''

चार दिवसांनी सदाशिवने पुन्हा आठवण करून दिली व आपले खरे स्वरूप दाखविण्याची विनंती केली.

पूर्वीप्रमाणे गंगास्नानाहून आल्यावर केसरीनाथांनी सदाशिवास छाट्या वाळत घालण्यास बाहेर जाण्यास सांगितले व आपण आत जाऊन नृसिंकाचे 'शोडष-भुजा' रूप घेऊन आसनस्थ झाले. सदाशिव आत येवून पाहतो तर काय श्रीगुरुंचे जागेवर प्रत्यक्ष नृसिंहाचे रूप ! अत्यंत देदिप्यमान कांती प्रकाशित होती. सदाशिवास भय वाटले व त्यांनी श्रीगुरूंचे स्मरण सुरू केले व प्रार्थना करू लागला. गुरुकृपेने हेच आपले श्रीगुरु आहेत याची जाणीव झाली आणि आनंद झाला. तत्काळ चरणी लोटांगण घातले. प्रल्हादाप्रमाणे त्यांचेवर प्रेम करु लागले. उग्ररूप जाऊन शांतरूप दर्शन झाले. काही वेळातच स्वामी आपले पूर्व स्वरूपात आले व म्हणाले ''बाळा आता जे रूप पाहिले, त्यास 'केसरी' म्हणतात.'' सदाशिवाची भक्ति, प्रेम, निष्ठा पाहून त्याचेवर प्रसन्न झाले व त्यास त्यांनी 'शिवदिननाथ' हे नाव दिले.

पुढे शके १६२९ गुरुकृपेनेच त्यांचा विवाह झाला. त्यांचे कुटुंबाचे नाव उमाबाई होते. विवाह झाल्यावर गुरु केसरीनाथांनी त्यास आज्ञा केली की, आता तुम्ही नित्य शिवपार्थिव पूजन करीत चला.

त्याप्रमाणे त्यांनी त्या व्रताचा अंगीकार केला. ते नित्य गाढेश्वराचे घाटावर जाऊन गंगास्नान करीत व तेथेच पार्थिव शिवपूजन करीत असत.

एके दिवशी पर्जन्य काळात शिवदिननाथांची शिवपार्थिव पूजा सुरू होती व गंगेस पूर येत होता. पूर वाढत वाढत अगदी शिवदिननाथांचे अंगावरून पाणी वाहत होते. पण पूजा-स्तोत्र ध्यान पूर्ण आटोपल्याशिवाय उठायचे नाही असा नित्यक्रम होता. तो मोडायचा नाही म्हणून स्थिरचित्ताने पूजा करीत गेले. पूर वाढत होता. लोक आवाज देत होते, आरोळ्या देत होते. पण पूजेत मग्न महाराजांना ते ऐकू येत नव्हते. लोकांचा आवाज बंद होऊ लागला. महाराज पुरात वाहून जातील म्हणून सर्व लोक दुःख करू लागले. संध्याकाळी लोक घरी गेले.

शिवदिननाथ महाराजांचे वाड्यावर गोंधळ सुरू झाला. लोकांनी येऊन सर्व वृत्तांत-वर्तमान सांगितले. परिवार शोकाकुळ झाला. कुटुंब सौ. उमाबाई साहेब बेशुद्ध पडल्या. मध्येच शुद्धीवर आल्यावर आपले मंगळसूत्र तोडू लागल्या पण ते तुटेना. तेव्हा त्यांना धीर आला. पूर कमी कोईना. दोन दिवसांनी पूर ओसरू लागला. घाट रिकामा होऊ लागला. महाराज तेथेच हातावर पार्थिव शिवलिंग घेऊन ध्यानमग्न अवस्थेत सर्वांचे दृष्टीस पडले. सर्वांनी महाराजांना नमस्कार केला. लिंबलोण उतरविले. जिकडे तिकडे आनंद झाला. ह्या परमानंदाची महती सांगताना शिवदिननाथ महाराज आपल्या पदात म्हणतात.

**नयनी शिवभरला । शिवभरला । भरला की भव हरला ।**
**केसरीगुरु अवतरला । अवतरला शिवदिन भव तरला ॥**

हा चमत्कार पाहून लोक आनंदाने नाचू लागले. शिवदिनकेसरीनाथ महाराज की जय असा जयजयकार करू लागले. घाटावरील सारी मंडळी आनंदाने जयघोष करीत होती. तो परमानंद घेण्याकरिता देवतांनी विमानातून पुष्पवृष्टी केली. दुसरे दिवशी केसरीनाथांनी शिवदिननाथास ''काल दर्शनास का नाही आले?'' असे विचारले असता ते म्हणाले, पूजेस विलंब झाल्याने येणे झाले नाही. सद्गुरूंना सर्व माहिती होते. एकंदर सर्व पाहून श्रीगुरुंना आनंद झाला. त्यांनी सप्रेमपूर्वक शिवदिननाथांचे मस्तकावर हात ठेवला. महाराज घरी परतले.

शिवदिननाथांचा ज्ञानेश्वरी पठणाचा नित्यनेम होता. कर्मानुष्ठान, नित्यपूजा, नैवद्य चालण्याकरिता त्यांनी एक मंदिर व गुफा बांधली. प्रस्तुत मंदिर विद्यमान असून त्यास 'जुनावाडा' असे म्हणतात. ज्ञानेश्वरीच्या पठणाचे वेळी दररोज दोन वानर श्रवणास येऊन बसत असत व पोथी संपताच निघून जात असे नित्य चाले. एकदा श्रोत्यांपैकी एका गृहस्थाने पू. महाराजांना प्रश्न केला की, ''महाराज हे कोण?'' त्यावर महाराज म्हणाले हे 'रामदूत' आहेत. व त्या प्रसंगाची आठवण म्हणून महाराजांनी खालील पद तयार केले.

**काळा वानर कोठोनी आला । जानकीला विस्मय झाला ।।**

**लांब शेपूट दिसते ज्याला । अद्‌भुत करितो पराक्रमाला ।।**

**लंपट रामाच्या स्मरणाला । निर्भय भीत नाही मरणाला ।।**

**शिवदिन केसरी गुरु रामाला । दास्य भक्तीच्या कामाला ।।**

शिवदिननाथ महाराज आपल्या गुरूंच्या गुरूंचा म्हणजे उद्‌बोधनाथ महाराजांचा उत्सव करीत असत.

एके वेळी असा प्रकार घडला की प्रतिष्ठानला (पैठणला) तूप मिळेनासे झाले. पुण्यतिथी महोत्सव सुरू झाला. संकल्प सोडण्यास तुपावाचून अडचण आली. तेव्हा शिवदिननाथांनी पुत्र-शिष्य श्री नरहरीनाथांस आज्ञा केली की, एक घागर गंगोदक आणा. पू. महाराजांनी तांदाळाचे अष्टदळ काढून त्यावर पाण्याने भरलेली घागर ठेवली. तिची श्रद्धापूर्वक पूजा केली व त्यातून अविरत धार तूप काढले. पंगती उठत होत्या, तूप संपत नव्हते. काही वेळाने शिष्यमंडळींनी बाहेर गावाहून तूप आणले. शिवदिननाथांनी ते तूप गंगेत अर्पण करण्यास सांगितले व नरहरिनाथास दरवर्षी उत्सवापूर्वी घट पूजन करण्याची आज्ञा दिली. त्यास ''तुमचे सद्‌गुरु कल्याण करणार आहे'' असा आशीर्वाद दिला.

शिवदिननाथांच्या एका हस्तलिखित पदातून आपल्या निर्याणाचा निश्चय त्यांनी आपले पुत्र-शिष्य 'श्री नरहरिनाथांस' सांगितला आणि मठाविषयी काही उपदेश-सूचना दिल्या.

**नृपसोळाशे शालीवाहन शक शकाण्णव तपमानासी ।**
**निर्याणीचा योग स्थापिता बोधसी सुत नरहरिसी ।।**

**घेवूनि स्वकुळा चालवा नाथपंत आगळा ।।धृ।।**

**हीनदीन जड शरणांगत तारक त्या उपदेशा ।**
**देवूनी तो प्रसार करावा नाथपंथ सकळा ।।१।।**

**षोडश भूषण नाथपंथाचे सांगितले असती ।**
**त्यासी धरूनि कपिलोक्तीने मंत्रस्मरावा निगूती ।।२।।**

**पुत्रात्मावैनामसीत हे सिद्ध वाक्य आगळे ।**
**ध्यानी आणूनी पंथी को, पूर्ण करी विमळे ।।३।।**

**निष्ठाभावे नाथचरणी रत भय नाही त्याला त्याकाळी ।**
**भजन पूजन संतर्पण ब्राह्मण करा भक्तीची वेली ।।४।।**

**याला विन्मुख कोता सत्पथ जाईल तो विलया ।**
**यास्तव कुटुंब वत्सलतेसह, सुगमपंथी रकाया ।।५।।**

**अतिथाभ्यंगता आली, भिक्षा घालूनी ऐसे करावे ।**
**ही जाता जिवीबहू धरूनिया संतती मान्य करावे ।।६।।**

**बहुदिवसाचे शेजळ गोत्रज आत्मबांधवासी रुजे ।**
**अज्ञ सुरासह प्रतिपाळावे, शिवदिन केसरी वचने ।।६।।**

शके १६९६ जयनाम संवत्सरात सोमवारी महाशिवरात्रीला श्रीक्षेत्र पैठण येथे शिवदिननाथ महाराजांनी समाधी घेतली.

■ ■ ■



श्री संत शिवदिननाथ महाराज समाधी (श्रीक्षेत्र पैठण)

# •॥ शिवदिन नंदन - संत श्री नरहरिनाथ महाराज ॥•

संत नरहरिनाथ महाराज हे शिवदिनकेसरीनाथ महाराजांचे पुत्र व शिष्य होत. पिता श्री शिवदिननाथ महाराज व माता उमाबाई यांचे पोटी संत नरहरिनाथ महाराजांचा जन्म श्रीक्षेत्र पैठण येथे चैत्र शुद्ध ७ शके १६४८ रोजी झाला.

बालपण पैठण येथेच गेले. घराण्यातील नाथ परंपरा, आध्यात्मिक वातावरण असल्यामुळे त्यांच्यावर बालपणापासून धार्मिक आध्यात्मिक संस्कार होत गेले. वयाच्या ७ व्या वर्षी म्हणजे शके १६५५ ला त्यांचा व्रतबंध सोहळा संपन्न झाला. पिताश्रीकडून गायत्रीमंत्राची दीक्षा झाली व परंपरेनुसार लगेच वेदाभ्यासास सुरूवात झाली. गायत्रीमंत्राचे पुरश्चरण झाले. आध्यात्मिक योग साधना वाढत होती. वेदाभ्यास पूर्ण झाला. ती योग्य वेळ आल्याचे पाहून सद्‌गुरुंनी त्यांना अनुग्रहित करण्याचे ठरविले व शके १६५८ ला म्हणजे वयाच्या १० व्या वर्षी शिवदिननाथ महाराजांनी नरहरिनाथ म हाराजांना तारक मंत्राचा उपदेश देऊन अनुग्रहित केले. पुढे संप्रदायाचा अभ्यास, ज्ञानेश्वरी पठण, केसरीनाथ महाराजांचा 'सिद्धांतसार' ग्रंथ व शिवदिननाथ महाराजांचा 'ज्ञानदीप' ग्रंथाचे अध्ययन, चिंतन, मनन होऊन महाराज कथा-कीर्तन करून समाज प्रबोधनाचे कार्य करू लागले.

शके १६६१ ला संत नरहरिनाथांचा विवाह झाला. त्यांचे कुटुंबाचे नाव गोपिकाबाई असे होते. त्यादेखिल तपस्विनी, साक्षात्कारी व पातिव्रत्य धर्म पालन करणाऱ्या होत्या.

पूर्वीच्या काळात श्रीमंत पेशव्यांनी शिवदिननाथ महाराजांना आनंदखूर्द परगणे हे गाव इनाम दिले होते. परंतु नाथांनी त्या देणगीकडे दुर्लक्ष केले कोते. त्यामुळे त्याचा वसुल श्रीमंतांकडेच जात होता. संत नरहरिनाथांच्या काळात पेशव्यांनी त्यांना पुन्हा पुण्यास बोलावून घेतले. तेव्हा श्रीमंतांनी महाराजांस त्या गावचा स्वीकार करण्याविषयी विनंती केली. परंतु आनंदखुर्द हे गाव फार दूर असल्याने त्याकडे लक्ष देणे होत नसल्याचं सांगून महाराजांनी जवळचे एखादे गाव देण्याविषयी सुचविले. महाराजांचे हे म्हणणे मान्य करून श्रीमंत पेशव्यांनी त्या गावाच्या ऐवजी पैठण तालुक्यातील 'मौजे गिधाड' हे गाव शके १६९३ मध्ये इनाम करून दिले. त्यांनतर संत नरहरिनाथ महाराजांचा यथोचित सन्मान करून त्यांना पैठणास पोहचवून दिले. काही दिवसांनी तीर्थरुपांची (गुरुदेवांची) आज्ञा घेऊन मातोश्रींसह नरहरिनाथ महाराज तीर्थयात्रेस निघाले. त्यांच्या मातोश्रींस पुत्रप्रेम अतिशय असल्याने त्यांनी बरोबर येण्याचा आग्रह धरला व महाराजांनीही तो आनंदाने मान्य केला.

तीर्थरुपांप्रमाणे म्हणजेच श्रीगुरुशिवदिननाथ महाराजांप्रमाणे नरहरिनाथ महाराजांनी तीर्थक्षेत्राच्या मार्गातील प्रत्येक देवस्थानाचे ठिकाण व जेथे गुरुसंप्रदायाचा उत्कर्ष होत होता तेथे अनेक अनुभूतिसिद्ध मनोवेधक व उपदेशपर अशी पदे तयार केली.

संत नरहरिनाथ महाराजांस चार पुत्र कोते **१) लक्ष्मीनाथ, २) विठ्ठलनाथ, ३) रामचंद्रनाथ, ४) महादेवनाथ** या चौघांनाही नरकेरनाथ महाराजांचा अनुग्रह होता. याचप्रमाणे नरहरिनाथ महाराजांचे दोन पट्टशिष्य देखील कोते. **१) श्री. महिपतीनाथ महाराज (ढोलीबुवा), २) श्री. नारायणनाथ महाराज**

संत नरहरिनाथ महाराजांना धाकटे भाऊ होते. त्यांचे नाव **'गदाधरनाथ'.** यांचा जन्म गया क्षेत्री शके १६५१ अश्विन पंचमीस झाला. व्रतबंध शके १६६०, गुरुमंत्र शके १६६१ साली झाला. विवाह शके १६६२ साली झाला, कुटुंबाचे नाव रमाबाई. शके १७०१ कार्तिक चतुदर्शीस गदाधरनाथांनी जलसमाधी घेतली. त्यांना ३ मुले होती. **१) वैजिनाथ, २) जगन्नाथ, ३) दीनानाथ** या प्रत्येकाने आपल्या देहाचे सार्थक केले.

संत नरहरिनाथ महाराजांचे तृतीय चिरंजीव **रामचंद्रनाथ महाराज** यांचा जन्म चैत्र नवमी शके १६६८ रोजी झाला. रामचंद्रनाथ महाराजांचा व्रतबंध शके १६७५ मध्ये झाला व शके १६७६ त्यांना गुरुमंत्र मिळाला. त्यांचे लग्न शके १६७८मध्ये झाले व त्यांच्या पत्नीचे नाव शालूबाई होते. ह्या देखील महासाध्वी होत्या. रामचंद्रनाथ महाराजांना शके १७०७ पुत्रप्राप्ती झाली व त्याचे नाव रघुनाथ भाऊसाहेब असे होते. रामचंद्रनाथ हे बालपणापासून सदाचार संपथ होते. तसेच गायन कलेत सशास्त्र निपुण ते शास्त्री असे प्राविण्यही त्यांनी मिळविले होते. उत्तम गळा लाभला असल्या कारणाने ते रसभरित कीर्तन करीत. त्यांच्या कीर्तनशैलीमुळे ते लोकमान्य झाले कोते. त्यांनी जेष्ठ वद्य ३ शके १७२९ ला समाधी घेतली.

### ● देऊळगाव राजा येथे आगमन

विदर्भ व मराठवाड्याच्या सीमेवर वसलेले देऊळगांव राजा (त्याकाळचे देवळी). येथून अगदी जवळच म्हणजे १३ किलो मीटर अंतरावर असलेले सिंदखेडराजा हे महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर झाले आहे. हिंदवी स्वराज्य साकारणाऱ्या छत्रपती शिवरायांच्या मातोश्री मांसाहेब जिजाऊ यांची ही जन्मभूमी. त्याकाळात राजमाता जिजाऊंचे बंधुपैकी एक, राजे जगदेवराव राजे जाधव यांचे सिंदखेड राजामध्ये वास्तव्य होते. राजे गढीवर राहत असत. राजे साहेबांची श्रीप्रभुलक्ष्मी व्यंकटेश बालाजी महाराज तिरूपती संस्थानवर भक्ती, निष्ठा व प्रेम होते. ते त्यांच्या राजघराण्याचे कुलदैवत होते. राजे जगदेवराव दरवर्षी तिरूपतीची वारी करीत, म्हणजेच दरवर्षी दर्शनास जात असत. एका वर्षी काही कारणाने महाराजांची तिरूपतीची वारी चुकली. त्यांच्या मनास बरे वाटेना. हुरहूर लागून राहिली की, यावेळी बालाजीसाहेबांचे दर्शन झाले नाही. ही आस मनी असताना एके दिवशी श्रीबालाजी महाराजांनी राजेसाहेबांना दृष्टांत देऊन सांगितले की, मी तुझ्यावर प्रसथ असून तुझी दर्शनाची ईच्छा पूर्ण होईल. त्यासाठी तुला नदीपात्रातील वाळूत माझी श्रीदेवीसह मूर्ती मिळेल (सापडेल) तिची प्रतिष्ठापना करा. मी तेथेच निवास करेन. (काही ठिकाणी ही मूर्ती तांदूळाच्या कणगीत सापडल्याचे म्हटले आहे.

याबाबतीत अनेक मतमतांतरे आहेत.) सकाळी राजे साहेबांनी आपल्या नगरी प्रतिष्ठितांसह त्या मूर्तीचा शोध घेण्यास सुरूवात केली. तो दृष्टांताप्रमाणे श्रींची अंगुष्ठामात्र मूर्ती मिळाली. सर्वांनाच अतिशय आनंद झाला. आता या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करावयास हवी असा विचार पुढे येताच महाराजांनी त्या काळची दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र पैठण येथे जाण्याचे ठरविले. त्याप्रमाणे महाराज पैठणास दाखल झाले. संत एकनाथ महाराजांना देऊळगाव राजाला येण्याबाबत व येथेच वास्तव्य करण्याबाबत विनंती केली. परंतु संत एकनााथ महाराजांनी आपले कार्यक्षेत्र पैठण असल्यामुळे कायमस्वरूपी येण्यास नकार दिला. तेव्ह ां राजे साहेबांनी एकनाथांना दुसऱ्या एखाद्या सत्पुरुषाचे नाव सुचविण्याची विनंती केली. तेव्हा त्यांनी श्री शिवदिनकेसरीनाथ महाराजांचे नाव सुचविले. त्याप्रमाणे राजेसाहेबांनी नंतर श्री शिवदिनकेसरीनाथ महाराजांची भेट घेतली व मूर्तीसापडल्याचा वृत्तांत सांगून प्राणप्रतिष्ठापना करण्याचा विचारही त्यांना बोलून दाखविला. याच भेटीत शिवदिनकेसरीनाथांना कायमस्वरूपी देऊळगाव राजास येण्याची विनंती देखील केली. परंतु त्यासमयी श्री शिवदिननाथ महाराजांनी राजे साहेबांना प्राणप्रतिष्ठेसाठी होकार दिला. परंतु या ठिकाणी श्रीनरहरिनाथ महाराज हे कायमस्वरूपी वास्तव्यास येतील असे देखील सांगितले.

राजे साहेबांनी शिवदिननाथ महाराजांच्या या म्हणण्याला तात्काळ होकार दिला व स्वतः संत नरहरिनाथ महाराजांचा अनुग्रह घेतला. त्यांचे शिष्यत्व पत्करले.त्यानंतर नरहरिनाथ महाराजांना त्यांनी सन्मानाने देऊळगाव राजास आमंत्रित केले. या आमंत्रणाचा स्वीकार करून संत नरहरिनाथ महाराज गुरुआज्ञेने देऊळगाव राजा येथे गेले. तेथे नाथांच्या उपस्थितीत श्रींची प्रतिष्ठापना झाली. श्रींचे दैनंदिन पूजन, अर्चन, उत्सवाचे सर्व नियम व विधी ठरविले गेले. नाथ संप्रदाय हा सर्वसमावेशक असल्यामुळे प्रत्येकास दर्शनाचा अधिकार प्राप्त झाला. प्रत्येक जातीजमातीतील व्यक्तींना श्रींचे सेवेस सामावून घेण्यात आले.

राजे साहेबांनी संत नरहरिनाथांचे शिष्यत्व पत्करल्याने देऊळगाव राजा हे त्यांचे गुरुघर झाले. त्यानंतर राजे साहेबांनी स्वतः संत नरहरिनाथ महाराजांना एक 'सनद' तयार करून दिली. ज्यात राजगुरु असल्यामुळे संत नरहरिनाथ महाराजांना राजगुरुचे स्थान प्राप्त झाले. तसेच श्रीबालाजी महाराजांचे प्रत्येक उत्सवात संत नरहरिनाथ महाराज व पुढे वंशपरंपरेने जे मठाधिपती असतील त्यांना श्रींचे दसरा महोत्सवात श्रींचे दर्शन करवून श्रींचे पालखी समोर स्थान, श्रींचे लळीत उत्सव, श्रींचे दर्शन, व प्रथम भजनाचा मान, श्रींचे दिवाळीचे पाडव्याचे दिवशी श्रींची भिक्षा व त्यानिमित्त बिदागी व इतर मान-सन्मान याचा स्पष्ट उल्लेख आहे. (विस्तृत वृत्तांत 'महोत्सव' या सदरात आहे) अशा रीतीने संत नरहरिनाथ महाराज संस्थान देऊळगाव राजा येथे अस्तित्वात आले.

संत नरहरिनाथ महाराज संस्थानाच्या दररोजच्या पूजेसाठी, नैवेद्यासाठी नगारखान्यासाठी श्री बालाजी महाराज संस्थानाकडून वंशपरंपरेने नियमित देणगी, मान-सन्मान व महाशिवरात्रीच्या

# सनद



**राजे जाधवांकडून संस्थानास मिळालेली सनद** (श्रीक्षेत्र देऊळगाव राजा)

महोत्सावासाठी अन्नदान इ. बाबींचा स्पष्ट उल्लेख सनदेत सापडतो.

### ● समाधी

जनकल्याणासाठी नाथपरंपरेतून अनेक वर्ष कार्य केल्यावर काळाच्या ओघात श्री नरहरिनाथ महाराजांना वार्धक्य आले. एकदा महाराज श्रीक्षेत्र पैठणहून घोड्यावर बसून देऊळगाव राजास येत होते. देऊळगाव राजा जवळ आले असतानाच काही अंतरावर महाराजांच्या घोड्याचा पाय झुकला व महाराज घोड्यावरून पडले. त्यांना लगेच देऊळगाव राजातील संस्थानात आणण्यात आले. त्याचवेळी महाराजांना आपले अवतार कार्य संपत आल्याची जाणीव झाली. त्यांनी चतुर्थाश्रम घेण्याचे ठरविले. महाराजांच्या मुलांना पुणे, आळंदी, पैठणहून देऊळगांव राजास बोलवण्यात आले. सर्व मंडळी एकत्र होत होती. अनेक शिष्य देऊळगाव राजास हजर झाले. महाराजांनी सर्वांना एकत्र बोलावून पुढील उत्तराधिकारी म्हणून 'लक्ष्मीनाथ महाराज' यांचे नाव निश्चित केले. महाराजांच्या उपस्थितीत लगेचच त्यांचा पीठारोहण सोहळा संपथ झाला.

पुढे काही दिवसातच म्हणजे माघ व १० शके १७१५ ला संत नरहरिनाथ महाराज समाधिस्त झाले. त्यानंतर लक्ष्मीनाथ महाराजांनी पंथप्रचार व प्रसाराचे कार्य आपले हाती घेतले. प्रथम आपले गुरुदेवांचे म्हणजेच संत नरहरिनाथ महाराजांचे समाधिस्थानावर मठ बांधला.

■ ■ ■



**श्री संत नरहरिनाथ महाराज समाधी** (श्रीक्षेत्र देऊळगाव राजा)

# ॥ श्री संत लक्ष्मीनाथ महाराज ॥

लक्ष्मीनाथ महाराज हे संत नरहरिनाथ महाराजांचे पुत्र-शिष्य होते.

- **जन्म** - अश्विन व ३० शके १६७१ (लक्ष्मीपूजन)
- **व्रतबंध** - उपनयन संस्कार शके १६७७
- **उपदेश गुरुमंत्र** - शके १६७८
- **विवाह** - शके १६८१, पत्नीचे नाव - सत्यभामा बाई

लक्ष्मीनाथ महाराजांना संत नरहरिनाथ महाराजांचा अनुग्रह होता. मुळातच पूर्वजन्मीचे सुकृत घेऊन आलेले असल्यामुळे एकपाठी, कोणतीही विद्या शिकण्यास घेतली की, लगेच त्यात तरबेच असत. श्री नरहरिनाथ महाराजांजवळच विद्याभ्यास, योगाभ्यास, कथा-कीर्तनाचा अभ्यास झालेला असल्यामुळे 'प्रतापे करी कीर्तनी भक्ति लीला' असा त्यांचा कीर्तनातील प्रभाव होता. त्यांची कीर्ती दिगंत पसरलेली होती. गुजराथ प्रांताचे राजे फत्तेसिंह गायकवाड (बडोदा) यांनी महाराजांचा अनुग्रह घेतला. राजे साहेबांनी महाराजांचा सन्मान केला. गुरूमंत्र घेतला म्हणून श्रीगुरुदक्षिणे प्रीत्यर्थ गुजराथेतील 'मोरबा' गावचा आठ हजार रु. इनाम मिळवून ते पुन्हा प्रतिष्ठानला (पैठणला) आले.

लक्ष्मीनाथ महाराज प्रतिवर्षी केसरीनाथ महाराजांचे उत्सवासाठी श्रीक्षेत्र आळंदी येथे जात. मार्गात पुणे मुक्कामी संप्रदायी शिष्य - सदाशिवनाईक वानोळे यांचेकडे ते उतरत. त्याकाळात पुण्यातील श्रीमंत बाजीराव पेशवे सरकार यांनी लक्ष्मीनाथ महाराजांची कीर्ती ऐकली कोती. तेव्हा पासून सरकारला महाराजांचे कीर्तन ऐकण्याची इच्छा होती. त्यांना स्मरण आले की, आपले वानोळे यांचे कडे महाराज उतरतात. एका वर्षी असेच ते वानोळेंकडे उतरले होते. तेव्हा महाराजांच्या आगमनाची वार्ता कानी पडताच सरकारांनी सदाशिव वानोळे यांस बोलावले व सांगितले की, ''तुमचे गुरुवर्य संतचूडामणी असून जड जीवांचे उद्धार करण्यास या अवनीतलावर अवतीर्ण झाले आहेत. त्यांचे भजन श्रवण करण्यास्तव आमचे वाड्यावर आगमन झाल्यास मी कृतार्थ कोईन. याशिवाय दोन लक्ष रूपयांचा ओटा करून त्यावर महाराजांस आसन करून भक्तिपूर्वक त्यांचे पूजन करीन.'' पेशवे सरकारांचा हा निरोप घेऊन सदाशिवराव घरी परतले. पू. गुरुनाथ महाराजांच्या सन्निध बसून सरकारचा हेतू प्रगट केला. ते ऐकताच नाथांचे उत्तर आले की, पुन्हा ही गोष्ट आमचे पुढे बोलू नये. ते ऐकून वानोळे चूप झाले. मनात चपापले.

दोन लक्ष रूपये, जहागिरी व राजकृपा या तीनही गोष्टी महाराजांनी तुच्छ मानाव्यात हे काही सामान्य निःस्पृहतेची गोष्ट नव्हे. (येथे एका गोष्टीची आठवण कोते ती म्हणजे तुकाराम महाराजांना शिवाजीराजांनी नजराणा दिल्यावरचे संत तुकाराम महाराजांचे उत्तर)

त्यानंतर पुण्याहून निघाल्यावर महाराज ब्रह्मनाळला आले. त्यावेळी कोणा संताची उत्सव-यात्रा होती. तेथे बरेच साधुसंत भजन करीत कोते. महाराज म्हणाले की आम्हास येथे भजन करावयाचे आहे. तेव्हा तिथे काही कुटाळ मंडळी कोती. ती महाराजांची परीक्षा घ्यावी या हेतूने म्हणाली की, ''आपल्या चमत्काराने ही समाधी डोलणार असेल तर आपण भजनास उभे राहा.'' त्यावर महाराज ''श्रीसद्‌गुरु काय करतील ते बघू'' असे म्हणून त्यांनी 'श्री शिवदिन केसरी गुरु उद्‌बोधनाथ महाराज की जय' असा गजर केला. नाथांच्या परिपाठाप्रमाणे 'जय ज्ञानेश्वर माऊली, महाराज ज्ञानेश्वर माऊली' या भजनाने सुरूवात केली. आणि काय चमत्कार, एका घटकेच्या आत ती समाधी डोलू लागली. सर्वांना खूप आनंद झाला. कुटाळ मंडळी हात जोडून माफी मागू लागली. हे सर्व पाहून त्या लोकांनीही पू. महाराजांचा मोठा सन्मान केला. यानंतर महाराज पैठणास परत आले.

अशा रीतीने लक्ष्मीनाथ महाराजांनी आपले जीवनकार्य पूर्ण केले. त्यानंतर मार्गशीर्ष महिन्यात परमगुरू केसरीनाथ महाराजांचे पुण्यतिथी उत्सावास व समाधी दर्शनास आळंदीस गेले असता स्वतः चतुर्थाश्रम घेऊन मार्गशीर्ष शु. पंचमी शके १७३२ ला माऊलींचे सानिध्यात केसरीनाथ महाराजांचे समाधी समोर समाधी घेतली.

श्रीक्षेत्र आळंदी येथे मंदिरात प्रवेश केल्यावर डाव्याहाताला एकनाथ पाराजवळ ज्या समाधी आहेत, त्यात **श्री केसरीनाथ महाराज, श्री भोजलिंग काका व त्यासमोरील छोटी समाधी श्री लक्ष्मीनाथ महाराज** यांची आहे.

श्री लक्ष्मीनाथ महाराज विद्यमान असताना अनेक चमत्कार घडले. अर्थात हे चमत्कार करण्याचा संतसज्जनांचा कोणताही स्वार्थ हेतू नसतो. केवळ जनकल्याणासाठी व चुकलेल्यांना मार्गी लावण्यासाठी साक्षात जगतनियंता ते संतांच्या माध्यमातून घडवित असतो. लक्ष्मीनाथ महाराज देहात असताना असे चमत्कार बरेचदा घडत असत. परंतु महाराजांनी समाधी घेतल्यानंतरही काही चमत्कार झाल्याचे अनुभव आहेत. ते पुढीलप्रमाणे

### १) गोपाळराव कडेकरांना महाराजांचा अनुग्रह

गोपाळराव कडेकर-देशमुख महाराजांचे शिष्य कोते. त्यांचा प्रतिवर्षी पैठणास जाण्याचा नियम कोता. तेथे ते महिना-पंधरादिवस महाराजांकडे मुक्काम करीत, भजन-पूजन-कीर्तनाचा आस्वाद घेत. ते वेळोवेळी महाराजांना गुरूमंत्र देण्याची विनंती करीत असत. परंतु त्यावेळी महाराज केवळ 'पुढे पाहू' एवढेच म्हणत व गोपाळरावांची अनुग्रह घेण्याची इच्छा तशीच अपूर्ण राहत असे. पुढे जेव्हा महाराज समाधिस्थ झाल्याची वार्ता देशमुखांना समजली तेव्हा त्यांना अत्यंत वाईट वाटले. शिवाय आपल्याला अनुग्रह झाला नाही म्हणून ते शोकाकूल झाले. याच शोकमग्न मनाने सर्व सिद्धता करून ते आळंदीस जाण्यास निघाले. त्यावेळी घरच्या लोकांस म्हणाले की आता मात्र अनुग्रह झाल्याशिवाय

परत घरी येणार नाही. असा निश्चय करून गोपाळराव आळंदीत आले. इंद्रायणीत स्नान करून त्यांनी महाराजांच्या समाधीस तीन प्रदक्षिणा घालून नमस्कार केला. समाधीस्थळी हात जोडून ते म्हणाले ''महाराज, आपला उपदेश झाल्याशिवाय मी येथून परत फिरणार नाही.'' अशी प्रार्थना करत ते सात दिवस अन्न-पाण्यावाचून समाधीस्थळी बसून होते. सात दिवसानंतर त्यांचा निग्रह पाहून लक्ष्मीनाथ महाराजांनी त्यांना प्रत्यक्ष दर्शन देऊन उपदेश दिला व कृतार्थ केले. त्यानंतर गुरुदीक्षा लाभल्याच्या आनंदात कडेकर पुन्हा आपले गावी आले. त्यांचे मनी प्रसन्नता होती, कृतार्थतेचा आनंद त्यांचेकडे होता.

## २. श्रीमंत बाजीराव पेशव्यांचा रूपया उडविला

श्रीमंत बाजीराव पेशव्यांनी देऊ केलेली धनसंपदा लक्ष्मीनाथ महाराजांनी कधीच स्वीकारली नाही. ही कथा आपण मागील पानावर पाहिलीच. कारण संतांची कृपा ही पैसे देऊन विकत घेता येत नाही, त्यासाठी मनात भक्तीभाव असायला लागतो. निष्ठा व तळमळ हवी. म्हणूनच पेशव्यांच्या लक्ष्मीलाही लक्ष्मीनाथ महाराजांनी कधीच होकार दिला नाही. उलट त्याप्रसंगानंतर महाराजांनी पेशव्यांना दर्शन देणे बंद केले. महाराजांच्या अखेरपर्यंत श्रीमंतांना त्यांचे दर्शन होऊ शकले नाही.

श्रीमंत बाजीराव पेशव्यांचा प्रतिवर्षी कार्तिक मासी आळंदीस माऊली ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्यास येण्याचा नियम होता. शके १७३३ मध्ये संजीवन समाधी सोहळ्यासाठी पेशवे सरकार आळंदीत आले, तेव्हा माऊलींच्या मंदिरात लक्ष्मीनाथ महाराजांची समाधी होती. पेशव्यांनी संत ज्ञानेश्वर माऊलींचे समाधी दर्शन घेतले व ते केसरीनाथ महाराजांचे दर्शनास गेले. त्यानंतर लक्ष्मीनाथ महाराजांचे समाधी दर्शन घेतले. समाधीस साष्टांग नमस्कार केला. समाधीपुढे पेशव्यांनी १ रूपया ठेवला. आणि आश्चर्य म्हणजे तो १ रूपया चक्क हवेत उडाला आणि श्रीमंतांच्या कपाळांस जाऊन चिकटला. पेशव्यांचे धनवैभव हे लक्ष्मीनाथ महाराजांनी समाधीनंतरही स्वीकारले नाही, हे या गोष्टीतून लक्षात येते.

■ ■ ■



**श्री संत लक्ष्मीनाथ महाराज समाधी** (संत ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिर परिसर, श्रीक्षेत्र आळंदी देवाची)

# ॥ श्री संत महिपतीनाथ महाराज (ढोली बुवा) ॥

संत नरहरिनाथांच्या पट्टशिष्यांमधले एक म्हणजेच संत महिपतीनाथ महाराज. महिपतीनाथ यांचे नाव महिपती भारती असल्याचे म्हटले जाते. परंतु त्यांचे लौकीक आयुष्यातील नाव सखाराम केरसुणे असून त्यांचे मूळ घराणे पैठणचे होते. एवढेच नव्हे तर श्री एकनाथ महाराजांचे गुरु श्रीजनार्दन स्वामी यांच्याच वंशातील ते होते. ते देशस्थ ऋग्वेदी विश्वामित्र गोत्री ब्राह्मण होते असे उपलब्ध माहितीप्रमाणे कळते. त्यांचे वडील हे पेशव्यांचे पदरी कारकून कोते. दुर्दैवाने त्यांचे माता-पिता बालपणीच वारले, त्यांचे पालन-पोषण वडील बंधूंनी केले. त्या काळच्या रुढीप्रमाणे वयाच्या १२ व्या वर्षी त्यांचे लग्न करण्यात आले. परंतु दुर्दैवाने तेथेही त्यांचा पिच्छा सोडला नाही. त्यांची धर्मपत्नी लवकरच त्यांना सोडून गेली. ह्या दैवाघाताने त्यांच्या वृत्तीत विरक्ती उत्पन्न झाली. ते पैठण सोडून आळंदीस आले. तेथे संत ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीजवळ बसून रहायचे व रात्री जवळच्याच अजानवृक्षाच्या बनात झोपायचे असा त्यांचा क्रम चालू होता. त्यांच्या ह्या तपश्चर्येची सांगता लवकरच झाली. अवघ्या ४ ते ६ दिवसात त्यांना रात्री स्वप्नात श्रीज्ञानेश्वर महाराजांनी दृष्टांत दिला व 'पैठणला श्री नरहरिनाथांजवळ जा, तेथेच आपला कार्यभाग साध्य कोईल' असे सांगितले. माऊलींच्या आदेशानुसार ते आळंदीहून पैठणास श्री नरहरिनाथ महाराजांच्या मठात आले. तेथे त्यांनी श्रीनरहरिनाथ महाराजांस साष्टांग प्रणाम केला. सखाराम हे आळंदीहून ज्ञानेश्वर महाराजांच्या दृष्टांतानुसार आले आहेत हे जाणून त्यांना नरहरिनाथांनी आपल्यापाशी ठेवून घेतले. काही काळानंतर नाथांनी महिपतीस उपदेश दिला. त्यांचे नाव महिपतीनाथ ठेवले. या अनुग्रहानंतर महिपतीनाथांचा हळुहळु योगाभ्यासास प्रारंभ झाला. नरहरिनाथ महाराजांचे पुत्र शिष्य लक्ष्मीनाथ महाराज हेही त्यांचे बरोबर अभ्यास करीत कोते.

सांप्रदायिक आख्यायिका व सत्य घटना यांची वीण संत पुरुषांच्या जीवनात सारखी सुरू असते. त्यांचा उभा आडवा जीवनपट ऐतिहासिक व काल्पनिक धाग्यांच्या विणीने विणला जात असतो. सांप्रदायिक आख्यायिकेनुसार असे कळते की, पैठणला याच सुमारास अण्णादेव या नावाचे सत्पुरुष राहत होते. अण्णादेव हे संत एकनाथ महाराजांच्या मठात भागवत, पुराण वाचत असत. त्याचबरोबर ते नरहरिनाथ महाराजांकडे योगाभ्यास करीत असत. मठात भजन-कीर्तन सतत चालत असे. ते ऐकून महिपतीनाथांना प्रेरणा मिळाली व त्यांनीही भजन कीर्तन करण्यास आरंभ केला.

अण्णा देवांचा सतत सहवास लाभल्याने महिपतीनाथही एकनाथ महाराजांच्या मठात कीर्तन करू लागले. उत्तम कीर्तनकार म्हणून हळूहळू त्यांची सर्वत्र प्रसिद्धी कोऊ लागली. हे चालू असतांना महिपतीनाथ व अण्णा देव यांचा श्रीनरहरिनाथ महाराजांजवळ योगाभ्यास सुरुच कोता. तो संपला तेव्हा गुरुने शिष्यास प्रत्येकी एक ढोल दिला. हे दिलेले ढोल आजही या दोघांच्या परंपरेतील मठात - मंदिरात विद्यमान आहेत. एवढेच नव्हे तर भजन, आरती, उपासना, आराधना, उत्सव इत्यादी प्रसंगी त्यांचा उपयोग करण्यात येतो.

महिपतीनाथ हे विशेषतः कथा-कीर्तना करिता भ्रमण करीत असत. त्यावेळी ते प्रसादाचा ढोल, गुरुकृपानुग्रहाचा ढोल त्यांचेबरोबरच असे यावरून त्यांचे नाव 'ढोलीबुवा' असे पडले व पुढे ते रूढ झाले. त्यानंतरही परंपरेतील गादीधारी व्यक्तींना हेच नामाभिदान प्राप्त झाले.

अध्यात्मामध्ये गुरु-शिष्य परंपरा ही पूर्वसुकृताने ठरलेली असते. आणि त्यामध्ये कोणतेही संतपुरुष हस्तक्षेप करत नाही. याचे उदाहरण अण्णा देवांच्या बाबतीतही दिसून येते. अण्णा देव हे नरहरिनाथ महाराजांकडे योगाभ्यास शिकत असत. परंतु आपण त्यांचे गुरु नाही हे महाराजांना ठाऊक होते. अण्णादेवांचे उपदेश गुरु 'सरभंगीनाथ' हेच होणार हे देखील महाराज जाणून होते. त्यामुळेच नरहरिनाथ महाराजांनी त्यांचेकडून योगाभ्यास करवून घेतला. मात्र नाथपंथाचा बाणा दिला नाही. त्यामुळे अण्णा देव व महिपतीनाथ या दोघांपैकी केवळ महिपतीनाथांना यथाविधी नाथ संप्रदायाची दीक्षा महाराजांनी दिली. त्यानंतर नाथ संप्रदायाचा प्रचार व प्रसार करण्याची आज्ञा दिली.

नाथ संप्रदायानुसार त्यांनी 'गुरुभक्तीला' अनन्य साधारण महत्त्व दिले. गुरुकृपेनेच आम्ही 'महिपती झालो' असेही ते आत्मानुभवाने सांगतात. त्यांची शेकडो पदे रचलेली आहेत. त्यांच्या प्रत्येक पदातून गुरुकृपा, गुरुभक्ती, सतसंगतीची महती गायली आहे. त्यांची जवळपास ५०० च्या पर्यंत हिंदी-मराठी पदे आहेत. त्यांनी आपल्या पदाच्या शेवटी महिपती नरहरिनाथ असा उल्लेख केला आहे.

यांची कारकिर्द ग्वाल्हेर (म.प्र) मध्येच जास्त झाली. तेथील शिंदे (सिंधीया) राजघराण्याने ढोलीबुवांचा 'राजगुरु' म्हणून सन्मान केला. त्यांचे शिष्यत्व पत्करले. राजघराण्याच्या रुढीनुसार परंपरेने आजही शिंदे घराण्याच्या परिवारिक महत्त्वाच्या ठराविक कीर्तनाचा मान ढोलीबुआ घराण्याचाच आहे.

गुरुआज्ञेने मध्यप्रदेशात आपले कार्य ढोलीबुवांनी पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी पौष शुद्ध त्रयोदशीला ग्वाल्हेर येथेच समाधी घेतली.

■■■



श्री संत महिपतीनाथ महाराज समाधी (ग्वाल्हेर, म. प्र.)

# ॥ संत नारायणनाथ महाराज ॥

संत नरहरिनाथ महाराजांचे दुसरे पट्टशिष्य नारायणनाथ महाराज यांच्याबद्दल तशी फारशी माहिती मिळत नाही. सातपुड्याच्या कुशीत मयूर नदीच्या किनाऱ्यावर वसलेले न्हावी (ता. यावल, जि. जळगांव) हे गांव तसं छोटंसं आहे. पण सद्‌गुरु नारायणनाथ महाराजांच्या वास्तव्यात पुनीत झालेल्या या न्हावी ग्रामात धर्म-संस्कृती-शिक्षण एकमेकांच्या हातात हात घालून चालत आहे. तेथे नाथ परंपरा आहे. सद्‌गुरु नारायणनाथ महाराज यांचे समाधी स्थान 'श्री विठ्ठल मंदिर' म्हणून प्रसिद्ध आहे. त्यांची आरती दररोजच्या म्हणण्यातील असून त्यात प्रथम कडव्यात ग्राम न्हावीची महती कळते. दुसऱ्या कडव्यात त्यांची वेशभूषा ज्याला नाथ संप्रदायात बाणा म्हणतात त्याचे वर्णन म्हणजे, शैली, शिंगी, पुंगी, पायात तोडा हातात छडी, त्रिशूल वगैरेचे वर्णन आढळते. तिसऱ्या कडव्यात त्यांनी श्रावण मासात कृष्ण पक्षात त्रयोदशीच्या दिवशी आपला निजदेह ठेऊन परब्रह्मी वास केला. (समाधी घेतली) एवढीच माहिती कळते.

परंतु त्यांनी केलेल्या कार्यामुळे ह्या मठाशी तसेच देऊळगावच्या संत नरहरिनाथ महाराज संस्थानशी असलेले गुरुशिष्य परंपरेचे नाते आजही कायम आहे. श्री विठ्ठलनाथ, श्री गणेशनाथ, श्री गौतमनाथ, श्री भानुदासनाथ व आजतागायत ही परंपरा कायम सुरू आहे.

मनुष्याने आपल्या आयुष्यात 'गुरु' केलाच पाहिजे. अनुग्रह झालाच पाहिजे त्याशिवाय मुक्ती नाही. ही श्रद्धा आजच्या विज्ञान युगात सुद्धा अनुभवाने जगणारे आणि सांगणारे लोक ह्या गावी आहेत. आपला मुलगा-मुलगी यांचे लग्न झाल्याबरोबर त्यांनी गुरुमंत्र घेतलाच पाहिजे, ही अपेक्षा असणारे व ती सहज सिद्ध करणारे तरुण-तरुणी आजही आनंदाने गुरुमंत्र घेण्यास तत्पर आहेत व आपली आध्यात्मिक प्रगती करून घेण्यासाठी इच्छुक आहे.

अशा ह्या गावी शिक्षणाचे सर्व दरवाजे उघडे आहेत. येथे कला-वाणिज्य-विज्ञान-तंत्रनिकेतन, इंजिनिअरिंग कॉलेज इ. सर्व सोयींनी युक्त अद्ययावत विद्यालये-महाविद्यालये आहेत. मधुकर सह. साखर कारखाना आपले वेगळे अस्तित्व टिकवून आहे. केळीच्या बागांनी सुख-समृद्धीकडे वाटचाल आहे.

■ ■ ■



**श्री संत नारायणनाथ महाराज समाधी** (श्रीक्षेत्र न्हावी, जि. जळगाव)

# ॥ श्री संत विठ्ठलनाथ महाराज ॥

श्री विठ्ठलनाथ महाराज हे संत नरहरिनाथ महाराजांचे पुत्र होते.

- **जन्म** - शके १६९१ आषाढ शुद्ध एकादशी
- **व्रतबंध** - शके १६९८ ला संपन्न झाला.
- **अनुग्रह** - परंपरेनुसार श्री नरहरिनाथ महाराजांचा अनुग्रह शके १७०६
- **विवाह** - शके १७०९, पत्नीचे नाव सौ. चंद्रभागाबाई

वैराग्यशीलता प्रभावी असल्यामुळे विठ्ठलनाथ महाराजांनी जप, तप, साधना, ध्यान- धारणा, योग ह्या सर्वांमध्ये प्रावीण्य संपादन केले. रोज रात्री नियमितपणे ते 'ज्ञानेश्वरी' पठण करीत व अर्थ सांगत असत. विठ्ठलनाथ महाराजांची ज्ञानसाधना व भक्ती प्रखर असल्याने त्यांच्याकडे अनेक अलौकिक शक्ती होत्या. परंतु या शक्तींचा वापर महाराजांनी नेहमी जनकल्याणासाठीच केला.

**हरभटांचे विष उतरविले**

विठ्ठलनाथ महाराज दररोज गंगेवर जात असत. मार्ग चांगला नसल्यामुळे चालतांना सोबत असणाऱ्या व्यक्तींनाही त्रास कोई.त्यासाठी महाराजांनी दरडीला दगडी पायऱ्या इंद्रेश्वराचे मठापर्यंत तयार करण्याचे ठरले. त्यांच्या सोबत गंगेवर नेहमी येणाऱ्या मंडळीपैकी गोविंद खंडेराव उर्फ दाजी साहेब हटकारे, विठोबा देशपांडे, जागोबा नाईक-रांजणगावकर यांचे जवळ त्यांनी हा विचार बोलून दाखविला. महाराज स्वच्छंदी होते. एखादी गोष्ट करायची म्हटल्यावर ते ती करणारच हे जाणून सर्वांनी त्यांना कोकार दिला. त्याप्रमाणे पायरीसाठी सर्वजण प्रयत्न करू लागले. मोठमोठे दगड बाजूला करीत, स्वच्छता करीत असत. एका दगडाखाली हात घालताच 'हरभट' नावाच्या व्यक्तीस कुठल्यातरी प्राण्याचा दंश झाला. सर्वजण अतिशय भयभीत झाले. परंतु हरभट म्हणाले, ''माझे गुरु सोबत असतांना मला भय कसले?'' परंतु विष आपला परिणाम करण्यावाचून राहिले नाही. तात्पर्य हरभट बेशुद्ध पडले. मंडळींनी ही बाब नाथांच्या कानी घातली. ते हळहळले, गुरुअंतःकरण फार मृदू असते. त्यांनी त्या ब्राह्मणावर दया केली. योगबलाने त्याचे विष आपल्या शरीरात प्रविष्ठ करून घेतले व नीलकंठाप्रमाणे ते सहन केले. ते म्हणाले, ''माझे सद्‌गुरु चराचरात भिन्नभिन्न स्वरूपात भरले आहेत. ते जेथे, तेथे आनंद स्वरूपात स्थिर आहेत. तेव्हा त्या आनंदस्वरूप अवलोकनात विषबाधा कोठून आली?'' याला म्हणतात योग सामर्थ्य. काही वेळात हरभट सावध झाले. त्यांनी शुद्धीवर येऊन महाराजांचे दर्शन घेतले. सर्वजण आनंदी झाले. आपआपल्या घरी परतले. पुढे थोड्याच दिवसात त्या पायऱ्यांचे काम पूर्ण झाले. इथे महाराजांच्या अंगी असणाऱ्या शक्तींबाबत सांगण्याचे प्रयोजन नाही, तर शिष्याची संपूर्ण काळजी गुरु कसे घेत असतात, हे यातून वाचकांसमोर मांडण्याचा प्रयत्न आहे.

**● दगडामागून भागीरथी प्रकटली**

मागे म्हटल्याप्रमाणे सत्पुरुषांच्या हातून परमेश्वरच सामान्यांना चमत्कारिक वाटणारी कार्ये करवून घेत असतो. याचेच आणखी एक उदाहरण म्हणजे महाराजांसोबत असणाऱ्या मंडळींपैकी शहागडकर नावाच्या शिष्यांना भागीरथी तीर्थाचे दर्शन घेण्याची खूप इच्छा कोती. विठ्ठलनाथ महाराजांनी ती देखील पूर्ण केली. एका प्रसंगी त्यांनी केवळ एक दगड बाजूला केला आणि त्या जागेवरून भागीरथीची धार सुरू झाली.

**● मृत मुलास जिवंत करून अनुग्रह दिला**

सत्पुरुष ज्ञानी असतात. लोककल्याणासाठी ते अलौकिक वाटणाऱ्या लीला देखील दाखवितात. परंतु नियतीच्या खेळात विशेषतः जन्ममृत्यूच्या बाबतीत सत्पुरुष सहसा ढवळाढवळ करत नाहीत. मग तो अगदी स्वतःचा जवळचा नातेवाईक का असेना. एकदा विठ्ठलनाथ महाराजांचे सखाराम नावाचे चिरंजीव आपल्या मित्रांसोबत गंगेत पोहण्यास गेले. मात्र पोहतांना ते डोहात सापडले. ही वार्ता महाराजांच्या कानी गेली. लोकांनी पाण्यात शोध घेण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ. शेवटी जाळे टाकून शोध सुरू झाला. शव वर काढण्यात आले. आजूबाजूची मंडळी त्यांना चाकावर फिरवून नाकातोंडातून पाणी काढण्याचा विचार करीत होती. तेव्हा महाराजच म्हणाले, ‘‘इतका खटाटोप का करता? तो परलोकवासी झाला आहे.’’ हे ऐकून सर्वांना खूप दुःख झाले.

त्यावेळी पुत्रशोकाच्या ऐवजी विठ्ठलनाथ महाराज मात्र वेगळ्याच विचारात होते. आपला पुत्र अनुग्रकावाचून निजधामास गेला हे त्यांना रुचत नव्हते.आणि ते नाथसंप्रदायाच्या परंपरेविरुद्ध देखील होते. (ज्ञानेश्वरीमध्ये गुरुमंत्र न घेणाऱ्यास ‘निगुरा’ म्हटले आहे) तेव्हा महाराजांनी संपूर्ण विचार केला आणि सखारामाचे शव आपल्या मठात शिवदिननाथ महाराजांचे समाधी समोर ठेवण्यास सांगितले. त्यांनंतर महाराज स्वतः तेथे गेले व रंगनाथ महाराजांस म्हणाले, ’’सर्वांना बाहेर जाण्यास सांगा व आपण आत येवून दरवाजा बंद करावा.’’

मग विठ्ठलनाथ महाराजांनी रंगनाथ महाराजांचे हातून समाधीचे तीर्थ मागवून सखारामाचे मानेखाली हात देण्याचे सांगितले. ते तीर्थ सखारामाचे मुखावर, शरीरावर सिंचन केले व प्रार्थना केली. काही क्षणात सखारामपंतांनी नेत्र उघडले व अवलोकन केले. त्यावेळी विठ्ठलनाथ महाराजांनी त्यांना तारक मंत्राचा अनुग्रह केला व म्हणाले ‘‘मंत्र समजला असल्यास स्मितहास्य करा.’’ त्याप्रमाणे सखारामपंतांनी स्मितकास्य केले. अशा रीतीने अनुग्रह झाल्यावर विठ्ठलनाथ महाराजांनी पुनरावृत्ती करून त्यांना निजविले आणि सखारामपंत पूर्ववत प्रेत झाले.

हा सगळा प्रसंग व महाराजांची अलौकिक शक्ती पाहून रंगनाथ महाराजांनी माया मोहात

विठ्ठलनाथ महाराजांना विचारले,'' महाराज आपण त्यांना सजीव करा ना? आम्हास एकच भाऊ आहे'' त्यावर विठ्ठलनाथ महाराज म्हणाले, ''बाबारे ! हे कलियुग आहे. रोज प्रेताचे ढीग समोर येतील. शिवाय काळाचा रोध कुणी करावा? आपण मनुष्य योनीत आहोत. फक्त मंत्र न घेता जात होता, म्हणून आम्ही असे केले. यात सर्व सद्गुरू कृपा आहे. हे आमचे कार्य नव्हे. त्यांची कृतार्थता झाली. मनुष्य जन्मास येतो तो जाणारच.'' असे म्हणून त्यांनी पुढील उत्तरकार्याची सिद्धता करण्यास सांगून रंगनाथ महाराजांना दरवाजा उघडण्याची आज्ञा केली.

**● ज्ञानेश्वरी ग्रंथ आपोआप महाराजांजवळ आला**

विठ्ठलनाथ महाराजांचा दररोज ज्ञानेश्वरी वाचनाचा नियम होता. एकदा ज्ञानेश्वरी ऐकण्यास बरीच मंडळी येऊन बसली. परंतु महाराजांना त्या दिवशी बराच ज्वर चढला होता. अंगात थंडी भरली होती. मंडळी म्हणाली, ''आजचे दिवस पाठ बंद ठेवावा.'' परंतु महाराजांना ते बरोबर वाटेना. ते कसेबसे उठून बसले. मंडळींनी त्यांना आधार दिला. महाराजांनी डोळे मिटले. श्रीगुरूंचे स्मरण केले व ज्ञानेश्वर माऊलीस म्हणाले, ''माऊली, मी आपणास प्रार्थना करतो की, श्रीज्ञानेश्वरीची पोथी जिचा आम्ही नित्यपाठ करतो, ती पोथी स्वतःहून येथे माझ्याजवळ यावी. ही लेकराची इच्छा आपण पुरवाल अशी आशा बाळगून लीनपणे प्रार्थना करीत आहे.'' त्यावर सर्व मंडळींनी अनुक्रमे हीच प्रार्थना केली. महाराज म्हणाले, ''माऊली आपली इच्छा पूर्ण करतील.'' त्यापुढे महाराज म्हणाले, ''सर्वांचे म्हणणे आहे तर कृपा करून आपण यावे.'' मग सर्वांनी डोळेबंद करून प्रार्थना केली. डोळे उघडून पाहतात तर काय आश्चर्य ! ती जडपोथी स्वतः स्थलांतर करून नाथजींचे सथीध आली.

**● महाराजांनी आपली थंडी पांघरूणास दिली**

नाथांनी आपली थंडी अंगावरील पांघरुणास दिली. त्यानंतर ते पांघरूण थडथड हलू लागले. इकडे महाराजांनी ज्ञानेश्वरी पाठ सुरू केला. सर्वजण अतिशय आनंदी झाले याचे वर्णन करणे शक्य नाही. निरतिशय आनंदाचे चित्र काढता येत नाही. त्याचा प्रकाश हृदयपटलावर पडतो. पुनःश्च सर्वांनी साष्टांग नमस्कार घातला व विठ्ठलनाथांचे हे साधुत्व पाहून त्यांचा जयजयकार केला.

अशा रीतीने ज्ञानेश्वरी वाचनातून विठ्ठलनाथ महाराजांनी जनकल्याणाचे कार्य अविरतपणे केले. पुढील काळात महाराजांना देवासच्या राजांचे बोलावणे झाले. तेथे सन्मान झाला. पालखी व मेणा घेऊन महाराज परत आपल्या मठात आले. नंतरच्या काही दिवसात चतुर्थाश्रम घेऊन महाराजांनी मार्गशीर्ष शु. नवमी, शके १७६१ ला श्रीक्षेत्र पैठण येथे श्री शिवदिननाथ महाराजांच्या मठातच समाधी घेतली.

■ ■ ■

# ॥ श्री संत गणेशनाथ महाराज ॥

पिता पांडुरंग व माता लहानाबाई यांचे पोटी श्रीगणेशनाथ महाराजांनी श्रीक्षेत्र पैठण येथे शके १७४२ ला जन्म घेतला. श्रीगुरु विठ्ठलनाथ महाराजांचा गुरुमंत्र झाला. त्यांचे कृपादृष्टीत व साधिध्यात वेदांचे, सांप्रदायिक ग्रंथांचे, ज्ञानेश्वरीचे शिक्षण पूर्ण करून सर्व विद्येत परिपूर्ण झाले. पुढे ते कथा-कीर्तन करू लागले. पूर्ण तयारी झाल्याचे पाहून श्रीविठ्ठलनाथ महाराजांनी श्रीगणेशनाथ महाराजांस नाथ संप्रदायाची दीक्षा दिली व आपले सद्‌गुरु नरहरिनाथ महाराज संस्थान देऊळगांव राजा येथे पाठविले.

गुरु आज्ञेप्रमाणे श्रीगणेशनाथ महाराज देऊळगांव राजास आले. संत नरहरिनाथ महाराजांचे दर्शन घेतले. संप्रदायाच्या परंपरेप्रमाणे भिक्षेस निघतांना प्रथम बालाजी महाराज मंदिरात गेले. सोबत मठातील व गावातील प्रतिष्ठित मंडळी होती. ज्यामध्ये अयाचित सुद्धा होते. बालाजी महाराज मंदिरात पूजारी मंडळींनी त्यांचा मानसन्मान केला. गावातील अयाचित व पूजारी मंडळींकडून भिक्षा घेऊन महाराज संस्थानात परतले. सोबत श्री बालाजी महाराज संस्थानचा चोपदार होता. महाराजांच्या आगमनानंतर अल्पावधीतच या गावातील ठाकूर मंडळी व इतर बरीच मंडळी महाराजांची अनुग्रहित झाली.

पुढे महाराजांनी संत नरहरिनाथ महाराज समाधिस्थानाचा जीर्णोद्धार करण्याचे ठरविले. संत नरहरिनाथ महाराज व श्री बालाजी महाराज संस्थानाचे राजे जगदेवराव यांचे गुरुशिष्य संबंध लक्षात घेऊन श्रीगणेशनाथांनी राजेसरकारांना श्रीगुरुंचे समाधी स्थानाचे जीर्णोद्धाराबद्दल सांगितले व त्यांच्याशी या विषयावर सविस्तर चर्चा केली.

समाधिस्थानाला लागून असलेली जमीन श्रीगणेशनाथांनी स्वतः खरेदी केली. पैठण येथील शिवदिन केसरीनाथ महाराजांच्या मठाप्रमाणेच नकाशा त्यांच्या नजरेसमोर होता. तोच नकाशा डोळ्यासमोर ठेवून त्यांनी मठाच्या जीर्णोद्धाराचे कार्य काती घेतले. त्यांच्या या कार्यातून संपूर्ण लाकडी (सागवाणी) काम असलेला दोन मजली मठाची निर्मिती झाली. देऊळगाव राजा, चिखली, बुलढाणा, मलकापूर, जळगांव खानदेश, न्हावी, फैजपूर, सावदा, जालना, नगर, औरंगाबाद, बीड, नांदेड इ. ठिकाणी संप्रदायाच्या प्रचारार्थ श्रीगणेशनाथ महाराजांनी दौरा केला. त्यांच्या कारकीर्दीत अनेक नामवंत मंडळीस त्यांनी अनुग्रहित केले. यामध्ये बुलढाण्याचे ॲड. श्री. महादेव सखाराम बापट, डॉ. सोहम् बापट, ॲड. तात्यासाहेब आष्टीकर, ठाकूर मंडळी या प्रतिष्ठितांचा समावेश होता. आजही ही सर्व मंडळी मठाशी जोडलेली आहेत.

मध्यप्रदेशातील इंदौरचे राजे तुकोजीराव होळकर यांनी महाराजांना इंदौर येथे बोलावून त्यांचा अनुग्रह घेतला. त्यांचा यथोचित मान-सन्मान केला. त्यांना पालखी तसेच मेणे भेट दिले. त्याकाळात मठाच्या जीर्णोद्धाराचे काम सुरूच होते.

श्री बालाजी महाराज संस्थानचे प्रमुख राजे मानसिंग आ. पा. क. राणी कोंडाबाई यांनी श्रीगणेशनाथ महाराजांना 'सनद' करून दिली. त्यात त्या म्हणतात, ''सदगुरुमूर्ती संत नरहरिनाथ महाराज यांना आमचे पूर्वज राजे जगदेवराव राजे जाधव यांनी गुरुमंत्र घेऊन त्यांना श्रीक्षेत्र पैठणहून देऊळगाव राजास आणले'' व पुढे येथेच समाधीमठ असावा व मठाचे पूजाअर्चा-नैवद्य-नगारखाना इ. व्यवस्थेसंबंधी पुन्हा नव्याने ही तिसरी सनद तयार करून दिली आहे. आजही ही सनद संतनरहरिनाथ महाराज संस्थानच्या कागदपत्रात पाहावयास मिळते.

श्री गणेशनाथ महाराजांचे बरेच चमत्कार ऐकण्यास मिळतात. पुढे गणेशनाथ महाराजांनी चतुर्थाश्रम घेण्याचे ठरविले व अश्विन शुद्ध दशमी, दसऱ्याच्या महापर्वावर त्यांनी सीमोल्लंघन करत संन्यासाश्रम घेतला व नंतर ११ दिवसांनी आम्ही समाधी घेऊ म्हणून शिष्यांना सांगितले. त्यांचे नाव 'ऋषिसरस्वती' असे ठेवण्यात आले. पुढे ११ व्या दिवशी म्हणजे अश्विन वद्य सप्तमी शके १८२२ ला देऊळगाव राजा येथे समाधी घेतली. मठाचे प्रांगणात त्यांचे समाधी मंदिर आहे.

■ ■ ■



श्री संत गणेशनाथ महाराज समाधी (श्रीक्षेत्र देऊळगाव राजा)

# ॥ श्री संत गौतमनाथ महाराज ॥

श्री गणेशनाथांनंतर त्यांचे पुत्र गौतमनाथ महाराज यांनी नाथसंप्रदायाची परंपरा पुढे नेली. पिता गणेशनाथ व माता राधाबाईंच्या पोटी शके १७९० मध्ये गौतमनाथांचा जन्म झाला. त्यांचे बालपण देऊळगांव राजातच गेले. व्रतबंध झाल्यावर त्यांनी आपले पुढील शिक्षण श्रीगुरुगणेशनाथ महाराजांकडेच पूर्ण केले. वेद-वेदांतात पारंगत झाल्यावर गणेशनाथ महाराजांनी त्यांना नाथ संप्रदायाची दीक्षा दिली.

महाराजांचे संस्कृतभाषेवर प्रभुत्व होते. त्यांचे ज्ञानेश्वरी व श्रीमद्‌भगवद्‌गीतेचे पारायण सतत सुरू असायचे. गौतमनाथांची कीर्तनातील प्रगती सर्वदूर पोहोचली होती. ते पाहून विठ्ठलनाथ महाराजांच्या नवमीच्या उत्सवात त्यांना कीर्तन करण्याची आज्ञा गणेशनाथांनी केली. ते म्हणाले, ‘‘श्रीमंत, आजचे कीर्तन आपण करावे’’ ही आज्ञा मिळताच गौतमनाथ म्हणाले, ‘‘महाराज, आम्ही आपणासमोर काय सांगणार? आम्हास कसे जमेल?’’ त्यावर श्रीगणेशनाथ महाराजांनी आपल्या मुखातील तांबूल (विडा) प्रसाद म्हणून त्यांना खाण्यास दिला.

नवमीच्या त्या रात्री मठात एक वेगळाच उत्साह, नवचैतन्य भरले होते. गावातील प्रतिष्ठित मंडळी, श्री बालाजी संस्थानचे चोपदार तथा पूजारी इ. मंडळी श्रींचा हार घेऊन कीर्तनास हजर होती. कीर्तन सुरू झाले. ‘ज्ञानेश्वर माऊली महाराज ज्ञानेश्वर माऊली’ ने कीर्तनास सुरूवात झाली. कीर्तनाचा विषय कोता.

**ब्रह्म जाणावे रे ब्रह्म जाणावे । निष्ठा भक्ती गुरुदेवासी तद्रूपमानावे ।**
**सुवर्ण मनी सोनया । कल्लोळ की पाणीया ।**
**तैसा आत्मा आपण असता द्वैत का मानावे ।।धृ।।**

सर्वजण पू. महाराजांच्या अमृतमय वाणीने न्हाऊन निघाले. अशा रीतीने श्रीगणेशनाथांच्या गुरुकृपेखाली श्रीगौतमनाथ महाराजांचा योगाभ्यास सुरू होता. पुढे श्रीगणेशनाथांनी समाधी घेतल्यावर श्रीगौतमनाथांनी मठाचा कार्यभार गुरुआज्ञेने स्वीकारला. महाराजांनी प्रवचन, कीर्तन, भजन करीत संप्रदायाचा प्रसार व प्रचार सुरू केला. गौतमनाथ महाराज हे अत्यंत कडक स्वभावाचे होते, तेवढेच प्रेमळही होते. ते अतिशय शिस्तबद्ध असून मर्यादित वेळेशीर काम असा महाराजांचा दरारा होता. त्यांचा शिष्य-परिवार फार मोठा होता. बुलढाणा येथील ॲड. रावबहाद्दर सखाराम बापट, ॲड. तात्यासाहेब आष्टीकर, खान्देशचे तुकारामजी महाजन, तुकाराम झोपे, पाचपांडे, चावदस इंगळे, भंगाळे, दयाराम शामु चौधरी वगैरे समस्त न्हावी, फैजपूर, सावदा, खिरोदा येथील मंडळी महाराजांची भक्त शिष्य होती. या मंडळींनी गुरुमंत्र घेतला व महाराजांच्या सान्निध्यात आलेल्या प्रत्येकाला महाराजांच्या गुरुकृपेचा लाभ झाला.

मराठवाड्यात बीड येथील थिगळे, औटी इ. परिवारांत महाराजांचा अनुग्रह होता. बीड, जालना, औरंगाबाद, ढासला, नगर, एरंडगांव, पुणे इ. ठिकाणी देखील महाराजांचा शिष्य परिवार होता/आहे.

महाराजांनी संतनरहरिनाथ महाराज संस्थानची मठाचे आतील भागात बैठक, हंड्या झुंबर आणून सभामंडपाची शोभा वाढविली. अनेक इंग्रज अधिकारी महाराजांचे दर्शनास येत असत. त्यांच्याशी देखील महाराजांचे चांगले संबंध होते व महाराजांचा दरारा इंग्रजांवरही होता.

गुरुपरंपरेतील प्रचार-प्रसाराचे कार्य पुढे नेत अनेकांना योगमार्गात आणणाऱ्या गौतमनाथ महाराजांना शके १८४३ साली म्हणजेच दि. १५ फेब्रुवारी १९२१ साली पुत्रप्राप्ती झाली व बाळाचे नाव 'भानुदास' ठेवण्यात आले. सर्वत्र आनंदाचे वातावरण होते. परंतु लवकरच म्हणजे अवघ्या दोन वर्षातच श्री गौतमनाथ महाराजांनी चतुर्थाश्रम घेण्याचा निर्णय घेतला व लगेच काही दिवसात संन्यासाश्रम स्वीकारला. त्यांचे संन्यासाश्रमाचे नाव 'श्रीनृसिंहसरस्वती' असे ठेवण्यात आले. मठापासून काही अंतरावरच आवारात पू. महाराजांनी झोपडी तयार करून घेतली व तेथे वास्तव्य करू लागले. तेथेच ते आपली दैनंदिन साधना करू लागले.

सकाळीच साधना झाल्यावर महाराज गोसेवा करीत असत. एक दिवस त्यांनी मठाचे अंतरंग शिष्यांपैकी ॲड. श्री बापट महादेव सखाराम, श्री. महाजन, हरिभाऊ टाकळकर व आष्टीकर वकील यांना बोलावून घेतले. गाईच्या पाठीवरून हात फिरवत असताना महाराजांनी आपल्या शिष्यांना जवळ बोलाविले व सांगू लागले ''आजपासून काही दिवसातच आम्ही समाधी घेणार आहोत. त्यामुळे मठाची संपूर्ण जबाबदारी त्याचप्रमाणे बाळमहाराज (भानुदास) व आईसाहेब यांची व्यवस्था आपणास पाहावयाची आहे. आमचे कार्य पूर्ण झाल्यामुळे आम्हास थांबता येणार नाही. पुढे बापूसाहेब मठाचा कार्यभार स्वीकारतील (बाळ महाराजांना ते बापूसाहेब म्हणूनही संबोधित असत) त्यामुळे आपण ही जबाबदारी सांभाळून आमचा मार्ग मोकळा करावा. विचार करा व या गोमातेचे शेपूट धरून आम्हास तसे वचन द्या'' हे ऐकून सर्वजण आवाक झाले. पू. महाराजांचा दृढनिश्चय, महाराजांना झालेली समाधीची चाहूल ह्या सर्व गोष्टी सर्वांसाठीच अतर्क्य व कल्पनेच्या बाहेर होत्या. परंतु महाराज सांगतात म्हणजे हे होणारच, हा भाव जागृत होऊन श्री. बापट व अष्टिकर यांनी ''बालमहाराज व आईसाहेबांसह सर्व व्यवस्था करू'' तसेच न्हावीकर मंडळींतर्फे महाजन यांनी 'मठास अंतर देणार नाही' म्हणून गोमातेचे शेपूट हातात धरून शपथ घेतली. हरीभाऊ टाकळकर यांनी ''शेवटच्या श्वासापर्यंत मठाचे सर्व दैनंदिन उपासना, सकाळच्या काकड आरतीपासून पूजा-नैवेद्य, महाप्रसाद, आरती सायंकाळी उपासना व रात्री शेजारतीपर्यंत सर्व व्यवस्था पाहाण्याची'' शपथ घेतली व ही शपथ पूर्ण होण्यास 'आपले आशीर्वाद पाठीशी असावेत' म्हणून महाराजांचे चरणी नतमस्तक झाले. सर्वांचेच अंतःकरण हेलावले. गुरु जणू शिष्यांची परीक्षाच पाहात होते. महाराजांनी सर्वांना आशीर्वाद दिले.

सर्वजण महाराजांसोबत आता त्या झोपडीत बसले. बरीच चर्चा झाली. मठाच्या कार्याबद्दल, पुढील कार्यवाही बद्दल, वाटचालीबद्दल महाराजांनी सर्वांना सखोल मार्गदर्शन केले.

संत नरहरिनाथ महाराजांच्या कृपेने सर्व व्यवस्थित कोईल असा विश्वास सर्वांनाच होता. ठरल्याप्रमाणे गौतमनाथ महाराजांनी आश्विन व ३० म्हणजे संन्यासाश्रमानंतर ९ व्या दिवशी समाधी घेतली. मठावर दुःखाचा डोंगर कोसळला सर्वत्र निरोप दिला गेला. विदर्भ, खान्देश, मराठवाडा, म. प्र., गुजराथ अशी सर्व ठिकाणची सर्व मंडळी जमा झाली. महाराजांना 'समंत्रक समाधी' दिली गेली. सर्व सोहळा पूर्ण करून एक महिन्याने श्री. बापट वकील साहेब यांनी श्री. भानुदासनाथ महाराज व आईसाहेब दोघांसही बुलढाणा येथे आपल्या घरी नेले.

■ ■ ■



श्री संत गौतमनाथ महाराज समाधी (श्रीक्षेत्र देऊळगाव राजा)

# •॥ श्री संत भानुदासनाथ महाराज ॥•

श्रीगुरु गौतमनाथांच्या आज्ञेनुसार त्यांचे पुत्र भानुदासनाथ महाराज हे पुढे मठाधिपती होणार हे बालपणीच ठरले होते. गौतमनाथांच्या समाधीनंतर त्यांच्या आईसाहेब मातोश्री अहिल्यादेवी यांनी त्यांचे संगोपन केले. गौतमनाथांना शपथ दिल्यानुसार श्री. बापट वकील साहेब यांनी आईसाहेब व भानुदास महाराज यांची व्यवस्था स्वीकारली होती. त्या दोघांना घेऊन बापट साहेब बुलढाण्यात राहात असल्यामुळे महाराजांचे बालपणही तिथेच गेले. भानुदासनाथ जसे मोठे होत होते तसे त्यांना आईसाहेब मठाच्या सर्व गोष्टी सांगत असत. मठाचे उत्सव किंवा कार्यक्रम, श्री. बालाजी महाराज महोत्सवात तसेच दसरा, लळीत, दिवाळी पाडवा, श्रींजीची बिदागी अशा प्रत्येक प्रसंगी बापट, आष्टीकर-महाजन इ. मंडळी बाळमहाराजांना घेऊन देऊळगांव राजास येत. तिथे एक / दोन दिवस राहात व कार्यक्रम संपल्यावर पुन्हा बुलढाण्यास परत जात.

महाराजांचे प्राथमिक शिक्षण 'एडेड हायस्कूल, बुलढाणा' येथे झाले. शालेय शिक्षणाबरोबर त्यांनी आध्यात्मिक अभ्यासही सुरू केला. दासबोध, ज्ञानेश्वर गीता इ. ग्रंथाचे वाचन, पठण, मनन, चिंतन झाले. महाराजांचा व्रतबंध सोहळा देऊळगाव राजास संपन्न झाला.

आता महाराजांनी देऊळगांव राजास येण्याचा निश्चय केला. महाराज देऊळगांव राजास आले. तिथे हरिभाऊंनी मठातील दैनंदिन कार्यक्रम सुरू ठेवलेच होते. महाराजांनी प्रथम ती जबाबदारी स्वतःकडे घेतली. श्रीगणपती अथर्वशीर्षाची आवर्तने व गायत्रीमंत्राचे पुरःश्चरण केले.

पुढे महाराजांचा विवाह देऊळगांव राजा येथील त्या काळचे शिक्षक श्री तात्याजी जपे यांचे कन्येशी म्हणजे सौ. इंदिराबाई यांचे सोबत झाला. इंदिराबाईंची सर्वांना ओळख 'आईसाहेब' म्हणूनच झाली.

आता महाराज कथा-कीर्तन-प्रवचन याद्वारे समाज प्रबोधनाचे कार्य करू लागले. पंथ प्रचार व प्रसाराचे कार्य जोराने सुरू झाले. अनेक ठिकाणी महाराजांची शिष्य मंडळी तयार झाली. अनेकांना महाराजांमध्ये प्रति 'गौतमनाथ' दिसू लागले. महाराज प्रत्येक शिष्याची आस्थेने चौकशी करत. मुलांच्या शिक्षणाकडे पू. महाराजांचे जास्त लक्ष असे. ते सांगत ''मुलांना खूप शिकवा. शिक्षणाने बुद्धीचा विकास होतो व योग्य अयोग्य याचा निवाडा करता येतो.''

महाराज खूप हौशी होते. ते जुन्या-नव्याची उत्तम प्रकारे सांगड घालत असत. त्यांना बाग-बगीचा, आला-गेला, पै-पाहुणा यांची हौस होती. मठात शिष्य मंडळी आली की ८-८ दिवस राहात. त्याचाही महाराजांना अतिशय आनंद होत असे. आईसाहेब तर स्वतः सर्वांची राहण्याची व जेवण्याची व्यवस्था पाहात. व्यावहारिक दृष्टीने पाहिले तर मठाच्या उत्पन्नाची बाजू तशी दुबळीच

होती. तरीही उत्सव, सणवार, मोठ्या आनंदात थाटात होत असत. बरेच वेळा अशी वेळ यायची की आता काय? पैशाची अडचण किंवा हे कसे होणार असे प्रश्न यायचे. अशा वेळी महाराज म्हणायचे, **अशामध्ये पाव रे नरहरि । धावत ये लवकरी ॥** आणि खरोखर कुठून तरी पैशाची बरोबरी व्हायची. जमाखर्चाचा बरोबर ताळमेळ लागायचा आणि ती वेळ निभावून जात असे. खरं तर माणसाजवळ विश्वास, श्रद्धा, प्रेम, चिकाटी, अनन्य भक्ती हे सर्व असलं तर गुरुकृपा व्हायला वेळ लागत नाही. महाराज नेहमी म्हणायचे, **सद्‌गुरू तुचि आमुची अविनाशी काशी ॥** महाराज सांगायचे की, आम्ही अशा कुटुंबात वाढलोय की, जिथे पैशापैक्षा शिक्षण व साठवण्यापेक्षा दान करणं जास्त महत्त्वाचे समजलं जातं.

महाराजांचे हे सहज बोलणे काच अनमोल उपदेश असे. लहान वाक्यात महाराज सारं काही सांगून टाकायचे. एकजण म्हणाला,''महाराज जास्त नाही ओंजळभर पाहिजेल एवढे करा'' त्यावर महाराजही तितक्याच सहजतेने म्हणाले, ''अरे ! माझी ओंजळ भरलेली आहे. हे खरेच. पण तू नीट विचार करशील तर तुझी ओंजळ माझ्या ओंजळीतच आहे. हे पटले का?'' यावर तो मनुष्य लगेच नतमस्तक झाला.

एक प्रसंग अविस्मरणीय आहे. साधारण १९८१ ची गोष्ट असावी. एक दिवस मठातील मंडळी व गावातील काही भक्त एकत्र बसले होते. इतक्यात मठात पाहुणे आल्याचे कळले. तेव्हा सर्वांनी बाहेर जाऊन बघितले तर १० ते १५ जण, दोन हातगाड्यांवर त्यांचे सामान सुटकेस, तबला, पेटी, वीणा, देवाचा डबा, खाण्याचे डबे, भरगच्च सामान घेऊन ही सारी मंडळी नरहरिनाथ महाराजांचा जय घोष करीत आत आली. आम्ही त्यांचे स्वागतास गेलो. सर्वांना आत घेतले. सर्वांच्या चेहऱ्यावर एक आनंद, काहीतरी गवसल्याचा आनंद प्रेम भरभरून आले. तेव्हा महाराजांनीच सर्वांना सांगितले की, ही मंडळी मध्यप्रदेशातून आलेली असून आपल्या महिपतीनाथ महाराजांकडील आहेत. 'ढोलीबुवा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महिपतीनाथ महाराज परंपरेतील पीठाधीश 'वासुदेवनाथ महाराज' आपल्या परिवारासह, साथीदारांसह, आपल्या गुरूंचे गुरु सद्‌गुरु श्रीनरहरिनाथ महाराजांचे दर्शन घेण्यासाठी आलेले होते. आणि मग काय मठात दिवाळीचे वातावरण तयार झाले. सर्वत्र आनंदी आनंद ! दोन मठाधिपती - गुरुशिष्य परंपरेतील एकमेकांना भेटले होते. अवर्णनीय असा का सोहळा ! या काळात मठात दररोज सकाळी आरती, महापूजा, महानैवद्य, रात्री कीर्तन असा भरगच्च कार्यक्रम सतत ८ दिवस सुरू होता. गावातील मंडळी ह्या सत्संगतीचा आनंद घेण्यास दररोज येत असत. सर्वजण ८ दिवस या गुरुशिष्यांच्या मुखातील अमृत रसवाणीने न्हाऊन निघाले.

भानुदासनाथ महाराजांच्या आध्यात्मिक व अलौकिक शक्तींची प्रचिती त्यांच्या सहवासात असणाऱ्या अनेकांना बऱ्याच वेळी आलेली आहे. त्यांच्या शिष्यांचे अनेक अनुभव आहेत. उदा. द्यायचे झाले तर जालन्याच्या ढासलागावातील विश्वनाथ पाटील-खरात हे महाराजांच्या अंतरंग शिष्यांपैकी

एक होते. त्यांना मूल नव्हते. ते एकदा महाराजांना म्हणाले, ''महाराज, आपल्या कृपेने तसे सर्व काही ठीक आहे. पण मला एकच चिंता आहे. ती म्हणजे मुलगा नाही.'' त्यावर महाराज म्हणाले, ''अरे, चिंता तू का करतोस? चिंता त्याला आहे. तुझी भक्ती-प्रेम, निष्ठा आहे. तू काळजी करू नकोस. तो गणेश तुझ्या पोटी येईल. ''यानंतर काही वर्षातच विश्वनाथ पाटलांना पुत्ररत्न प्राप्त झाले. त्याचे नाव गणेश ठेवले गेले.

असेच एक अंतरंगातील शिष्य काशिनाथ पाटील. त्यांना नेहमी मुलाच्या नोकरीची काळजी असे. जालन्यास कुठल्याही कारणाने आले की, देऊळगांव राजास मुद्दाम येणार, मुक्काम करणार, प्रसाद घेणार. एका भेटीत एकदा असाच विषय निघाला तेव्हा काशिनाथ पाटलांनी त्यांचा मुलगा सुभाषच्या नोकरीचा विषय महाराजांजवळ काढला. तेव्हा महाराज पाटलांना म्हणाले, ''आपली आता ही शेवटची चक्कर. त्याला बँकेत नोकरी लागेल'' आणि नंतर काही काळातच सुभाष पाटलांना बँकेत नोकरी लागली.

महाराजांसारखे संत जगाला देण्यासाठीच जन्म घेत असतात. परंतु मागून घ्यायचे काय, हे मात्र फार थोड्या लोकांना कळते. अशा मोजक्यांमधले एक शामराव पाटील. शामराव हे अत्यंत एकनिष्ठ, कष्टाळू, भोळे परंतु अत्यंत श्रद्धाळू होते. महाराज त्यांना नेहमी म्हणायचे, ''श्याम, तुला काय पाहिजे?'' तर ते म्हणायचे ''फक्त आशीर्वाद''! अर्थात अशा शिष्यांना महाराजांनीही न मागता भरभरून दिलंच.

भिकू पाटील हे शिष्य महाराजांचे सान्निध्यात असायचे. महाराजांना लागणारे सुवासिक अत्तर व पांढरा शुभ्र रूमाल ते नेहमी देत. त्यांचे शेतात विहीर आटली. तेव्हा महाराजांनी दुसरी खोदण्यास सांगितले. या विहिरीला मात्र भरभरून पाणी लागले. त्यातून पाटलांची संत्र्याची बाग तयार झाली. ही सर्व नाथकृपाच होय. किती म्हणून सांगायचं शेवटी एकच ....गुरुंची केवढी नवलाई. आत्म साधन झाले त्याला पुन्हा जन्म नाही. महाराजांचे मठीय कार्य व्यवस्थित सुरू होते. श्रीबालाजी महाराज संस्थान व संत नरहरिनाथ महाराज संस्थानचे संबंध जवळचेच होते. सर्व मानसन्मान व्यवस्थित सुरू होता.

अशा रीतीने नाथपरंपरतेले आपले उत्तरदायित्व सर्वोत्तमरीत्या व जबाबदारीने पूर्ण केल्यावर महाराजांनी मार्गशीर्ष शु. सप्तमी शके १९१३ मध्ये देऊळगांव राजास आपला देह अनंतात विलीन केला. त्यांची समाधी मठाचे प्रांगणात गौतमनाथ महाराजांचे समाधी शेजारी आहे.

■ ■ ■





श्री संत भानुदासनाथ महाराज समाधी (श्रीक्षेत्र देऊळगाव राजा)

# संत नरहरिनाथ महाराज संस्थान

# इतिहास

श्री ज्ञानेश्वर महाराजांची नाथ संप्रदायी शिष्य परंपरा सद्‌गुरु नरहरिनाथ महाराजांपासून ग्रामदैवत श्री बालाजी महाराजांच्या स्थापनेनंतर देऊळगांव राजा येथे प्रवाहित झाली.

देऊळगांव राजा हे गांव विदर्भ मराठवाड्याच्या सीमेवरचे विदर्भात असले तरी शेवटचे टोक म्हणून विकासाच्या बाबतीत थोडे मागासलेले. व्यापारी दृष्ट्या अकोल्याशी संबंध असला तरी मराठवाड्याशी रोजचा संबंध.

प्रति तिरूपती समजल्या जाणाऱ्या प्रभुलक्ष्मी व्यंकटेश बालाजी महाराजांच्या पुण्यपावन भूमीत संतश्रेष्ठ माऊली ज्ञानेश्वर महाराजांच्या परंपरेतील राजगुरु सद्‌गुरु श्री संत नरहरीनाथ महाराजांच्या पुण्यपावन वास्तव्याने पुनित झालेली ही नदीकाठची वास्तू. सद्‌गुरु राजयोगी संतनरहरिनाथ महाराजांचा भव्य मठ (संस्थान) समाधी स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. **श्री गणेशनाथ, श्री गौतमनाथ व श्री भानुनाथ महाराज** या त्रिसंतांनी देऊळगांवातच आपले जीवन व्यतीत करून समाधी घेतली.

शेकडो वर्षांची परंपरा लाभलेल्या या मठाचे भोवती गगनचुंबी वड-पिंपळ, आवळी बेल इ. वृक्षांनी रम्यता निर्माण झाली आहे. आंबा, नारळ इ. फळझाडे व गुलाब, चाफा, मोगरा, पारिजातक इ. फुलझाडे अशा नैसर्गिक वनराईमुळे या मठास ही निसर्गदत्त देणगी आपसूकच मिळाली आहे. तर बाजूलाच आमना नदीचा प्रवाह पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहत आहे

सकाळीच त्या उगवत्या सूर्यनारायणाच्या लाल रंगाचा तो गोळा व माता अमनेच्या पाण्यात पडणारे त्याचे गोजिरे प्रतिबिंब पाहताना व अनुभवताना त्या नारायणाचे साक्षात दर्शन घडते. अशा पवित्र व दैवी वातावरणात संसारी मनुष्यही आपल्या प्रपंचातील सर्व गोष्टी क्षणभर का होईना विसरतो व येथील आध्यात्मिक आनंदात हरपून जातो. अशा भारावलेल्या आसमंतात झाडावरील पोपट, मैना, कोकीळेचा मधूर आवाज कानावर पडतो तेव्हा साक्षात ब्रह्मानंद होतो. एका साधकास पाहिजे असलेले सर्व वातावरण येथे आजही अनुभवता येते.

(पुढील पानावर)

### ● जीर्णोद्धारानंतर संस्थानाचे पालटलेले रूप

श्रीगणेशनाथ महाराजांनी संस्थानाच्या मठाचे जीर्णोद्धाराचे प्रमुख कार्य हाती घेतले व अतिशय सुंदर रीतीने पूर्ण केले. त्याकाळात संत नरहरिनाथांच्या समाधी मंदिरासमोर भव्य असा सभामंडप घालण्यात आला. या कामासाठी संपूर्ण सागवानी लाकूड काम करून दोन मजले उभारण्यात आले. या लाकडावरील कोरीव काम हे उत्कृष्ट कलाकुसरीचे सुंदर उदाहरणच आहे. प्रदक्षिणा मार्गाच्या दोन्ही बाजूला ओसऱ्या बांधण्यात आल्या. श्रींचे समाधी मंदिरासमोर रंगीत कलाकुसरी असलेल्या दोन खांबांमध्ये एक महिरप असून त्यात सुंदर मोराचे चित्र कोरले गेले. फुलाचे नक्षी असलेला त्याकाळातील मार्बलचा ओटा आजही सुंदर दिसतो. त्या समोर असलेल्या सभामंडपात त्या काळातील काळी-पांढरी संगमरवराच्या नक्षीचा गालीचा आजही पाहाण्यासारखा आहे.

### ● समाधी मंदिर

समाधी मंदिरात मध्यभागी संत नरहरिनाथ महाराजांची समाधी असून समाधीच्या उजव्या बाजूस श्रीगणपती व अन्नपूर्णामातेची मूर्ती आहे. समाधीच्या डाव्या बाजूस देवघर आहे. या देवघरामध्ये श्री पांडुरंग राही-रखुमाई यांच्यासह श्रीदत्त, मोहिनीराज, बालाजी यांच्या मूर्ती आहेत. मध्यभागी श्रीगणेशाची मूर्ती असून श्रीनृसिंहाची मूर्ती व रंगनाथाची सुंदर मूर्ती आहे.

श्रींचे समाधीचे सन्मुख सभामंडपाचे समोर एक ओसरी असून त्यात श्री वरद हनुमानाची मूर्ती विराजमान आहे. नाथांचे मुख उत्तराभिमुख असून समोरील वरद हनुमान दक्षिणाभिमुख आहे.

(पुढील पानावर)



मठातील मुख्य कीर्तनमंडप (श्रीक्षेत्र देऊळगाव राजा)












**मठातील बैठक व नक्षीकाम** (श्रीक्षेत्र देऊळगाव राजा)



पांडुरंग राही रुक्मिणी





श्री अन्नपूर्णा



श्री विजयी पांडुरंग



वरद हनुमान

## पूजेतील देव व देवघर (श्रीक्षेत्र देऊळगाव राजा)

## ● स्वयंभू श्री वटसिद्धगणेश

मठाच्या परिसरातील वृक्षवल्लींमधले एक मोठे वडाचे जुने झाड दि. ४/८/१९९३ रोजी तुटून पडले. समोरचा हायवे पूर्ण बंद झाला होता. गावातील मशीन मालकांनी व कर्मचाऱ्यांनी येऊन प्रथम हायवे सुरू करून दिला. झाडाची खांडे तोडून झाली. परंतु खालचे खोड खूप प्रयत्न करूनही हलेना. विशेष म्हणजे ट्रॅक्टर लावूनही ते हालत नव्हते. तेव्हा सर्वांनीच तो प्रयत्न सोडून दिला. साधारण एक वर्ष हे खोड तसेच जागेवर पडून होते.

अशातच दि. २६/६/९४ ला श्री. भाऊसाहेब पैठणकर यांचेकडे चतुर्थीचे उद्यापन होते. त्यानिमित्त मठात अनेक पाहुणे मंडळी जमली होती. त्यात अकोल्याचे छायाचित्रकार श्री अनिल काळकोंडे हेही होते. त्यांनी पहाटेच्या वेळी त्या खोडाचे साल काढण्यास सुरूवात केली. आणि काय आश्चर्य ! त्या खाली श्री गणेशाची प्रतिमा दिसू लागली. ती लांब सोंड व तो एकदंत.

सर्वांनी ही घटना आम्हाला सांगितली. ती मूर्ती पाहताच आम्हाला श्रीगणेशाने दिलेल्या दृष्टांताची आठवण झाली. मनोभावे श्रींस नमस्कार केला. सात-आठ जणांना ते खोड सरळ करण्यास सांगितले. सर्वांनी हात लावताच ते उभे झाले व श्रीगणपतीचा ७ फूटउंचीचा चेहरा/मुखवटा समोर दिसू लागला. पुढील महिन्यात संकष्टी चतुर्थीस मुखवटा स्थापना करण्याचे निश्चित झाले. त्याप्रमाणे महिन्याभरात श्रीगणेशाने ज्यांना दृष्टांत दिले अशी बरीच मंडळी पुढे हजर झाली. त्यात स्वामी स्वरूप चैतन्य यांनाही श्रीगणेशाने दृष्टांत दिल्याचे ते म्हणतात. वडाच्या झाडातून प्रकट झाल्यामुळे त्यास 'वटसिद्ध गणेश' हे नाव दिले गेले. स्वामींनी त्यावर सुंदर आरती तयार केली. त्या दिवसापासून आजतागायत या श्रीवटसिद्धगणेशा समोर दर चतुर्थीस गणपती अथर्वशीर्षाची आवर्तने व महाप्रसाद भंडारा कायमस्वरूपी सुरू आहे. अनेकांनी इथे नवस पूर्ण होत असल्याचे सांगितले आहे.

आज गणपती मंदिराची पूर्ण उभारणी झाली असून खाली टाईल्स व रंगरंगोटी झाली आहे. पुढे लाईटींग डेकोरेशन स्टीलचे कठडे करणे बाकी आहे. २०१५ च्या भाद्रपद महिन्यात श्री वटसिद्धगणेश मंदिराचा २१ वर्षपूर्ती महोत्सव साजरा करण्यात आला, त्यात अनेक भक्तांनी, मान्यवरांनी सहभाग नोंदविला.

■ ■ ■



स्वयंभू श्री वटसिद्ध गणेश (श्रीक्षेत्र देऊळगाव राजा)

# संत नरहरिनाथ महाराज संस्थान

# वार्षिक उत्सव

# ॥ महाशिवरात्र ॥

संत सद्गुरू नरहरिनाथ महाराज व संत सद्गुरू शिवदिननाथ महाराज या संतद्वयांचा, सद्गुरूशिष्यांचा पुण्यतिथी उत्सव म्हणजे महाशिवरात्रीचा उत्सव. सद्गुरू श्रीनरहरिनाथ महाराजांची पुण्यतिथी माघ वद्य दशमी तर गुरु श्रीशिवदिननाथ महाराजांची पुण्यतिथी माघ वद्य त्रयोदशी. याच कालावधीत महाशिवरात्र. म्हणून हा त्रिवेणी संगमाचा सोहळा संत नरहरिनाथ महाराज संस्थानचा मुख्य उत्सव म्हणून मोठ्या थाटात संपन्न होतो.

● **उत्सवाचे नियोजन**

पौष महिन्यात वसंतपंचमीला उत्सवाचे मुहूर्त केले जाते. त्या दिवशी मुख्य पूजेचे साहित्य, अन्नदानाचे प्रतीक म्हणून मीठ, हळद, मोहरी, साखर, तूप, गूळ इ. आणून उत्सवाची मुख्य नियोजन बैठक होते.

उत्सवाच्या चार-आठ दिवस आधी हंड्या, झुंबर, आरशे, बैठका लावण्यात येतात. सर्व वास्तुला तेल पाणी देऊन सुवासित करण्यात येते.

उत्सव काळात अन्नपूर्णालयाचे व्यवस्थापन संत नारायणनाथ महाराज संस्थान, न्हावी येथील भक्तमंडळी पाहातात. देवघराचे सर्व आन्हिक संत महिपतीनाथ महाराज संस्थान, ग्वाल्हेर येथील गुरूभक्त सदाशिव महाराज पुरंदरे व इतर भक्तमंडळी पाहतात.

● **सोहळा प्रारंभ**

उत्सवाच्या प्रथमदिनी माघ वद्य सप्तमीला पहाटे काकड आरती होऊन 'विष्णुसहस्रनाम' पठण करून सन्माननीय व्यक्तींच्या, प. पू. महाराजांच्या हस्ते दीप प्रज्वलन, ज्ञानेश्वरी ग्रंथ पूजन होऊन पारायणाला सुरूवात होते. संप्रदाय परंपरेप्रमाणे **पाहे पा ध्वजाचे चिरगुट ।** हा अभंग म्हणून नवीन ध्वज चढवून ध्वजपूजन, गणपतीपूजन, मंडप पूजन इ. केले जाते. तद्नंतर प. पू. महाराज ग्वाल्हेर, न्हावी, औरंगाबाद येथील भक्तांसह उपाध्ये, महाराज मंडळी यांच्या समवेत ग्रामदैवत लक्ष्मीव्यंकटेश श्री बालाजी महाराज यांना अक्षद देतात (याला कार्यक्रमाचे निमंत्रण म्हणतात) दुपारी महाआरती होऊन महाप्रसाद होतो. उत्सवात दररोज साधारण १२०० पान अन्नदान होते. दुपारी ४.३० वा. प्रवचन होते. तद्नंतर पंचक्राशीतील वारकरी तथा आळंदी येथील गुणीजन मंडळी यांचा हरिपाठ होऊन, भोजन झाल्यावर रात्रौ ८वा. कीर्तन होऊन कार्यक्रम संपन्न होतो (आठही दिवस दिनचर्या वरिल प्रमाणे असते)

**● पुण्यतिथी दिवस**

माघ व दशमीला समाधीस विप्रांद्वारे रूद्राभिषेक, श्रीसूक्त, पवमानाचा अभिषेक होतो. (हा अभिषेक दूध, इक्षुदंड (उसाचा रस) इत्यादींचा असतो.) पुण्यतिथीचे कीर्तन हे महिपतीनाथ महाराज संस्थान,ग्वाल्हेर येथील गुरुभक्त सदाशिव महाराज पुरंदरे यांचे होते.

माघ वद्य एकादशीला दुपारी देऊळगांवराजा व पंचक्रोशीतील महिलांचे, भजनी मंडळांचे सामूहिक भजन होते. संपूर्ण उत्सव पंचक्रोशीतील शिस्तीचा, उत्तमोत्तम श्रवण पर्वणीचा असतो अशी भाविकांची भावना आहे.

**● महाशिवरात्र दिवस**

पुण्यतिथी दिवस- माघ वद्य त्रयोदशी या दिवशी श्री शिवदिननाथ महाराज पुण्यतिथी असते. बहूतांश वेळेस त्रयोदशी/चतुर्दशी एक येते. यादिवशी बाहेरून येणाऱ्या भाविकांची संख्या जास्त असते. प्रातः गुरुमंत्र उपदेश असतो. संस्थान येथे नियमित वर्षातून दोन वेळेस गुरुमंत्र उपदेश होतो **१) गुरुपौर्णिमा, २) महाशिवरात्र)**

ज्ञानेश्वरी पारायणाची सांगता होऊन दुपारी पुण्यतिथीचे कीर्तन होते. (संत नरहरिनाथ महाराज पुण्यतिथीचे कीर्तन जसे महिपतीनाथ महाराज संस्थानच्या वतीने होते तसेच गुरु शिवदिननाथ महाराज पुण्यतिथीचे कीर्तन संत नरहरिनाथ महाराज संस्थानच्या वतीने होते)

**● पालखी प्रदक्षिणा**

कीर्तन झाल्यावर दु. ४ वा. भगवान श्री आदिनाथांच्या मूर्तीसह महाराजांच्या पादुका प. पू. महाराजांच्या हातात देऊन ढोल, झांजा, गुरुनामाचा जयघोष करीत मठाला प्रदक्षिणा करून मग पालखीत ठेवण्यात येतात. (याला देव आणणे असेही म्हणतात) मानकऱ्यांच्या हस्ते एका विशिष्ट पद्धतीने देव व्यवस्थित रेशीम धाग्याने बांधण्यात येतात. ध्वज, पताका, अब्दागिरी, चवऱ्या, छत्र या पारंपरिक वैभवात ढोल, झांज, पखवाज, टाळ, वीणा, चिपळ्या, टिपऱ्या व ज्ञानोबा तुकाराम या जयघोषात हा वैभवशाली पालखी सोहळा प्रदक्षिणेकरिता निघतो. वाटेत पाऊल्या फुगड्या, भजनं यांनी वातावरण भक्तीमय होऊन जाते. ग्रामस्थ मोठ्या संख्येने दर्शनाला हा सोहळा पाहाण्यास येतात. बालाजी महाराज संस्थान येथे ओट्यावर पालखी ठेवण्यात येते. (विसावते) पूजाऱ्यांचे व्यवस्थापक यांच्या हस्ते संस्थानाकडून पुष्पार्चन व पूज्य महाराजांना हार घालण्यात येतो. सायंकाळी पालखी परत आल्यावर श्री शिवदिननाथ महाराजांचे निर्वाणाष्टक म्हणून आरती होते व देव मठात नेण्यात येतात. रात्रौ समाधीस अभिषेक, पोषाख इ. होऊन मध्यरात्री १२ वा महाआरती होते. अभिषेक सुरू असताना भक्तांद्वारा बाहेरील सर्वठिकाणी दिवे लावण्यात येतात. सहस्त्रदीप लावले जातात.

**● काला / पारणे**

सात दिवसांच्या या भव्यदिव्य भक्तियज्ञाची सांगता/पूर्तता म्हणजे हा दिवस. महाशिवरात्रीच्या मध्यरात्रीपासूनच स्वयंपाकाची तयारी सुरू कोते. सकाळी ९ ते ११ काल्याचे कीर्तन होऊन महाआरती झाल्यावर भंडारा सुरू होतो. सद्यःस्थितीला जवळपास ४००० लोक महाप्रसादाचा लाभ घेतात. ज्यांच्याकडून हे अन्नदान केले जाते ते भाविक या दिवशी जातीने लक्ष घालतात. प. पू. महाराजांच्या आज्ञेनंतर पंगती सुरू होतात. इकडे मानकऱ्यांचे महाराज मंडळींना, सेवेकऱ्यांना, पोलीस कर्मचाऱ्यांना संस्थानाद्वारे प्रसादाचे श्रीफल देण्यात येते.

सायंकाळी अन्नपूर्णामातेची पूजा होऊन स्व-स्थानीप्रतिष्ठा करण्यात येते. मंडप उतरवून महोत्सवाची सांगता होते. या ज्ञानयज्ञात, भक्तीरसाच्या सागरात गुजराथ, मध्यप्रदेश, मराठवाडा, खानदेश याभागातून मोठ्या संख्येत मंडळी येतात. सोहळ्यातून परत आपल्या घरी जाताना प्रत्येक भक्त व सेवेकरी हा पुण्याचा, भक्तीचा, ज्ञानाचा आणि आठवणींचा मोठा ठेवा घेऊन जातो.

■ ■ ■

# महाशिवरात्र उत्सव



श्री ज्ञानेश्वरी पारायण



नित्य हरीपाठ



कीर्तन



पालखी सोहळा



रिंगण



सहस्त्रदीपदर्शन

# ॥ नाथषष्ठी, पैठण ॥

वारकरी संप्रदायात वारीचा विशेष महिमा आहे. वारी म्हटलं की भूवैकुंठ पंढरपूर डोळ्यासमोर येते तसेच श्रीक्षेत्र आळंदीची वारी. या दोन वाऱ्यांव्यतिरिक्त देहू आणि पैठण या देखील मानाच्या-परंपरेच्या वाऱ्या आहेत. दक्षिण काशी अर्थात पैठण येथे संत एकनाथ महाराज यांच्या जयंतीपासून षष्ठीचा उत्सव होतो. याला षष्ठी पंचक म्हणतात. मराठवाडा विदर्भ व संपूर्ण राज्यातून वारकरी-फडकरी दिंड्या घेऊन येतात. पैठणच्या षष्ठीला शिवदिननाथ महाराज यांच्या दिडींचा मान असतो.

● **पंचमी**

पंचमीला दुपारी प. पू. महाराज पैठणास पोहोचतात. सायंकाळी परंपरेप्रमाणे विद्यमान नाथवंशज तथा समस्त मानकरी,उपाध्ये, चोपदार यांच्या समवेत अक्षद देण्यास येतात. (अक्षद म्हणजे निमंत्रण) ती अक्षद षष्ठीच्या दिंडीची, सप्तमीच्या छबिन्याची व अष्टमीच्या काल्याची असते.

● **षष्ठी**

षष्ठीला मध्यान्ह समयी मूळ आल्यावर प. पू. महाराज गावातील वाड्यात जाऊन नाथवंशजांसमवेत दिंडीला निघतात. बाहेरील नाथ मंदिरात मानकऱ्यांच्या उपस्थित नाथवंशजांचे कीर्तन होते.

● **छबीना**

सप्तमीला रात्री १२ वा. नाथांची पालखी निघते याला छबिना म्हणतात या दिवशीपालखी निघण्यापूर्वी विद्यमान नाथवंशजांकडून मानकरी म्हणून प. पू. महाराजांना हार घालण्यात येतो व पालखीचे दर्शन करविले जाते. पहाटेपर्यंत पालखी वाड्यात येईपर्यंत प. पू. महाराज पालखी समवेत असतात. आल्यावर आरती झाल्यावर पुन्हा दर्शन होऊन स्वस्थानी जातात.

● **नाथांचा काला**

अष्टमीच्या दिवशी काला असतो. असा नियम आहे की नाथांचा काला झाल्यावरच सर्व वारकऱ्यांनी-फडकऱ्यांनी काला करावा. बाहेरील नाथ मंदिरात विद्यमान नाथवंशजांच्या हस्ते दहीहंडी फोडण्यात येते. तो काला झाल्यावर सूर्यास्ताला वाळवंटात छत्री इ. ठेवून चोपदार व अन्य काही मंडळीं समवेत प. पू. महाराज कीर्तन झाल्यावर काला वाटतात.

### ● नवमी

नवमी अष्टमीला रात्री छत्री व काही मंडळी वाळवंटातच थांबण्याची परंपरा आहे. नवमीला पहाटे प. पू. महाराज व विद्यमान नाथवंशज वाळवंटात भेटून तेथे कीर्तने होतात. नंतर नाथांच्या चोपदारांसमवेत गावातील नाथ मंदिर, बाहेरील नाथ मंदिर, दत्त मंदिर, शिवदिननाथ महाराज मठ येथील दर्शन घेऊन नाथांच्या वाड्यावर वाडा पोळीचा प्रसाद घेऊन उत्सवाची सांगता होते.

■■■

# ॥ संत नारायणनाथ महाराज पुण्यतिथी उत्सव (खान्मळणी) ॥

सद्‌गुरू श्री नरहरिनाथ महाराज यांचे शिष्य संत नारायणनाथ महाराज यांची पुण्यतिथी श्रावण वद्य त्रयोदशी ! या दिवशी समाधीस महाअभिषेक होतो. इकडे ग्रामस्थांच्या वतीने रोडग्यांची तयारी अंतिम टप्प्यात झालेली असते. न्हावीच्या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे रोडगे (रोडगे हा प्रकार बिट्टी सारखा असतो. पण त्याचे १४ ते १५ हजार भाविकांना अन्नदान हे विशेष)

रात्री संपूर्ण परिसरात गोवऱ्या रचून त्यावर रोडगे भाजण्यास आरंभ होतो. या कामाला जवळील गावातील समस्त तरुण विशेषत्वाने कार्यरत असतात. मोठ्यांचे मार्गदर्शन आणि तरुणांचे काम याने कार्याला गती येते. प्रत्येकाच्याचेहऱ्यावर भक्तीभाव (उत्साह) सहज आढळून येतो. प. पू. महाराज काही मंडळींसमवेत नगारखान्यातून हा भक्तीशक्तीचा सोहळा अवलोकन करतात.


दुसरे दिवशी - चतुर्दशीला पहाटे पूजा होऊन काशीफळाची भाजी व रोडगा याचा नैवैद्य दाखविण्यात येतो.

प. पू. महाराज तथा ग्रामस्थ मंडळी मठाला पाच प्रदक्षिणा करतात, तोवर पंगती लागण्यास सुरूवात होते. नामस्मरण करीत परिक्रमा पूर्ण झाल्यावर जयजयकार होऊन प. पू. महाराजांच्या आज्ञेनंतर भंडारा सुरू होतो. पहिली पंगत माता-भगिनींची होते. अवघ्या काही तासात जवळपास १४ ते १५ हजार भाविक महाप्रसादाचा लाभ घेऊन स्वगृही परततात (शिस्त व एकात्मता ही या उत्सवाची लक्षवेधी बाब ठरते) दुपारी मठातील जुन्या मंडळींच्या वतीने पालखी बांधण्यात येते. पालखीत श्रीपांडुरंग परमात्म्याची मूर्ती व सद्‌गुरू भानुदासनाथ महाराज यांची प्रतिमा असते. प्रथम प. पू. महाराजांचे दर्शन होऊन पालखी मिरवणूक सुरू होते. टाळ, मृदुंग, वीणा घेतलेल्या वारकऱ्यांच्या भजनाने वातावरण भक्तीमय होऊन जाते. प. पू. महाराज पालखीचे मागे चालतात.

परिसरातील सर्व वारकरी दिंडीला येतात, सर्व ग्रामस्थ सडा-रांगोळ्या काढून पालखीचे स्वागत करतात. दर्शन घेतात. वाटेत अनेक पारंपारिक खेळ खेळले जातात. रात्री पालखी मंदिरात आल्यावर आरती होऊन कीर्तनाने सोहळ्याची सांगता होते.

■ ■ ■

# श्री नारायणनाथ महाराज पुण्यतिथी उत्सव



पालखीतील श्रीविठ्ठल मूर्ती



पालखी सोहळा



प्रदक्षिणा



महाप्रसाद



अन्नदान

# •।। ग्रामदैवत श्री बालाजी महाराज यात्रा ।।•

दसरा - हा तसा संपूर्ण हिंदू धर्माचा विशेष सण- परंतु श्रीक्षेत्र देऊळगांव राजा येथे विशेष असे की या दिवशी मध्यरात्री श्री बालाजी महाराजांची पालखी निघते. दसऱ्याच्या आदल्या दिवशी सायंकाळी लाटा मंडप उभारला जातो. हा उत्सव म्हणजे भक्ती-शक्तीचा संगम असतो. दसऱ्याच्या दिवशी पकाटे ४.२० वा काकड आरतीला संत नरहरिनाथ महाराज संस्थानातर्फे बालाजी महाराजांना नैवेद्य दाखवला जातो. सायंकाळी सीमोल्लंघन करून प. पू. महाराज श्री बालाजी महाराजांच्या दर्शनाला जातात. रात्री श्रींची पालखी निघण्यापूर्वी श्री बालाजी महाराज संस्थानचे चोपदार मठात बोलवण्यास येतात. विद्यमान राजेसाहेबांचे दर्शन झाल्यावर प. पू. महाराज दर्शन घेतात अशी परंपरा आहे. रात्री पालखी नदीतील कट्ट्यावर आल्यावर मठात सर्वांना चहापान व अल्पोपहार असतो.

■■■

# •।। लळित ।।•

दहा दिवसांच्या लाटामंडपोत्सवाची सांगता म्हणजे लळित. या दिवशी पहाटे लाटा मंडप उतरतात (उतरवल्या जातात) याला लळीत म्हणतात. सूर्योदयापूर्वी प. पू. महाराज व इतर भक्त मंडळी दिंडी घेऊन निघतात. विशिष्ट वेळ होईपर्यंत नगारखान्याखाली मेहूणकर यांच्या घरासमोर दिंडी थांबते. ‘बालासाहेब की जय’, ‘लक्ष्मी रमण गोविंदा’ असा जयजयकार होऊन लळित होते. तिकडे दहा दिवसापासून मंदिराबाहेर असणारे देव (बालाजी महाराजांची मूर्ती) स्वस्थानी देव्हाऱ्यात नेले जातात. ते स्वस्थानी गेल्यावर प. पू. राजगुरू म्हणून महाराजांचे दर्शन होते. पद म्हणून समवेत असलेल्या सर्वांना श्रीफळाचा संस्थानकडून प्रसाद मिळतो.

■■■

# •।। पाडवा ।।•

या दिवशी वहीपूजन असते. प. पू. महाराज याच दिवशी बाणा घालून भिक्षेला निघतात. ग्रामदैवत श्री बालाजी महाराज संस्थानचे वही पूजन झाल्यावर संस्थानचे चोपदार श्रीराम पूजारी यांचे घरी प. पू. महाराजांना बोलवायला येतात. मंदिरात पद म्हणून संस्थानमध्ये संस्थानची बिदागी मिळते. समवेत असणाऱ्या सर्व भक्तांची देखील नावे श्री बालाजी महाराज संस्थानच्या वहीत नोंदवून घेतली जातात. नंतर इतर ठिकाणी भिक्षा होऊन मठात आल्यावर पद म्हणून आरती झाल्यावर सांगता होते.

■■■



ग्रामदैवत - श्री बालाजी महाराज (श्रीक्षेत्र देऊळगाव राजा)

# ॥ न्हावी येथील भिक्षा ॥

नाथ संप्रदायात भिक्षेला विशेष महत्त्व आहे. ब्रह्मचारी, गृहस्थी-संन्यासी सर्व परंपरेत भिक्षा मागितली जाते. भिक्षेचे अन्न (शिधा) हा अतिशय शुद्ध व पवित्र मानला जातो. नाथ संप्रदायी परंपरेमध्ये बाणा घालून ढोल, झांजेच्या गजरात भजन करत भिक्षा मागितली जाते. समवेत भक्त मंडळी असतात. प्रतिवर्षी साधारण पौष महिन्यात संत नारायणनाथ महाराज संस्थान, न्हावी येथे भिक्षा फेरी असते. प. पू. महाराज दरवर्षी १० दिवस न्हावी येथे असतात. सर्व ग्रामस्थांना भिक्षाफेरीची पूर्व कल्पना देण्यात येते. प्रथम दिनी परंपरेप्रमाणे प. पू. आईसाहेबांद्वारे भिक्षा घालून भिक्षेला आरंभ होतो. प्रत्येक भाविक दारामसोर पाट मांडून सद्गुरूंची पाद्यपूजा करतो. रस्त्याने सडा-रांगोळ्या काढून भक्त प. पू. महाराजांना बोलावण्याकरिता सामोरे येतात. झोळीवाले, भेलीवाले इ. धान्य घेणारे व सर्वजण ''श्रीमन्नारायण हरि'' हे भजन म्हणत असतात. अनेक ठिकाणी फुलांच्या, वस्त्रांच्या पायघड्या टाकण्यात येतात. प्रत्येक भक्ताला साखर, पेढ्याचा प्रसाद देण्यात येतो. दररोज साधारण चार तास भिक्षा असते. प. पू. महाराज या चार तासात कुठेही बसत नाहीत. तसेच काही खात-पीत नाहीत. अशी सलग चार दिवस भिक्षाफेरी होते. जवळच असलेल्या मोर नदी काठी बोरखेडा येथे एक दिवस व तळ्यावर एक  दिवस भिक्षा असते.

चार दिवस दररोज प. पू. महाराजांची प्रवचने होतात. दोन दिवस अथवा तीन दिवस रात्रौ गुरुमंत्र उपदेश असतो व गेल्या काही वर्षात न्हावी येथील जळगांव स्थित असलेल्या भक्तमंडळींनी जळगावला सामूहिकरित्या भिक्षा व पाद्यपूजनाचा अभिनव व अतिशय उत्कृष्ठ असा कार्यक्रम सुरू केला. भुसावळ येथे देखील का कार्यक्रम सुरू आहे.

■■■

# गुरु परंपरेतील संतांचे अभंग व पद्य रचना

# ॥ श्री नरहरीनाथ महाराज यांचा कटिबंध ॥

नयनी मुद्रा अलक्ष लागे नाहीच देहभान ।
न दिसे स्वरूपा विरहित मन हे झाले उन्मन ।
नवरंगाची समाधी उघडी पकाता तल्लीन ।
नमन करूनिया सथिध बसता हरूषले मन। नरहरी नाथ ।

नरहरीनाथा सद्‌गुरु माझा बाप कैवारी ।
आसनी शयनी जपता मजला तारील संसारी । नरहरीनाथ ॥धृ॥

रविशशी दीपमाळा दोन्ही जळती सुंदर ।
रत्नखपात सिंकासन शोभे औटपीठावर ।
रमले तुर्यावस्थेमध्ये नीलरूप ओंकार ।
रंग सुनील गगनामध्ये अनहत गजर । नरहरी नाथ ॥१॥

नरहरीनाथ सद्‌गुरु माझा बाप कैवारी ।
आसनी शयनी जपता मजला तारील संसारी । नरहरीनाथ ॥

का सुखसोहळा पर्वत शिखरी सदोदित पका।
कालाकाल ग्रासुनी कल्पीत द्वैताद्वैती रका।
कानीकरा षड्‌वैरीची दमुनि इंद्रिये दका ।
का स्थूल देह शोधूनी चक्री पिंडी ते पका । नरहरीनाथ ॥२॥

रिघ करा मनगुरुच्या संगे गुंफे माझारी ।
रिचतील मोती एकसरा तुम्ही वेचा दृष्टीभरी ।
रिझता महिपती भरूनी ठेवी स्वरूप अंतरी ।
रिता न राहे कदापि घडीघडी, आठवी नरहरी । नरहरीनाथ ॥

नरहरीनाथ सद्‌गुरु माझा बाप कैवारी ।
आसनी शयनी जपता मजला तारील संसारी। नरहरीनाथ ॥३॥

■■■

# ॥ आरती श्री आदिनाथांची ॥

आरती आदिनाथ महाराजा समर्था । तू चिं तू एक अंश । सर्व विश्वं भरिता ॥धृ॥

मच्छिंद्र बाळ तुझा । गुरु राज योग्यांचा । कारूण्य काम धेनू । वत्स गोरक्ष ज्याचा ।
पीयूष पियुनिया । रस भरिली वाचा । तेथे चि समरसीला । नाथ गहिनी देवाचा ॥१॥

आनंद सागरात । महापूर लोटला । निवृत्ती राज योगी । आष्टांगी निवाला ।
शांती अरूण तेजे। ज्ञान उदयो झाला । ज्ञानार्क उगवतां । विश्व ब्रह्म धवळला ॥२॥

किरण प्रगटले दशादिशा व्यापूनि । सत्यासि सत्य दावी मोह अंध निरसूनी ।
लीला विचित्र कैची । गैबी रूप धरूनि । गुप्ता प्रगटविले । निजरूप नयनी ॥३॥

पकाता पकातांची लक्ष उद्धोधा वरी । चैतन्य शुद्ध ज्योती । उद्‌भवली अंतरी ।
प्रभेसी पार नाही । उजळली केसरी । मंगल दिव्य वाद्ये । अनुहत गजरी ॥४॥

नवल आरती हे सांगू कवणासि काय । मन का उन्मन झाले । बुद्धि ठायीच्या ठायी ।
संकल्प कारपोनी । गेला देहिच्या देही। केसरी नाथ योगे। मालो शोभतो पायी ॥५॥

आरती आदिनाथा महराजा समर्था । तू चिं तू एक अंशी । सर्व विश्वं भरिता ॥धृ॥

■■■

# ॥ आरती श्री नरहरिनाथाची ॥

सत्य सनातन शाश्वत गुरुमुर्ती । ब्रह्मा, विष्णु, महेश तव रूप हृदयी ध्याती ।
दाखवी स्वामी चरण आलो तव प्रती। मस्तकी ठेऊनी हस्त अखंड दे निज भक्ति॥

जयदेव जयदेव जय नरहरिनाथा । पंचप्राणे तुजला ओवाळू आता ॥धृ॥

जागृत स्वप्न सुषुप्ति तुर्या ग्रास करा। उन्मनी मुद्रा लावूनि पतिता उद्धारी ।
सत्रावीचे अमृत पाजी झडकरी । तारक नौका माय सद्‌गुरु निर्धारी ॥२॥

कवळुनि बाळा पोटी बैसविले अंकी । श्रवणी देऊनी नयनी दाखवी कौतुकी ।
जिकडे पाहे तिकडे चिन्मय ज्योती की । नरहरिकृपे सनाथ झाला महिपती की । जयदेव ॥३॥

■■■

# ॥ आरती सद्गुरु नाथांची ॥

फळले भाग्य माझे धन्य झालो संसारी । सद्गुरु भेटला को । तेणे धरियेले करी ।
पश्चिमे चालविले । आत्म स्थिती निर्धारी । त्रिकुटा वरी नांदे देखियली पंढरी ।
ते सुख काय सांगु ॥धृ॥

वाचे बोलता नये आर्तीचेनि गुणे । गेले मी पण माझे ते सुख काय सांगु ॥१॥

राऊळा माजी जाता । राहे देह अवस्था । मन हे उन्मन झाले । नसे बद्ध तेचि वार्ता ।
हेतु का मावळला । शब्दा आली निशब्दता तटस्थ कोऊनि ठेलो । निजरूप पाकाता ॥२॥

त्रिगुण गुण बाई पूर्ण उजळल्या वाती । नवल अविनाश । नसमाये स्वयं ज्योती ।
पकाता लक्ष तेथे । कालो विसरल्या पाती । नातुडे माझे मज । न कळे दिवस न राती ॥३॥

आरती विठ्ठलाची । उजळली अंतरी प्रकाश थोर झाला । साठवेना अंबरी ।
रवि राशी मावळले तया तेजा माझारी । वाजताती दिव्य वाद्ये। अनहत गजरी ॥४॥

आनंद सागरात । प्रेम बुडी दिधली । लाधलो सुख मोठे । न ये बोल ता बेली ।
सद्गुरुचे नी संगे । ऐसी आरती केली निवृत्ती आनंदाची तेथे वृत्ती निमाली ॥५॥

ते सुख काय सांगु ॥धृ॥

■ ■ ■

# ॥ विठ्ठल भक्ती ॥

विठ्ठल गाईलाची गाऊ । विठ्ठल पाहिलाची पाहू ॥धृ॥

सत्रावे भिवरी तिरी पंढरपूरा जावू ।
चंद्रभागे स्नान करूनि मुक्तिपताका लावू ॥१॥

मृदंग वीणा टाळ घोष संगत संगति पाहू ।
प्रदक्षिणेसी नाचत कीर्तनी निष्ठा नेमी राहू ॥२॥

जीव जंतू पंढरीचे वदनी विठ्ठलरूप भाऊ ।
स्वहित शिक्षित वचने त्यांची अनाक्रोश की साहू ॥३॥

वेणू नादे संत काला । केसरी गुरुचा खावू ।
शिवदिनपरिप्रसाद हरिदासाचा लाहू ॥४॥

विठ्ठल गाईलाची गाऊ । विठ्ठल पाहिलाची पाहू ॥धृ॥

■■■

विठ्ठला तुझे समानपद चांगले ॥धृ॥

काया काशी सत्रावे भिवरे तिरी । नयनांत लक्ष लागले ॥१॥

गाभा उभा निर्गुण तू सुगूण । मस्तकी लिंग जागले ॥२॥

शिवदिन केसरी नाही दुसरी सरी। शास्त्र वर्णिता भागले ॥३॥

■■■

सखया विठ्ठला तुझ्या भेटीसाठी माझा जीव तुटला ॥१॥

तुजविण काही गोड न वाटे । विषया तुनि जिव विटला ॥२॥

चंद्र चकोरा परि दूर मनी न जाय । हेत तंत नाही तुटला ॥३॥

शिवदिन प्रभू केसरी स्वामी ॥ पायीच राहिन जुटला ॥४॥

■■■

# ॥ सद्गुरु महिमा ॥

स्वामी गुरुराया । गुरुराया । करी मजवरती दया ॥धृ॥

मजला सन्मार्गी लावाव । नीज रूप दाखवाव ।
अमृत दृष्टीने मज पकाव । अंतरी लीन व्हाव ॥१॥

भक्ती ज्ञान मला न कळेची । नाही गत योगाची ।
वाट समजेना कर्माची । चंचल वृत्ती मनाची ॥२॥

मी तव भोळारे दातारा । वेगी पार उतारा ॥
जन्म मरणाच्या येरझारा । चुकवूनि पदी दे थारा ॥३॥

आता त्रासलो बहुपरी। उद्धरीरे लवकरी ॥
चरणी ठाव दे नरहरी । महिपती अर्जी करी ॥४॥

■■■

गुरु राये बरव केलं । माझे मी पण हरवूनी नेलं ॥

काय सांगु आता बाई । सांगायची सोयच नाही ॥

ठेवताची माथा कात । षड्रिपूंचा झाला घात ॥

दृष्टी मुरडूनि दाविता । झाली मनासि उन्मनता ॥

सहज करिता अवलोकन । गेले तुटोनि भवबंधन ॥

शिवनाथ धरिता करी । तेव्हा झाला नरहरि ॥

■■■

मेरी आस सद्गुरु चरणपास ॥धृ॥

लागी लगन सो अब नही छुटत । देखो दरस आसपास ॥१॥

चकवा चकवी आशक माशुक । धुंड ले पै आसपास ॥२॥

शिवदिन प्रभु केसरी साहेब ॥ जो पट तंतक पास ॥३॥

■■■

काय उतराई पाया । कोवू तुझे गुरुराया ।।

नित्य नूतन विठ्ठल विर । केला डोळा का गोचरा ।।

साध्य साधन नैनातुडे । तया केले मागे पुढे ।।

चौसा अठरा कानडे । तेत्वा दाविले रोकडे ।।

म्हणे उद्‌बोध सर्वदा। नाही उत्तीर्ण नाकदा ।।

■ ■ ■

सद्‌गुरु तुची आमुची अविनाशी काशी ।।धृ।।

विश्वीविश्वेवर दर्शनीकी दिसे ह्रदयाकाशी ।।१।।

पंचक्रोशी प्रमाण कोय मरणे मोक्ष प्रकाशी ।।२।।

काळभैरव दंड कठिणकी दंडी पातकांशी ।।३।।

पंचगंगा, मकरस्नानकी त्रिवेणी लोकांसी ।।४।।

द्रव्यसार्थकी शरीर कष्टकी जीव येतो नाकाशी ।।५।।

अनंततीर्थे यात्रा फळती शिवदीन पादुकासी ।।६।।

केसरीनाथ दयाची गया हे पितरा कौतुकासी ।।७।।

■ ■ ■

नाथ राया विसरू मी कैसा तुज रे । तूचि जीवन माझे सहजरे ।।धृ।।
तूची अंतरसाक्षी कोसी । बाह्य इंद्रीय प्रकाशसी ।
सर्वत्र स्वये अस सी । परी स्वरूपी न कोसी ।।

तुज पकाता अतिसुख वाटे । दशादिशाही हरीरूप भेटे ।
आनंद नव्हे कोण दाटे। शुद्ध शुद्ध हे सिद्ध प्रगटे ।।

तुझे नामाची बहू आवडी। जिव्हे लागलीसे तुझी गोडी ।
म्हणे उद्‌बोध दिधली बुडी । आता केसरी तू ते ना सोडी ।।

■ ■ ■

# •।। धावा ।।•

नाथजी मज पावरे तुजवीण मज कोणि नाहि रे । कासही धरली असे अज तारकी लवलाहि रे ।
गाय मी करु काय चिंता व्याघ्र भवता फिरतो ॥१॥

नरहरी शिवकेसरी दे भेट माहिपति बाहतो ॥धृ॥

मस्तकी तवहस्त असता दीन होऊनि राहावे । लाजही बृदास तुझीया शोधुनी मनि पाहावे ।
धनी समर्थ तुचि गा अनाथ अंतरि झुरतो ॥२॥

माय तू आणि बाप तू भगिनी हि बंधू चूलता । इष्ट तू आणि मित्र तू गणगोत आप्तहि तत्वता ।
संकटी उडी घाली सत्वर जीव जावू पाहतो ॥३॥

मी तरी बहु पातकी अपराधी हा अन्यायी रे । दुष्टदुर्मति महादोशी शुध्द आचरण नाही रे ।
इंद्रियाधीन जाहलो परिभार तुजवर घालतो ॥४॥

बुद्धि प्रेरक तू सदा मज काहो या भरी घातले । घेऊनी पदरात आता कर्म मागे लाविले ।
सर्व सत्ता तूमची म्हणवोनि करूणा भाकितो ॥५॥

सद्‌गुरु नको दुर्धरु मज आदि अंती तूची रे । नांही रे पुढे पाहे मागे पुढे एकटा मीच रे ।
दुःख देखिले सुख चाखिले आता हात तुजला जोडीतो ॥६॥

मागू मी कवणासी सखया हात पसरूनि जाऊ मी । कोठे मी करु हाट माझा हट्ट चालवी येऊनी ।
शोकला बहु कंठ म्हणवुनी अभय जीवन मागतो ॥७॥

ठाव दे धरणी सखे गुरुमाय मजवर कोपली । एकटी मज संकटी वणी लोटुनी कुठे लोपली ।
काय मी करू लेकरू दीन पाखरू अज फिरतो ॥८॥

नरहरी शिवकेसरी गुरूमाय धाऊनी येतसे । महिपति शिशु तान्हुले उचलोनी कडेवर घेतसे ।
बाळ का श्रमलासि रे कुरवाळुनी समजाविती । नाभिनाभि वरदवाणी म्हणवुनि नयना पूसती ॥ ९॥

■■■

# ॥ धावा ॥

अशामध्ये पावरे नरहरी । धावत ये लवकरी ॥धृ॥

आजवर सृष्टीसी पावीले । आताची का दूर धरीले ।
पतीत पावन हे ब्रीद आपुले । सोडूनिया कसे दिधले ।
नव्हे उचीत हे मनी विचारी । धावत ये लवकरी ॥१॥

निष्ठूर कोवू नको दातारा । करीरे जगदोद्धारा ।
दुर्घट संकट हे संकारा । विश्वजनासी थारा ।
आले विघ्नची टाळी झडकारी । धावत ये लवकरी ॥२॥

नाही धीर जीवा कोण मला । रक्षी तू दीनदयाळा ।
करूना येवू दे कनवाळा । प्राणची उतरला डोळा ।
काय पाहतोसी कृपा करी । धावत ये लवकरी ॥३॥

मागे बहुतांसी तारीले । आज का मौन धरीले ।
कातीचे शस्त्र तू का ठेवीयले । कुठे सुदर्शन गेले ।
सखया आड घाली रे पण करी । धावत ये लवकरी ॥४॥

बालक प्रल्काद रक्षीसी । स्तंभी प्रगट कोसी ।
हिरण्यकश्यपुचा वध करीसी । आज का विसरलासी ।
निद्रा सांडूनिया ये कैवारी । धावत ये लवकरी ॥५॥

दृष्टे द्रौपदीसी गांजीता । चाटी कोसी अनंता ।
तुजला श्रम झाले गुणवंता । वस्त्रे काढून देता ।
तरी बा उडी घालीरे श्री हरि । धावत ये लवकरी ॥६॥

कढई माजी मंडूक बाळ । पडताची तात्काळ ।
तुजला स्मरतासी वेल्काळ। त्वा केले शितळ ।
पाहतो वाट तुझीबा मुरारी । धावत ये लवकरी ॥७॥

पार्थे पण केला पुत्रासी । मारीन जयद्रथासी ।
त्वा का लपविले सूर्यासी । पण नेला सिद्धीसी ।
किती तुज आळवावे परोपरी । धावत ये लवकरी ॥८॥

पाहता कलीयुगी नवल । भिंतीसी चालविले ।
नामा शिंप्याच्या भक्तीमुळे । बसुनि भोजन केले ।
हुंडी मेहत्याची खरी भरी । धावत ये लवकरी ॥९॥

जनीच्या संगे तु शिणलासी । दळण दळाया जाशी ।
चोख्या मेळ्याचे दही खाशी । खिचडीस भुकेलासी ।
कर्मा बाईची नवलपरी। धावत ये लवकरी ॥१०॥

शेत राखीले बोधल्याचे। ढीग करीसी धान्याचे ।
पाणी वाहता बा नाथाचे । श्रम झाले तुज साचे ।
म्हणोनी बसलासी कोठे तरी । धावत ये लवकरी ॥१॥

कुंभाराचे बा तान्हुले । झडकरी त्वा उठवीले ।
भानुदासासी सुळी दिधले । तयाशी पल्लव फुटले ।
आज कोठे गेलासी कंसारी । धावत ये लवकरी ॥१२॥

बसवेश्वराचे किर्तनी । नाचसी रात्रंदिनी ।
कबीरा मागी कसा बसोनी । वस्त्रे विनीशी सुखानी ।
माझे गुण दोष न विचारी । धावत ये लवकरी ॥१३॥

रोहीदास तुला विनवीता । कंकण देसी अनंता ।
यवने दामाजी ची गांजीता । पोते घेसे माथा ।
न कळे पार तुझा पूतनारी । धावत ये लवकरी ॥१४॥

तुकया वाण्याचे कागद। तारीले प्रसिद्ध।
नरहरी सोनार मतीमंद । कांचन करूनी शुद्ध।
वस्ता घडीसी रे परोपरी । धावत ये लवकरी ॥१५॥

जन जसवंताचे संकटी । पावलासी जगजेठी ।
प्राशन विष केले संतुष्टी । कसे मिराईसाठी ।
कोमल हृदय तुझे गिरधारी । धावत ये लवकरी ॥१६॥

प्रेमळ भक्ती पका न्काव्याची। श्मश्रु करीसी नृपाची।
सखुला आवड बहू भेटीची । ईच्छा आहे तिची ।
बांधून घेतले कसे तरी । धावत ये लवकरी ॥१७॥

सावत्या माळ्याच्या पोटात । लपलासी विख्यात ।
लोलींबराव हे अद्‌भुत। अवसची पुणव कोत ।
तु गा भक्तजनाचा कौवारी । धावत ये लवकरी ॥१८॥

भक्त पुंडलीके गोवीले । उभे विटेवरी केले ।
पंढरपूर देह चांगले । सहज कातासी आले ।
करूणा परसोनी त्वरा करी । धावत ये लवकरी ॥१९॥

अपार संत तुवा रक्षीले । काय तुझे म्या केले ।
चिंतानळे देही जाळीयले । वसुनी पकासी डूगले ।
सखया ओळख कसी पका बरी । धावत ये लवकरी ॥२०॥

शिवदिन केसरीच्या कृपाबळे । नरहरी उघडी डोळे ।
महिपती करी धावा पळोपळे । अभय गुरुने दिधले ।
आलो आलो बा धिर धरी । धावता ये लवकरी ॥२१॥

■ ■ ■

# ॥ धावा ॥

पतितोद्धारणारे वारि वारि जन्ममरणारे । नरहरिनाथ राया तोडी भवबंधनारे ॥धृ॥

प्रकाशित गुरु भास्कर कृपा रूपी पयोधर । दिनालागी धाव घेई ऱ्हदय स्थल दे सत्वर ।
माता पिता धन दारा माझा तूची सकोदर । म्हणऊनी कास तूझी आस धरीली थोर ॥१॥

षड्वैरी गांजियेलो त्रितापाने पीडीयेलो । मुकलो स्वहितासी तव नाम गुण राशी ।
मीमी मज अजा बोले काळ वृक घेतो झोले । नाशीवंत बहू देह कामीजन हे भुलले ॥२॥

त्यजिले धन दारा व्यर्थ माया पसारा । नैश्वर्य देह गेह लक्ष चौऱ्यांशी फेरा ।
विटले चित्त माझे देई सद्गुरु थारा । अविनाश मूळ दावी निर्विकल्प निर्विकारा ॥३॥

आनंद उदधीत बुडवी मज त्वरित । मज्जनी उद्धरीगा करी उन्मनीरत ।
सद् सद्रूप दावी मुखी अलक्ष हेत । अनुपम्य गुरुमूर्ती वेदवाच्या कुंठीत॥४॥

अहं सोहं जय माळा घाली तुर्यावस्था गळा । शिव मज दाखवावा तुझा अनुभव व्हावा ।
हृदिस्थ चिद्रूप तव तेज अमूप । जीव शिव समरसले मी तू पण ने विलया ॥५॥

दैदीप्य दिव्यकांती पाहू वीसरली पाती । शशीसूर्य मावळले अंगी चर्चियली विभूती ।
नारायण जप वाचे शिरी अर्चे लागली । सैली पुंगी तुंबीमाळा पदी तोडर घातीला ॥६॥

कुंडले कर्णी माळा ऱ्हदयी प्रेम उमाळा । जरी काठी छाटीवरी परीधानी अवलीळा ।
किनकाफ कफनी शोभे कीर्तनी बहू चाळा । ध्वनी का निघता झाला घाली सुमन माळा ॥७॥

कीर्तनी ढोल झांजा काती टीपरी बाजा । नाचत स्वानंदे वीणा मृदंग टाळा ।
एकनाद कोतो गोळा कीर्तनी बहुरंगा । विद्वज्जनी बहुमेळा नाचे कीर्तनी राजा ॥८॥

मात्रोदर श्रम वाया व्यर्थ शीणली काया । कुठार रूपी देह हेची कानन छेदाया ।
तनुही जात वाया नको नको को पाशा । गोवू नको मज माया जाणूनी रत पाया ॥९॥

अच्युतानंत विष्णुहंस केशवा विष्णू । नाना वेश धारकारे घन नीळा प्रद्युम्न ।
गोविंद हृषीकेशा शशी मन मोहनारे । श्रीधरा पद्मनाभा माधव रामा वराको ॥१०॥

मच्छ कच्छ वेशधारी वराह तू नरकारी । वामन बटू वेशा परशुराम परेशा ।
रावणांतक रामा हरी कृष्ण कौंसारी । संसारी दुःखहर्ता बौद्ध कलंकी अवतारी ॥११॥

रतलो पाप कर्मी नवशोधी गुरु वर्मी । षड्वैरी गांजूनिया भवडोही बुडे मी ।
काढी कांढी ओढी देवा माझी तुजला चिंता । भार सर्व तुज वरता नाही कोणी मज त्राता ॥१२॥

जडमूढ उद्धरिले तव पद मी धरिले । याची लाज तुझी तूज कोसी उदास मज ।
तुजवीण कोण माया जाळी मूळी जन्म मरण । आतां का धरिसी मौन तव ब्रीदासी उण ॥१३॥

विन्ध्याटवी झाडी दाट मार्ग बहू विकट । काम क्रोध श्वापदेही जाया सहीत उद्धर ।
पंचरार शर योजी बाण मारितो नीट । कामी जन त्यांत गोवी मज नको ते कष्ट॥१४॥

तुझाच मी खास दास गुरुभ्रति दे विलास । समर्थाचे घरचे श्वान त्यासी सर्वही देती मान ।
देऊळग्रामी वास तूझा भ्रत करीती अर्चन । जन्मभूमी प्रतिष्ठान तेथे गुप्त अनुसंधान ॥१५॥

उद्बोध गुरु धन्य चित्त केसरी चैतन्य । सांप्रदाई शिवदीन त्यांचे कुशी निदान ।
नरहरीनाथ नाम शीरी पादुका घेऊन । उभा महीपती शरण नम्र घाली लोटांगण ॥१६॥

■ ■ ■

# •॥ मानस पूजा ॥•

अखंड पूजा करितो भावे, गुरुच्या चरणाची । साधन नेणेकाही आवड अंतःकरणाची ॥धृ॥

सर्वतिर्थे वसतीपायी, हेच मानितो । सप्रेमाचे जीवनप्रीती पूर्वकन्काणीतो ।
शुद्धश्वेत सद्वासना, सुवास चंदन । निर्मळ मलया, गिरिच्या मिश्रीत केसरी वर्ण ।
भक्तीच्या अक्षतावाहे, जोडूनी करकमळ । नरहरीनाथा महिपती तुझा बाळक लडिवाळा ॥१॥

नानापरिमळ पुष्पमाळ, कंठी घालावी । यथानुशक्ती पूजा माझी फळास आणावी ।
मनहे सुमन पाई वाहिले, यासि हलवू नका । चंचल स्वभाव याचा स्वामी अवघा दृढ राखा ।
जाईजुई कल्पना, चंपक, अहंकार जाणा । मोगरा शेवंत बकुली वृत्तीचा नाना ।
भाव तुलसी पत्र मस्तकी वकातसे तुजला ।
नरहरि स्वरूप पाहता महिपति मालोनी मनी रिझला ॥२॥

धूप अंगीकारी देवा पंढरीराया देवा सद्गुरु राया । करजोडूनी विनवितो तुमच्या लागतो पाया ।
सोज्वळ ज्ञानाग्नी वर चुरूनी वासनाबीज । दश देकांगुळ दशांग अर्पण करितो महाराज ।
अनुहत घंटा निःशब्द शब्दे गर्जती । अहं जळाला सोंहं भावे घ्याको धूपार्ती ।
नेणे अर्चन विधी नमितो हीनमती पाही । अवघा नरहरिनाथ भरला महिपति का नाही ॥३॥

दीपोत्सक आतीचरणी पंढरीनाथा सद्गुरु । पाहतानुपरे दृष्टि आता करूनी गत कैसी ।
गोधृत पूर्ण भिजल्या अखंड त्रिगुण तिनवाती । तुर्येचा प्रकाश पसरला उजळल्या ज्योती ।
मी पण तूपण उरले नाही नरहरि रूपसारा । महिपती मिथ्या अवघा लटिक मायिक पसारा ॥४॥

भोजन करा पांडुरंगा स्वामीदेवाजी नाथादेवाजी । माय-बाप मजला शेष प्रसाद ठेवाजी ।
नित्य तृप्त पूर्ण भोक्ता, नैवेद्य तुजदावी२॥ शुद्ध भावार्थाची गोडी तुजला ही नवी ।
शुद्धश्वेत भात तुर्यावराथ वरपाही२॥ उन्मनी आज्यवाटी भरली जेवा लवलाही ।
नरहरि उचिष्ट महिपति भक्षी ग्रास घेतसे । ताटचि धुवोती घटघट अमृत प्राशन करीतसे॥५॥

सायंनैवेद्य उपाकार कराको देवाजी नाथा देवाजी । मायबापा मजला शेष प्रसाद ठेवाजी ।
कामधेनू सत्रावीचे दुध हे सुंदरा । ज्ञानग्नीने प्रवची झाले सुरस मधुरा ।
आकाशाचे पात्र भरले गुरु वाक्यगेही । शुद्ध श्वेत साखर गोडी मेळाविलीपाही ।
आत्मज्ञान मेवा घ्याको स्वामी विनवितो । नरहरिनाथ महिपति शेषप्रसाद मागतो ॥६॥

■ ■ ■

# ॥ श्री शिवदिननाथ महाराजांचे अष्टक ॥

सोळाशे नृपशालीवाहन शके शकाथवा अंतरी ।
पाकाती जयनाम संवत्सरवरा सर्वार्थ सिद्धी करी ।
माघ वद्य त्रयोदशीस रजनी या मार्ग एकावरी ।
सोडीली शिवदिननाथ गुरुने काया पुरी साजीरी ॥१॥

भेदूनि त्रिकूटास श्री हट्ट उलटे गोल्काट ओलांडीले ।
साधोनि पिठ औट अनुकात नादासही सोडीले ।
पुण्याद्री शिखरी निवांत बसुनि लावी समाधी बरी ॥२॥ सोडिली ॥धृ॥

इंदूवासर योग ते परधकी नक्षत्र विष्णू असे ।
कोता सोमवार प्रदोष कर्ण वणिज पंचाग ठेवितसे ।
केले उत्तरायणी गमन ते टाकूनि आम्ही दूरी ॥३॥ सोडिली ॥धृ॥

लक्षिली शिवरात्र शिवदिन तो आपस्वये सिद्धता ।
मिळाल्या नरनारी देवमुनी ते प्रख्यार्थ गुप्तर्थता ।
ब्रह्मानंद आनंद कारकमहा येवूनि गंगातिरी ॥४॥ सोडिली ॥धृ॥

येती सन्मुख तारकेश्वर पुढे वंदोनि भावे पदा ।
बैसावे क्षण एक लाभ मजला द्यावी कृपा संपदा ।
ते काळी स्थिर काही एक बसले अश्वत्थ पारावरी ॥५॥ सोडिली ॥धृ॥

नाना वाजती वाद्य घोष मधुरे शंखादि भेरी तुरे ।
वीणा टाळ मृदंग घोष हरिचे गाती हरीला स्वरे ।
साधू संत महंत सिद्ध अवघे दाटे सभाचातुरी ॥६॥ सोडिली ॥धृ॥

झाला हर्ष महीस अदभुत मनी आले तपा पारणे ।
गोविंदाख्य ऋषीस नामक मुखे बोले मला तारणे ।
तेव्हा भाग तिचाच देवूनि तिला सन्मान दिला करी ॥७॥ सोडिली ॥धृ॥

नित्यानित्य विचार सार करूनी पूजा विधी युक्तिने ।
घेसी सांग घडोनी तेचि बरवे चिंता वृथा वाहणे ।
दका दिवस हेच रित समजा लीला विचित्रा करी ॥८॥ सोडिली ॥धृ॥

ऐसा उत्सव पूर्ण दिन चवदा भाग्योदयी लाभला ।
काला कीर्तन ब्रह्मभोजन यती आराधने साधीला ।
देती नाथ प्रसाद स्वस्थ असणे निर्गुण रूपांतरी ॥९॥ सोडिली ॥धृ॥

इच्छा श्री शिवकेसरी सकलहि पुरवील ते सर्वदा ।
साधासाधन एक रूप नयनी कैची तुम्का आपदा ।
बोधीले निज गुज हस्त कमळी केला नराचा हरी ॥१०॥ सोडिली ॥धृ॥

भक्ती प्रेम नेम धरूनी त्रिकाल वाचील जो ।
त्याला नाही कदापी संकट कधी संसार भोगील जो ।
अंती शेवट ज्ञान सांगुनी गुरु सायुज्यतेला वरी ॥११॥ सोडिली ॥धृ॥

शिवकेसरी गुरुनाथ स्मरणे सर्व योग साधीले ।
शेवटी शिवरात्र पर्वणी ते समाधीस बैसले ।
शेवटी गजर थोर उत्सव फार महिमा चांगला ।
पकाता तसा पुलीगंगे ध्यास ह्रदयी लागला ॥१२॥

माघ वद्य त्रयोदशी शिव सोमवार चांगला ।
या मुहूर्ते प्रहर दिड धारणे शिव लागला ।
श्रवण जय संवत्सरीया देह नगरा सोडीले ।
जात सोळाशके शकाथव शंकरे मुळ धाडीले ॥१३॥

धन्य ते घडी पाहती हरी-दास अथवा भूपती ।
म्हणूनी शिवचिंतामणी का दृष्टी भरोनी पाहतो ।
चरण कमली वास धरूनी जो निरंतर राहतो ॥१४॥

■■■

# ॥ श्री लक्ष्मीनाथ महाराजांचे अष्टक ॥

पूर्ण अवतार महाराज विष्णूचा की । प्रत्यक्ष का ध्वज उभा गुरुभक्तीचा की ।
जो राजयोगी सहज स्वरूपी मिळाला । साष्टांग नमन हे लक्ष्मीनाथजीला ॥धृ॥

गंगातीरी पैठणी रहीवास ज्याचा । केला अपूर्व मठ का सुंदर अजाचा ।
त्यांच्या कृपेनेच नामरूपासी आला । साष्टांग नमन हे लक्ष्मीनाथजीला ॥१॥

अरुणोदयी करूनी स्नानही अर्घ्य देतो। सर्वांग धारण भस्म स्वये करितो ।
ज्ञानेश्वरी नित्यपठण असे जयाला । साष्टांग नमन हे लक्ष्मीनाथजीला ॥२॥

घाली दंडवत जो साष्टांगपायी । पश्चात बसोनी आसने करितो जपा ही ।
माध्यान काळी प्रभू बैसती भोजनाला । साष्टांग नमन हे लक्ष्मीनाथजीला ॥३॥

नाना पदे आणि अभंग बहूप्रकारे । प्रेमे करीत भजने अति सौख्यकारे ।
वाणी बहु सुस्वर गायनाला । साष्टांग नमन हे लक्ष्मीनाथजीला ॥४॥

रात्री पदी करी बंधन घागऱ्याचे । प्रहरेक नृत्य करणे बहुहर्षयुक्ते ।
का नित्य नियमाची निरंतर शोभे जयाला। साष्टांग नमन हे लक्ष्मीनाथजीला ॥५॥

कीर्ती अगाध गुणवर्णिती संत ज्याचे । लावण्यरूप निरूपम्य पका तयांचे ।
उपदेश मंत्र बहुतारक या जनाला । साष्टांग नमन हे लक्ष्मीनाथजीला ॥६॥

सत्राशते आणिक बत्तीस या शकात। जो मार्गशीर्ष महिना बहुपुण्यवंत।
ज्ञानेश्वराजवळी समाधी शोभे जयाला । साष्टांग नमन हे लक्ष्मीनाथजीला ॥७॥

सुतलक्ष्मण नाम गाजे । महाराज हे पद अखंड जयाशी साजे ।
केले मला महीपती परिलाज त्याला। साष्टांग नमन हे लक्ष्मीनाथजीला ॥८॥

■■■

# ॥ गुरु परंपरेचे श्लोक ॥

गुणातीत अव्यक्त विद्या विलासी । मुळारंभ आरंभ ऐश्वर्य तेसी ।
सदा सर्वदा सच्चिदानंद अवस्था । नमस्कार माझा तया आदिनाथा ॥

अतिसौख्य माहेर हे सज्जनांचे । परंधाम विश्राम योगेश्वराचे ।
निरालंब देसी अनुपम्य राजा । नमस्कार मच्छिंद्रनाथासी माझा ॥

गुरुभ्रती जेथूनी रूपासी आली । महासिद्धता ज्या पासूनी व्यक्त झाली ।
कसा धावण्या धावतो दिनकाजा । नमस्कार गोरक्ष नाथासी माझा ॥

अनहत सिंगी स्फुरण लक्ष मुद्रा । अखंड स्वरूपी, स्थिती योग निद्रा ।
जयाचा बहुआश्रयो योग म्रुता । नमस्कार माझा तया गहिनीनाथा ॥

चळेना ढळेना टळे कर्म मार्गी । उपाये विना सापडे संतसंगी ।
समाधान वृत्ती जया सत्य बोधी । नमस्कार निवृत्ती नाथासी आधी ॥

प्रतापे गुणे आगळा सूर्य जैसा । स्वयंज्योत सिद्ध प्रकाशित जैसा ।
जयाची असे या जगी पूर्ण सत्ता । नमस्कार माझा तया ज्ञाननाथा ॥

वसे अंतरी शुद्ध सिंकासनी जो । अवस्थात्रया लागूनी खेळवी जो ।
स्वयं सर्व कार्य करूनी अकर्ता । नमस्कार माझा तया ज्ञाननाथा ॥

असे सत्य ते नित्य प्रत्यक्ष भासे । सबाह्यांतरी पाहता तोची दिसे ।
जया पाहता पाहणे सर्व मिथ्या । नमस्कार सत्यामला प्राणनाथा ॥

धरी रूप लावण्य भ्रताभिमानी । करी स्नेह कूर्मा परिमोक्षदानी ।
कृपाळूपण दाखवी भक्ती पंथा । नमस्कार माझा तया गैबीनाथा ॥

असोनी पुढे कानडे लोचनासी । परिच्छिथ जे ना कळे कल्पनेसी ।
जया आदि ना अंत निर्मळ वार्ता । नमस्कार माझा तया गुप्तनाथा ॥

जगी थोर विस्तारली कीर्ती ज्याची । श्रवणमात्र कोता धुनी पातकाची ।
जयाचे बळे जिंकीजे योग पैजा । नमस्कार उद्‌बोध नाथासी माझा ॥

कसे साजिरे रूप आनंद राशी । विसावा घडे पाहता डोळीयासी ।
जयाची बहु आवडी या मनाला । नमस्कार श्री केसरीनाथजीला ॥

**सदानंद रूपी चिदानंद मूर्ती । सदाचार बाह्यांतरी लक्ष स्फूर्ती ।**
**गुरु सांप्रदायात श्रीनाथ भोळा । नमस्कार साष्टांग लक्षूनी डोळा ।।**

**निराकार निर्गुण जो मूळचा की । असे व्यापुनी सर्व देशी बराकी ।**
**त्रिकूटा ही परता जयाचा ठिकाणा । नमस्कार माझा गुरुशिवदिना ।।**

**प्रतिष्ठान गोदा तटी जो विराजे । जया वंदिनी थोर येवोनी राजे ।**
**करी पुण्यतिथी आनंदे स्वभावे । गुरु नरहरीला नमस्कार भावे ।।**

**स्वयं ब्रह्म सच्चिद् घनानंद मूर्ती । महाराज योगी सखा चक्रवर्ती ।**
**प्रतापे करी कीर्तनी भक्ती लिला । नमस्कार श्री लक्ष्मीनाथजीला ।।**

**स्वये योगीराजा महाज्ञान खाणी । चिदायैक्य वृत्ती शिरोरत्न खाणी ।**
**निजबोध रूपे प्रगटोनी ठेला । नमस्कार श्री विठ्ठलनाथजीला ।।**

**न कळेचि कोणा महिमा जयाची । उदारमूर्ती श्री शिवशंकराची ।**
**संतोष वाटे बहु या मनाला । नमस्कार साष्टांग गणेशनाथजीला ।।**

**सदाचार संपथ जो योगीराजा । असे स्थापिला श्री गुरुभक्ती काजा ।**
**गुरुचे अनुज्ञे करी उत्सवाला । नमस्कार श्री सद्गुरु गौतमाला ।।**

**भानुनाथ नाम प्रभा तेज युक्त । नूतन प्रकाश करी ज्ञानमुक्त ।**
**नामाचे प्रतापे तारुनी भक्त । थरथरे काळ करीना आसक्त ।।**

■ ■ ■

**झालासी तो नरहरी आपण स्वये रे । ते रूप वर्णन मला करिता नयेरे ।**
**नरहरिनाथ गुरु सद्गुरु आठवावा । ब्रह्मांड पोटी सकळा कीरे साठवावा ।।**

**त्यांच्या कृपे महिपती आजी धन्य कोई । चरणामृता पियूनी ब्रह्मपदास जाई ।**
**ही मालीका तुम्ही वदा करितो विनंती । चुकतिल जन्ममरणा वृत्ती सत्य पंक्ती ।।**

■ ■ ■

# ॥ निवडक अभंग ॥

आम्ही हिन दिन जाणा नाथपंथी । निचाहुनि माना अति नीच ॥१॥
सर्वांचे चरण वंदितो सर्वदा । थोरपण कदा केले नाही ॥२॥
मच्छिंद्र गोरक्षस्वामी पै आमुचा । पूर्णानंद साचा ब्रह्ममूर्ती ॥३॥
तेथुनिया गहिनी निवृत्ती तारक । उद्धरीले देख त्रिवर्गासी ॥४॥
मज आणि सोपान ब्रह्म केले जाणा । पावली त्या खुणा मुक्ताबाई ॥५॥
ज्ञानदेव म्हणे ऐसी गुरूकृपा । दावियेला मार्ग सोपा आम्हा ॥६॥

■■■

आकारे प्राण्या शिव स्मरेकी । तुझे कोईल फार बरेकी । सांगतो खरे की । मी विसरेकी ।
पंचवदन नंदी वहनाचा । साक्षी व्यापक पूर्ण मनाचा । दयाळू पुरता भक्त जनाचा ।
अभय वरे की ॥१॥
मूर्ती सगुण निर्गुण बरी की । महास्मशाने वास करीकी। स्मरता पातक घोर हरेकी ।
प्रेम भरे की ॥२॥
आदिनाथ गुरु केसरी योगी । जागृत तूर्या पार्वती भोगी । अखंड शिवदिन जिवशीवयोगी ।
योग हरेकी ॥३॥
आका रे प्राण्या शिव स्मरेकी ॥धृ॥

■■■

व्यास वाणी गीर्वाणी तुझी वाणी ॥धृ॥
प्राकृत भाषा वर्णन वाणी । करू काय भवानी ॥१॥

हे जगदंबे विश्वकदंबे । निरावलंबे तू शिवसांबे।
मज अवलंबे धाव पाव । गीर्वाणी ॥२॥

कृपा कटाक्षे सर्वही साक्षे । अलक्ष पक्षे प्रताप दक्षे ।
मज संरक्षे पुण्य भाग्य पर्वणी ॥३॥

केसरीनाथे तूर्ये समर्थ । तू परमार्थ ।
शिवदिनार्थे स्वहित स्वार्थे । जागृत केसरी वाणी ॥४॥

■■■

चित्ता राहिरे अचल । उद्‌बोधी निश्चल । नधरी ध्यास तू विषयाचा। संग या तृष्णेचा ॥
लोभ जडेल कामाचा । दायक जो भवाचा । घातक सर्व हे आहेरे नेणसी कैसे तुजरे ॥
काळ दंडिल सत्य रे भ्रम का कैसा तुज रे । वेगी सावध कोई बापा। चुकवी जन्मखेपा ॥
विनवी केसरी तद्रूपा । भज सद्‌गुरु कृपा ॥

■ ■ ■

रूप हे आपुले पका रे डोळे को । रूप हे आपुले ॥धृ॥
निजरूपी मुरूनिया राहे । रूप हे आपुले ।
रूप पाहता अरूप कोते । सर्व ही दिसते ते लया जाते ।
जेथे नाही काही सरते । कोय ऐसे अनुभवा येते ॥१॥

अनुभवा वाचूनी लाजीरवाणे । चहू शुन्याचा निरास कोणे ।
महाशून्य ते कैसेनि कोणे । ग्रासूनि शून्यांतीत कोणे ।
सुख भासते अनुभव जाणा । भास रहित तो देखणा ।
देखणे गाळूनि कोई शकाणा ॥ बोधी उद्‌बोध केसरीच्या खूणा ॥२॥

■ ■ ■

स्वर्ग मृत्यू आम्का। वाटे येता जाता । परी नाही गुंता काही तेथे॥१॥
जेथे तू अससी तेथे मी येईल । स्वरूप पाहिन याची डोळा ॥२॥
न करी मी ध्यान । सिद्ध तू असता । न धरी सर्वथा दूर आता ॥३॥
दुरी मी नजाई तूज जावू नेदी । उद्‌बोध गोविंद लीन पायी ॥४॥

■ ■ ■

वारी तुझी मल्कारी मज तारी । दुस्तर भव पुरी पाय उतारी ॥धृ॥
आदिनाथ गुरु जागृत पुरता । सांब सदाशिव तू अवतारी ॥१॥
साक्षी व्यापक सर्व चराचर । दृष्टी सृष्टीस तूची तारी ॥२॥
निर्गुण सगुण जडीत गुणाचा । भूषण वाघ्या लेसी जरतारी ॥३॥
भज भंडारी प्रताप केसरी । द्वैतविकल्प कुळसह तारी ॥४॥
शिवदिन वाघ्या सोहं शब्दे। भुंकूनी फुंकित कीर्ती तुतारी ॥५॥

■ ■ ■

# ग्रंथलेखक
# प. पू. मोहननाथ महाराज
# यांचा अल्प परिचय



**प. पू. मोहननाथ महाराज** (विद्यमान पीठाधिश-संत नरहरिनाथ महाराज संस्थान, श्रीक्षेत्र देऊळगाव राजा)

# •॥ जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती... ॥•

श्रीगुरु भानुदासनाथ महाराजांचे सुपुत्र श्रीमोहननाथ महाराज. भानुदासनाथ महाराजांच्या समाधीनंतर संस्थानाची जबाबदारी श्रीमोहननाथ महाराजांकडे आली. पूज्य मोहननाथ महाराज आजतागायत ही जबाबदारी भक्तीभावाने पार पाडीत आहेत.

१९५० च्या दशकात प. पू. मोहननाथ महाराजांचा जन्म झाला. प. पू. महाराजांनी संस्थानचे प्राप्त सेवाकार्य सांभाळत आपले पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. बी. ए. बी. कॉम नंतर एम. ए. मराठीत त्यांनी पदव्युत्तर शिक्षणही घेतले. लहानपणापासून प. पू. महाराजांना वकिलीची आवड होती. कारण मोठ्या महाराजांचे शिष्य बापट, दंडे अशा बॅरिस्टर लोकांचा सहवास महाराजांना लाभल्यामुळे तोही प्रभाव मोहननाथ महाराजांवर होता. त्यामुळेच त्यांनी एल. एल. बी.च्या शिक्षणाला सुरूवात केली. परंतु आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे त्यांना ते शिक्षण नाईलाजाने सोडावे लागले. त्यानंतर एम. एस. डब्ल्यू. करायचे ठरविले. इथेही आर्थिक प्रतिकूलता हेच कारण झाले. (तसा हा एक इश्वरी संकेत होता की या क्षेत्रात कार्य करण्यासाठी महाराजांचा जन्म नव्हता) पदव्युत्तर शिक्षण झालेले असल्यामुळे प. पू. महाराजांनी काही काळ एम. एस. ई. बी. व बँक या क्षेत्रांत काम केले. थोरले बंधू वैद्यकीय क्षेत्रात असल्यामुळे ते कायम बाहेर गावी असत. त्यामुळे संस्थानच्या परंपरेचे कामकाज प. पू. महाराज पाहात असत. १९९१ साली प. पू. भानुदासनाथ महाराज ब्रह्मलीन झाले आणि सर्व कारभार महाराजांवर आला. (पूर्वी एकदा प. पू. भानुदास महाराजांनी पूज्य महाराजांना सांगितले होते की, ही नाथपरंपरेची धुरा तुम्हाला सांभाळावी लागणार)

श्रीमोहननाथ महाराज यांच्याकडे मठाची जबाबदारी आली तेव्हाचा काळ त्यांच्या दृष्टीकोनातून सर्वच पातळीवर प्रतिकूल होता. श्रीगुरु भानुदासनाथ महाराजांच्या समाधी घेण्यामुळे श्री मोहननाथ महाराजांचे एकाच वेळेस वडीलांचे व सद्‌गुरूंचे छत्र हरवले होते. हा काळ प. पू. महाराजांसाठी खूप कठीण होता. तेव्हा या काही गुरुबंधू, भक्त खंबीरपणे महाराजांसोबत होते. त्याचबरोबर संस्थानाची आर्थिक बाजूही कमकुवत झालेली होती. अशा परिस्थितीत गुरुआज्ञेने नाथपरंपरा पुढे नेण्यासाठी श्री मोहननाथ महाराजांनी कार्यभार स्वीकारला.

१९९४ साली ग्वाल्हेर येथील ढोलीबुवा मठाचे श्रीगुरुभक्त सदाशिव महाराज पुरंदरे यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीमोहननाथ महाराजांचा पीठारोहण सोहळा विधीवत पार पडला. या सोहळ्याला अनेक तीर्थक्षेत्रावरील ब्रह्मवृंद, पंडित, आचार्य आवर्जून हजर होते. वेदमंत्रांच्या जयघोषात व हजारो भक्तगणांच्या उपस्थितीत प. पू. महाराजांचा पीठारोहण सोहळा संपन्न झाला. श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या नाथसंप्रदायी परंपरेचे १३वे पीठाधीश प. पू. मोहननाथ महाराज मठात विराजमान झाले. याप्रसंगी अनेक तीर्थांवरील गंगाजलाने, समुद्र जलाने महाराजांना अभिषेक करण्यात आला व

प. पू. महाराजांचे विधिवत पूजन करण्यात आले.

१९९४ साली झालेली न्हावी येथील पहिली भिक्षा थक्क करणारी होती. संपूर्ण गावातील वातावरण भक्तीरसाने आनंदाने भरभरलेले होते. जागोजागी रांगोळ्या पायघड्या घालुन भाविक पाद्यपूजन करत होते. त्या वर्षी गुरुमंत्र घेण्यासाठी दररोज १०० ते १५० भक्त असायचे. सर्वांमध्ये एक नूतन उर्जा, नवीन उत्साह होता.

संत नरहरि महाराज संस्थान नदी काठावरील परिसरात असल्यामुळे मठाच्या प्रांगणात झाडी होती. रस्ता नीट नव्हता. शिष्य मंडळी देखील उत्सवाला व कार्य प्रसंगाच्या निमित्तानेच येत असत. पूर्वी प. पू. महाराजांचा निवास गावातील वाड्यावर होता. आन्हीक व नित्य उपासनेसाठी ते मठात येत असत. पण पीठाधीश झाल्यावर प. पू. महाराजांनी मठातच कायम निवास करण्याचा निर्णय घेतला व इथेच संस्थानाच्या व नाथपरंपरेच्या उज्वल भविष्याचा पाया नव्याने रचला गेला. नाथसंप्रदायाची पंरपरा पुढे नेण्यासाठी प. पू. महाराजांनी नोकरी व अन्य व्यावहारिक गोष्टींचा सर्वत्याग करून संस्थानच्या सेवेचे व्रत अंगिकारले. याकाळात आर्थिक बाजूंची सांगड घालणे अतिशय कठीण झाले होते. उत्पथाची बाजू म्हणजे फक्त न्हावी, ढासला, मलकापुर व बीड येथील भिक्षा! ती ही वर्षातून एकदाच!

पण अशा प्रतिकूल परिस्थितीतही **जोडोनिया धन उत्तम व्यवकारे ।** या संत उपदेशाप्रमाणे सर्व उत्सव, मठाची देखभाल महाराजांनी केली. 'प्रपंच कसा चालायचा किंवा चालतो' असे कोणी विचारले तर महाराज त्यांना श्री. केसरीनाथ महाराज कृत 'पतित पावन' धाव्यातील शेवटचे चरण सांगत असत.

**जाणसी तु करी आता । माझी तुजला चिंता ।**
**तुजवरी भार माझा । सत्य जाण अनंता ।।**

**घालूनिया भार राहिलो निश्चिंती । निरविले संती विठोबासी ।।**

त्या परमेश्वराच्या सेवेचे कार्य करत असताना काय कमी पडणार आहे अशी श्रीमोहननाथ महाराजांची धारणा आहे. याबद्दल स्वतः भगवानांनीही गीतेत सांगतिले आहेच,

**अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।**
**तेषां नित्याभियुक्तानां योग क्षेमम् यकाम्यहम्।।**

अनन्य भावाने भगवंताची भक्ती केली, सेवा केली, स्मरण केले तर त्यांचे योग-क्षेम परमेश्वर स्वतः पाहतो. याच भावाने महाराजांचे कार्य आजतागायत सुरू आहे आणि परमेश्वरानेही

त्यांच्या कार्याला नेहमीच सहाय्य केले आहे.

मठाची देखभाल व उत्सव या आध्यात्मिक उपक्रमांसोबत महाराजांनी संस्थानांच्या वास्तूचे काळानुरूप नूतनीकरण व विकसन केले. नदीकडील संरक्षण भिंत उभारणे. सर्व समाधी मंदिरांच्या परिसराचे सुशोभीकरण यासारख्या अनेक महत्त्वाच्या गोष्टी भक्तांच्या सहकार्याने महाराजांनी करविल्या.

नाथसंप्रदाय हा जगाच्या कल्याणासाठी असल्याने तो सर्वदूर पोहचण्यासाठी सर्वच नाथमहाराजांनी कार्य केले आहे. या परंपरेतूनच श्री मोहननाथ महाराजांनी आपले कार्यक्षेत्र विस्तारत नाथसंप्रदायाचा प्रसार केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर सातासमुद्रापलीकडेही केला. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रात नाथ संप्रदायाचा मोठा प्रचार प. पू. महाराजांनी केला. हे सर्व कार्य वेगाने सुरू होते. महाराजांच्या भक्तीपूर्ण सेवेने अनेक भक्तगण नाथसंप्रदायात सामील होऊ लागले. या प्रचार-प्रसारातून निर्माण झालेल्या नवउर्जेने अवघ्या वीस वर्षांत मठाचा कायापालट झाला. परंतु महाराजांनी आपले कार्यक्षेत्र महाराष्ट्रापुरतेच मर्यादित न ठेवता जगकल्याणाच्या दृष्टीकोनातून गुजराथ, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेशामध्येही महाराष्ट्राच्या या नाथपरंपरेचा प्रचार व प्रसार केला. आज अमेरिका, लंडन, ऑस्ट्रेलिया या परदेशातही प. पू. महाराजांचा काही शिष्य परिवार आहे. या शिष्यपरिवारामुळे आजही परंपरा संपूर्ण जगभरात पोहोचलेली आहे/पोहोचत आहे. या सर्व सेवाकार्यात कुठेही कमी न पडता आई साहेबांनी (महाराजांच्या मंडळी) साथ दिलेली आहे.

नाथपरंपरेनुसार तसेच स्वानुभवातून पूज्य महाराजांनी विचारपूर्वक आपले चिरंजीव ह. भ. प. वेदविभूषण उद्‌बोध महाराज पैठणकर यांना वयाच्या सातव्या वर्षी व्रतबंध संस्कार करून वेदाध्ययनाकरिता संत ज्ञानेश्वर वेदविद्या प्रतिष्ठान येथे पाठवले. चि. उद्‌बोध यांनाही लहानपणापासून कीर्तनाची भजनाची आवड होती. घराण्याचे संस्कारही अनुरूपच होते. वे. मु. दुर्गादास मुळे गुरुजींच्या मुखातून शुक्ल यजुर्वेद संहितेचे अध्ययन पूर्ण केले. तसेच महर्षी सांदिपनी वेद विद्यालय,उज्जैन विद्यापीठातून ‘वेदविभूषण’ ही पदवी प्राप्त केलेली आहे. धनाढ्य कोणे हे प. पू. महाराजांचे ध्येय कधीच नव्हते. तोच वारसा चि. उद्‌बोध यांच्याकडेही आलेला आहे. आपण श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या परंपरेतील आहोत. आपण ज्ञानेश्वरी, गाथा, भागवताचे अध्ययन करून कीर्तन करावे व परंपरा सांभाळावी याउद्देशातूनच चि. उद्‌बोध यांनी प्रशिक्षण घेतले. पुण्यातील हरिकीर्तनोत्तेजक सभा ही कीर्तनातील प्रख्यात संस्था आहे. येथे नारदीय कीर्तनाचे अध्ययन करून २०१४ चा ‘युवा कीर्तनकार पुरस्कार’ उद्‌बोध महाराज यांनी मिळविला. परंपरेतून प्राप्त झालेली विठ्ठलभक्ती आणि कीर्तनाची आवड असल्यामुळे श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या पुण्यपावन ज्ञानभूमीत (आळंदी) स्वानंद सुख निवासी सद्‌गुरु जोग महाराज संस्थापित ‘वारकरी शिक्षण संस्थे’त वारकरी संत सहित्याचे / वाङ्‌मयाचे अध्ययन करून कीर्तन परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन उद्‌बोध महाराज यांनी आपला २००१

ते २०१४ असा चौदा वर्षांचा अध्ययन प्रवास पूर्ण केला. आता महाराष्ट्रात कीर्तन, प्रवचन, व्याख्यान व संप्रदाय प्रचाराचे कार्य ते करत आहे.

दोन वर्षांपूर्वी सद्‌गुरु नरहरिनाथ महाराजांच्या २२० व्या पुण्यतिथी उत्सवात (हा उद्‌बोध महाराजांच्या नियोजनातील प्रथम उत्सव होता) महाद्वार अनावरण सोहळा झाला. आज एका सुवर्ण युगाकडे संत नरहरिनाथ महाराज संस्थान वाटचाल करीत आहे. याला कारण प. पू. महाराजांची निष्काम सेवा, प्रचाराची तळमळ व लोकोद्धाराची इच्छा हेच होय. पुढेही उद्‌बोध महाराज या दिव्य परंपरेचे सेवा कार्य याच उत्कट भक्तीने सेवाभावी वृत्तीने करतील असा सर्व भक्तांना विश्वास आहे.

■ ■ ■

लेखिका-

**सौ. विजयश्री सदाशिव महाराज पुरंदरे, ग्वाल्हेर म. प्र.**

# जीर्णोद्धार







संत नरहरिनाथ महाराज श्रीक्षेत्र देऊळगाव राजा (पूर्वीचे व आत्ताचे रूप)

# ग्रंथ सहाय्यार्थ देणगीदार

श्री. रमण एस. जतकर

श्री. नीलेश पुरंदरे

श्री. विवेक एल. चौधरी

श्री. बी. एस. बापट

श्री. के. आर. तळेले

श्री. उमाकांत झोपे

श्री. वसंत थिगळे

सौ. शर्मिष्ठा कुलकर्णी

श्री. विनोद कणखर

*मनःपूर्वक धन्यवाद !*


❖ संत नरहरिनाथ महाराज श्रीक्षेत्र देऊळगाव राजा नियोजित प्रकल्प ❖
भोजन कक्ष
सभागृह